# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

मार्च २०२६










## महिला दिन विशेषांक






अन्नपूर्णा परिवार
संचालित
अन्नपूर्णा महिला को.ऑप क्रेडिट सो. (मल्टीस्टेट)
अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन
वात्सल्यपूर्णा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था
अन्नपूर्णा महिला मंडळ
दादा पुरव रिचर्स अॅण्ड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट
पूर्णा इ - सोल्युशन फाऊंडेशन
अन्नपूर्णा परिवार ३३ वा वर्धापन दिन सन २०२५ - २०२६ पुणे


अन्नपूर्णा परिवार
संचालित










अन्नपूर्णा परिवार विकास
वात्सल्यपूर्णा स्वयंरोजगार
दादा पुरव रिचर्स अॅण्ड ट्रेनिंग
इ - सोल्युशन फाऊंडेशन


अन्नपूर्णा परिवार विकास संवर्धन
वात्सल्यपूर्णा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था
अन्नपूर्णा महिला मंडळ
पूर्णा इ - सोल्युशन फाऊंडेशन

# अनुक्रमणिका

* संपादकीय – ***वृषाली मगदूम***
* स्त्रीशिक्षणामुळे विस्तारणारी क्षितिजं – ***प्रा. मीरा कुलकर्णी***
* 'घरकाम स्त्रियांची उपजत जबाबदारी' ही धारणा नष्ट करण्याची गरज! – ***प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार***
* सावित्रीबाई फुले आणि जागतिक महिला दिनाची प्रासंगिकता – ***ॲड. कविता म्हेत्रे***
* पुरुषांच्या नजरेतून स्त्री-पुरुष समानता – ***ॲड. नीलेश खानविलकर***
* बायकांचे व्यवसाय! – ***स्वप्ना विजया अरुण***
* आत्मविश्वास – ***अलका भुजबळ***
* आजच्या युवा पिढीची लग्नाची समस्या – ***संकेत मुनोत***
* स्त्री चळवळीची पन्नास वर्षे – ***वृषाली मगदूम***
* लेकीची आई होताना – ***दिक्षा इंद्रसेन गोरे***
* ती स्वयंसिद्धा – ***मोहिनी देशमुख***
* कुटुंब घडले की समाज घडतो – ***रेश्मा अभिजीत***
* कविता – ***१) स्वाती पाटील २) संगीता गजबे ३) प्रणाली अतुल पवार ४) भाग्यश्री ५) संगीता इंगळे ६) स्वप्नदिप पवार ७) सौ. रुपाली लटके ८) दिनकर पवार ९) रुपाली यादव***
* अन्नपूर्णा त्रैमासिक अहवाल – ***अंजली पाटील***

**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **वृषाली मगदूम**
- **अरविंद पाटकर**
- **अंजली पाटील**
- **प्रसाद मोकाशी**
- **प्राची बापट**

**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९, ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७

## संपादकीय

– ***वृषाली मगदूम***

अन्नपूर्णा परिवारच्या संवाद त्रैमासिकचा मार्च अंक आपल्या हाती देत असताना आजूबाजूचा भवताल व झालेले बदल मनात संमिश्र व संभ्रमित अवस्था निर्माण करत आहेत. स्त्री चळवळीला ५० वर्षे झाली. त्यानिमित्ताने महाराष्ट्रातील सर्व संस्थांनी एकत्र येऊन पन्नास वर्षेत आपण काय कमावले काय गमावले याचे सिंहावलोकन केले, ही एक ऐतिहासिक व अभूतपूर्व घटना आहे. संयुक्त राष्ट्र महासभेने २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. शेती, अन्न सुरक्षा आणि ग्रामीण सक्षमीकरणात महिलांच्या अमूल्य पण दुर्लक्षित योगदानाला मान्यता मिळणे ही यावर्षीची उल्लेखनीय बाब आहे. जागतिक स्तरावर भेदभाव दूर करण्यासाठी ही हे पाऊल उचलले आहे. शेतकरी महिला ज्यांच्या नावावर शेती आहे अशा महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे. पण शेतमजूर महिलांच्या प्रमाणात मात्र वाढ होताना दिसते आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शेतकरी महिला शेतमजुरी करत आहेत. एकल शेतकरी महिला हिंमतीने कुटुंब चालवत आहेत. जागतिक पातळीवर त्यांची नुसती नोंद होऊन चालणार नाही तर सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक पातळीवर त्या सक्षम व सुरक्षित कशा होतील यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. गेल्या ५० वर्षांत महिलांवरील अत्याचारात व हिंसाचारात वाढ होत आहे, विकृत, अमानुष अशा लैंगिक हिंसाचारात लहान मुली ते ज्येष्ठ महिला बळी जात आहेत. महिला सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याचबरोबर नातेवाईक, शेजारी, मित्र यांच्यातील छोट्या मोठ्या कुरबुरीतून, वैमनस्यातून मारून टाकण्याचे, खून करण्याचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्य बिघडल्याचेही लक्षण आहे. अर्वाच्य शिवीगाळ, असभ्य भाषा, चारित्र्यहनन, शब्दांचे जिव्हारी वार हेही प्रामुख्याने राजकारणात घडत आहे, व्यक्तिवाद वाढत आहे. मला काय मिळणार हा प्रश्न सुद्धा विचारला जात आहे. आज तरुण पिढी अध्यात्मिक भोंदू गुरूच्या मागे लागून मानसिक गुलाम झाले आहेत. ५० वर्षांतील हा बदल भयावह असला तरी स्त्री चळवळीने नेटाने सर्व प्रश्न लावून धरले आहेत. रस्त्यावर उतरून वेळोवेळी आंदोलने करून प्रस्थापित व्यवस्थेला नमते घ्यायला लागले आहे. केंद्र सरकारने तीन शेतकरी कायदे शेतकऱ्यांच्या अहिताचे आणले, तेव्हा दीड एक वर्ष दिल्ली येथे आंदोलन करून आंदोलकांनी सरकारला माघार घ्यायला लावली. ५० वर्षे महिला धोरण, महिला विधेयक

व महिला विषयीच्या कायद्यात सुधारणा झाल्या आहेत. बाललैंगिक शोषण कायदा, कामाचे ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा, लिंग निवड प्रतिबंध कायदा, कौटुंबिक हिंसाचार कायदे झाले. शिवाय छेडछाड व ॲसिड ॲटक संदर्भातही कायदे झाले, महिला आज अन्यायाला दाद मागत आहेत. भारत हा एकतेत विविधता असणारा देश आहे, सर्व जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने इथे राहतात, गेल्या दशकात मात्र या साऱ्याचे ध्रुवीकरण झाले. जातीचे कप्पे तयार झाले, अल्पसंख्यांक लोक असुरक्षित व भयभावनेचे शिकार झाले आहेत. सत्योत्तर काळ आजूबाजूला अधोरेखित झाला आहे. एखादी खोटी गोष्ट परत परत सांगितली की ती खरी वाटते. चिकित्सा करणे, विज्ञानावर आधारित उत्तरे शोधणे, विचार व अभ्यास करणे हे कमी होत चालले आहे. माध्यमाने यात महत्त्वाची भूमिका बजावत लोकांची दिशाभूल केली आहे. समाज अभिसरण होत असताना सर्वच सकारात्मक अनुकूल आदर्श घडेल ही अपेक्षा नसतेच. बदल हे मुंगीच्या पावलांनी होत असतात. त्यामागे ही अनेकांचा अनेक वर्षांचा संघर्ष समाजात असतो. डाव्या, समाजवादी, स्त्रीवादी ,उजव्या अशा विविध विचारसरणीचे लोक आहेत. पण समतोल, सौहार्द, एकमेकांच्या विचारांचा आदर करणे ही भावना टिकून राहणे व विविध विचारसरणीचा समतोल टिकणे महत्त्वाचे आहे, जातीय बंधुभाव व स्त्रियांमधील भगिनीभाव हे आजचे महत्त्वाचे मुद्दे आहेत, आपली लढाई आपसात नसून अन्याय, दारिद्र्य, अंधश्रद्धा व समाजातील चुकीच्या गोष्टींसाठी आहे हे आपणाला कळले पाहिजे. मार्च विशेषांकात आपण लेखक व चळवळीतील कार्यकर्ते यांच्याकडून लेख मागवले होते. संविधानाचे अभ्यासक निलेश खानविलकर हे वकील आहेत. सामान्य पुरुषांच्या नजरेतून स्त्री पुरुष समानता म्हणजे काय हे त्यांनी या लेखात सांगितले आहे. स्त्री पुरुष समानतेत स्त्रीला कमजोर समजणे थांबवलं पाहिजे, स्त्री पुरुष समानता ही आत्मपरीक्षणाची, बदलाची, जबाबदारी स्वीकारण्याची प्रक्रिया असल्याचे निलेश खानविलकर सांगतात. मीरा कुलकर्णी यांनी महिलांचे शिक्षण हे सर्व प्रकारच्या प्रगतीचे साधन आहे त्यामुळे आता त्यांना शिक्षणात मागे राहून चालणार नाही. शिक्षणांने स्त्रियांचे कुटुंबातील स्थान उंचावले आहे. शिक्षणामुळे तिच्यामध्ये प्रगल्भता आली असून ती खंबीर होत आहे. शिक्षणामुळे सामाजिक जाणीव विस्तारलेली स्त्री जाचक नियमांच्या चौकटीतून बाहेर पडून जीवन अर्थपूर्ण करत आहे. स्त्री शिक्षणामुळे विस्तारणारी क्षितिजं या लेखात मीराने याचा सविस्तर आढावा घेतला आहे. न्यूज स्टोरी टुडे या चॅनलच्या सर्वेसर्वा अलका भुजबळ यांनी स्वत:च्या कॅन्सरवर मात करत कॉमा हे पुस्तक लिहिले. आज त्यांनी पत्रकारितेत गगन भरारी मारली असून आत्मविश्वास या लेखात स्त्रियांनी स्वत:चे जीवन आनंदात घालवण्यासाठी काय केले पाहिजे हे सांगितले आहे. महिलांनी स्वत:चे आरोग्य जपत सामाजिक बांधिलकी जोपासून समाजाला घडविण्याचा वसा चालवला पाहिजे हे स्वत:च्या आयुष्यातील आव्हानात्मक उदाहरणे देत सांगितले आहे. कविता म्हेत्रे ही म्हसवड मध्ये राहणारी आमची मैत्रीण मी सावित्री ज्योतीबा फुले हा एकपात्री प्रयोग करत महाराष्ट्राभर फिरत स्त्री-पुरुष समानतेचा विचार रुजवत आहे, हे करत असताना कविता आजच्या परिस्थितीवर जे कठोर भाष्य करते ते सर्वांसाठी अंजन घालणारे आहे. सावित्रीबाई फुले व महिला दिन या लेखात सावित्रीबाईच्या कर्तृत्वाचे दाखले देत आपल्या व्यक्तिमत्वात ही सावित्री माऊली सारखे विचार जागवले पाहिजेत. नवविचारांची कास धरत बंडखोर व परिवर्तन करणारे जगले पाहिजे असे कविता सांगतात.

प्राध्यापक डॉक्टर प्रवीण घोडेस्वार यांनी घरकाम स्त्रियांची उपजत जबाबदारी या लेखात घरकाम हे घरातील सर्वांचे असून त्यात सर्वांचीच विशेषत: पुरुषांची समसमान भागीदारी झाली पाहिजे हा विचार ठळकपणे मांडला आहे, स्त्री व पुरुष यांच्यात समन्वय व सहकार्य आवश्यक आहे, स्त्रिया ज्या पद्धतीने शिकून नोकरी व करिअर करायला लागल्या त्या प्रमाणात घरकाम करणाऱ्या पुरुषांची संख्या वाढताना दिसत नाही असे सांगितले आहे. संकेत मुनोत यांनी आजच्या युवा पिढीची लग्नाची समस्या या लेखात आजही आपल्याकडे पारंपारिक निकषातून लग्नं ठरवली जातात, जात व धर्माच्या चौकटीत लग्नाचा विचार केला जातो. लग्न ठरवण्यात जोडीदार निवडीचा कार्यक्रम, लग्नाचा सोहळा या गोष्टी अवाढव्य खर्च करून केल्या जातात, पत्रिका बघून लग्न ठरवले जाते, मुलग्याचे व मुलीचे विचार पटतात का? एकमेकांना ते समजून घेतात का? पालक त्यांच्या संसारात हस्तक्षेप करतात का? मुलगा व्यसनी आहे का? अशा अनेक प्रश्नांचा या लेखात आढावा घेतला आहे. तरुण आणि धडाडीच्या महिला व्यावसायिक स्वप्ना विजया अरुण यांनी बायकांचे व्यवसाय ह्या लेखात बायका करत असलेले निरनिराळे व्यवसाय आणि त्यातून त्यांनी कमावलेली आर्थिक सक्षमता आणि सामाजिक पत ह्यावर आपल्या 'बायकांचे व्यवसाय' ह्या लेखात प्रकाश टाकला आहे.

या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे नोव्हेंबरमध्ये झालेल्या सिंहावलोकन सहलीमध्ये अन्नपूर्णा परिवार मधील काही स्टाफ मेंबर्सनी कविता सादर केल्या. संवाद मासिकामध्ये त्यांनी लिहावे असे त्यांना आवाहन करताच या अंकात दिक्षा गोरे हिने लेकीची आई होताना या लेखात आई व मुली मधील नितळ नाते संबंधावर प्रकाश टाकला आहे. हे नाते गडद, गोड, समृद्ध व पारदर्शी होण्यासाठी आईने प्रयत्नशील राहिले पाहिजे असं तिने लिहिले आहे. मोहिनी देशमुख यांचा 'ती स्वयंसिद्धा' या लेखात स्त्रियांना

स्वत:ला सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करावे लागतात व ते करण्यासाठी स्त्रियांनी काय केले पाहिजे याविषयी माहिती दिली आहे. स्त्रियांनी स्वयंसिद्ध झाल्यानंतर इतरांनीही स्वयं सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचा व्यापक विचार लेखात उद्धृत केला आहे. रेश्मा अभिजीत यांच्या 'कुटुंब घडले की समाज घडतो' या लेखात कुटुंबातील महिलेची भूमिका किती महत्त्वपूर्ण आहे हे विशद केले आहे. मुलगा व मुलगी याला कुटुंबातून सारखीच वागणूक मिळाली पाहिजे, हा समतेचा विचार लेखिका मांडते व स्वाभिमानाने जगण्याचा संदेश देते, प्रणाली पवार, संगीता गजबे, रूपाली यादव, संगीता इंगळे ,भाग्यश्री, रूपाली लटके, दिनकर पवार यांच्या उद्बोधक कविता ही या अंकात वाचकांना वाचता येतील.

अन्नपूर्णा परिवार आर्थिक सक्षमते बरोबरच कामाचे एकत्रित डॉक्युमेंटेशन करण्यावर भर देत आहे, आर्थिक सक्षमतेचा इतरांनाही लाभ व्हावा म्हणून देखील प्रयत्नशील आहेत. त्यामुळेच अन्नपूर्णाच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या मॉडेलवर एक पुस्तिका यावर्षी प्रकाशित केली आहे. अन्नपूर्णाच्या संस्थापक डॉ. मेधा पुरव सामंत यांचे प्रेरणादायी कार्य चरित्र 'आम्ही स्वयंपूर्णा' हे ऑगस्टमध्ये प्रकाशित झाले आहे, हे तुम्ही जाणताच. अन्नपूर्णा परिवाराच्या कामाची दखल सातत्याने घेतली जाते आहे, सर्वोत्कृष्ट वुमन फ्रेंडली इन्स्टिट्यूट हा पुरस्कार तसेच महाराष्ट्रामधील उत्कृष्ट महिला सहकारी संस्था असे दोन पुरस्कार अन्नपूर्णाला मिळाले आहेत. मेधा पुरव सामंत व अन्नपूर्णा टीमने आर्थिक सक्षमीकरणासाठी घेतलेल्या कामाची ही पोचपावती आहे. मार्चच्या महिला विशेषांकात महिलांच्या विविध समस्यांचा व कर्तृत्वाचा उहापोह विविध लेखकांनी घेतला आहे जो अन्नपूर्णा परिवारातील आमच्या सभासदांना वाचनीय वाटेल याची खात्री आहे. हा अंक तयार होत असताना अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक डॉ. मेधा पुरव सामंत यांचे मार्गदर्शन मोलाचे लाभले आहे. प्राची बापट ह्यांनी लोकवाङ्मय प्रेस व अंकाची जुळवाजवळ यासाठी घेतलेले परिश्रम मोलाचे आहेत. अंजली पाटील ह्यांनी अन्नपूर्णा परिवाराच्या तीन महिन्यातील उपक्रमाचा आढावा घेतला असून तो तुम्हाला तुम्ही केलेल्या कामाची आठवण देईल. ऋचा पाटील हिने मुखपृष्ठ फोटो व अंक सजावटीसाठी जे जे आवश्यक आहे ते तत्परतेने दिले. लोकवाङ्मय गृह गेले अनेक वर्ष संवाद त्रैमासिक सुबक व नेटकेपणे छापून देत आहे, याबद्दल त्यांचे मनापासून आभार. हा अंक आपल्या हाती सुपूर्द करताना परिवर्तनाच्या दिशेने आपण वाटचाल नक्की करू अशा आशावादी विचारावर आपण येऊन ठेपलेलो आहोत.

❖❖❖

# अन्नपूर्णा परिवारातर्फे स्मरणांजली





कॉ. बाळासाहेब पिसाळ

कॉ. सुरेश धोपेश्वरकर

# स्त्रीशिक्षणामुळे विस्तारणारी क्षितिजं

■ प्रा. मीरा कुलकर्णी

'ताई... गावागडनं नवऱ्याला घेऊन आले बघा...! अगदी मरायला टेकलाय... दारू पिऊन पिऊन! त्या सवतीनं... सखीनं... फक्त पैसा काढून घेतला नवऱ्याचा...!' चार दिवस सुट्टी घेऊन गावाला गेलेली सुनीता नवरा घरी आल्याच्या आनंदात वृत्तांत सांगत होती... आणि सवतीच्या नावानं शंख करत होती. आता नवरा दारू पिणार नाही तो लई चांगला हाय असं म्हणताना ''आता दारूच्या दुकानात नोकरी करणार हाय त्यो? असं सांगितलं तेव्हा छदमी हसू आलं... कीव आली... पण त्याहीपेक्षा राग आला तिचा..!'' सुनीताच्या नवऱ्यानं दुसरं लग्न केलंय. अनेक बायकांवर पैसा उधळलाय... त्यामुळे सुनीता कर्जबाजारी झालीय... शिवाय त्या त्या वेळचा मनस्ताप वेगळाच. दारूच्या नशेत तो असताना... काय काय सोसलंय तिनं. हिचाच पैसा काढून घ्यायचा आणि हिला सोडून गावभर फिरायचा. यावर ''काय करणार ताई... कुकवाचा धनी हाय... घरी बसला तरी लई हाय...'' सुनीता असं काय बाय सांगत होती. इकडे माझा संताप अनावर... ''अगं दारूच्या दुकानात काम करणाऱ्याची दारू कशी सुटेल? सगळीकडं फिरून पैसा संपला की येतो तुझ्याकडे... तू कर्ज फेडत बसतीस... दे हे सोडून सगळी...'' मी त्यावर ''ताई... नगा असं बोलू... दहा घर फिरून शेवटी माझ्याकडंच आला नं त्यो...!'' याचा तिला अभिमान. आणि मी हतबल.

सुनीता अशा हजारो स्त्रियांचं प्रातिनिधिक रूप ''भला हो बुरा हो... मेरा पती मेरा देवता है'' या वृत्तींच्या स्त्रियांचं. शिक्षण नाहीच पण समाज व्यवस्था आणि संस्कृतीचा जबरदस्त पगडा असणाऱ्या अशा सुनीता आजही जागोजागी आहेत. अनिता सॉफ्टवेअर इंजिनीअर. आई, वडील सुशिक्षित, सुसंस्कृत. उत्तम कंपनी, उत्तम पगार पण लग्न होत नाही ही समस्या. कारण तिच्यापेक्षा मुलगा शिक्षण, संपत्ती, यादृष्टीने श्रेष्ठ हवा. ही घरच्यांची धारणा. पण नवरा प्रत्येक बाबतीत वरचढ हवा ही कल्पना चुकीची आहे. दोघे समान स्तरावर असले किंवा नोकरी, पगाराने बायको वरचढ असावी. तर सुखात काही फरक पडणार नाही हे तिनं आई-वडिलांना समजावलं आणि रूढ कल्पनेतून बाहेर आली.

मुक्ता डॉक्टर... उच्चविद्याविभूषित. नवराही डॉक्टर. प्रेमविवाह दोघांचा. पण... मुक्ताला कर्ज काढून मॅटर्निटी होम काढायचं होतं. पण नवऱ्याने कर्ज काढण्याला विरोध केला. कर्ज काढणं आमच्या प्रतिष्ठेला शोभत नाही म्हणाला आणि मदत करायलाही तयार नाही. मग तिनं नवऱ्याचं न ऐकता कर्ज काढलं. त्याचा राग आला त्याला. स्वातंत्र्याचा गैरफायदा घेतेस म्हणाला. कर्ज काढणारी बाई पत्नी म्हणून मी मिरवू शकत नाही असं स्पष्ट सांगत करीअर करायचं असेल तर घटस्फोट घे. असं स्पष्ट सांगून कृतिशील झाला. पुरुषी मनोवृत्ती. हे या घटनेचं उत्तर आहे.

ही प्रातिनिधिक उदाहरणं आहेत. शिक्षण आणि स्त्रियांची मानसिकता... शिक्षण आणि स्त्रियांच्या सद्य:स्थितीतलं वास्तव यावर प्रकाश टाकणारी. अशिक्षित सुनीतापेक्षा अनिता आणि मुक्तानं घेतलेल्या ठाम भूमिका या शिक्षणामुळे प्रगल्भ झालेल्या स्त्री-मानसिकतेची उदाहरणं आहेत. आपलं जीवन फार मोलाचं आहे. ते अगदी आपलं आहे आणि कुणासाठी तरी अविचारानं उधळून टाकावं एवढं ते स्वस्त नाही. ही जाणीव स्त्रियांना झाली. ती 'स्व' केंद्री होऊन निर्णयक्षम झाली. प्रगल्भ झाली.

पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला स्वतंत्रपणे विचार करण्याची मुभा नव्हती. तिचं स्थान दुय्यम होतं तिला महत्त्व दिलं तर तिचं म्हणणं ऐकून घ्यावं लागेल तिला अधिकार द्यावे लागतील हे या व्यवस्थेला मान्य नव्हतं. पण पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी स्त्रियांना दुय्यम लेखण्याची गरज नाही. तिला येणाऱ्या अनुभवातून तिला योग्य जीवनदृष्टी मिळते आणि त्यातून ती विचार करायला लागते. ही जाणीव शिक्षणाच्या प्रभावामुळे अधिक प्रबळ झाली.

मुलींना शिकवलं नाही आणि मुलेच शिकत राहिली. तर गृहसौख्यामध्ये अडचणी येतात. हा विचार तग धरू लागला. कारण मुलींनी पैसा मिळवून आणला तरी त्याचा विनियोग करण्यासाठीचं ज्ञान जर स्त्रियांकडे नसेल तर काय उपयोग? कामानिमित्त घराबाहेर पडलेल्या पुरुषाच्या मागे. कुटुंबातली स्त्री खंबीरपणे घर चालवते, निर्णय घेते. आता तर, भाजीपाला, वाणसामानापासून बँकांच्या व्यवहारापर्यंत तिला सगळ्या गोष्टींत आघाडीवर राहणं अपरिहार्य ठरलंय. मुलांचं शिक्षण, आरोग्य, छंद याकडे ती अधिक डोळसपणे पाहायला लागली आणि कुटुंबातल्या सगळ्या घटकांची, (आई, वडील, नातेवाईक) जबाबदारी

प्राधान्यानं घेत स्वत:लासुद्धा अद्ययावत ठेवायला लागली.

शिक्षण हे सगळ्या प्रकारच्या प्रगतीचं साधन आहे. पाया आहे. त्यामुळे शिक्षणात मागे राहणं आता स्त्रियांना आणि समाजालाही परवडणारं नाही. हितकारक तर नाहीच नाही.

अर्थात त्यासाठी समाजानं, कुटुंबानं सर्वसमावेशक आणि व्यापक होणं गरजेचं आहे. तरच हातात हात घालून परिवर्तन होणं शक्य होईल. आपण जुने आदर्श आणि तत्त्वं कुरवाळत बसलो तर ज्ञानार्जनानंतर, शिकल्यानंतर, कणखरपणे जगण्याला, सामोऱ्या जाणाऱ्या स्त्रियांच्या अस्मिता खुंटतील. कारण शिकलेल्या या स्त्रियांसमोर अनेक आव्हानंही आहेत. त्यांना व्यवस्थेत बदल करायचा आहेच पण वेळ आली. तर व्यवस्थाच बदलावी लागेल इतक्या धाडसीपणाने आणि स्वच्छ बुद्धिनिष्ठ विचारानं. तिला जगण्याला सामोरं जायचं आहे. प्रत्येक वेळेला परिवर्तन घडावं, बदल व्हावेत हा या शिकलेल्या स्त्रीचा अट्टहास नाही. पण किमान आपल्या प्रश्नांना, समस्यांना उत्तरं मिळावीत. तिच्या अनुभवाची, कर्तृत्वाची दखल घेतली जावी. हे जरी समाजाच्या मनात ठसले, बिंबले तरीसुद्धा परिवर्तन शक्य आहे. ही जाणीव शिक्षणामुळे विकसित झाली. म्हणूनच बदलणाऱ्या काळाचं भान ठेवून आपल्याला विचारांना नवी आयामं द्यावी लागतील. त्यांची पुनर्रचना करावी लागेल. बुद्धिनिष्ठतेला वर्तमानकाळाशी जोडावं लागेल आणि परंपरेला आधुनिकतेचा संदर्भ देत त्यांची नवी व्याख्या बनवावी लागेल. केवळ स्त्रियांचा त्याग, समर्पण, बलिदान याबद्दल वारंवार बोलून तिला 'त्या' त्यागाच्या कोंदणातच अडकवून ठेवण्यापेक्षा त्या लादलेल्या खुराड्यातून बाहेर पडून अनुभव वाटून घेतले तर दोघांचीही वाढ होईल. संघर्ष संपेल. खरं तर शिक्षणानं समृद्ध अनुभवविश्व बनलेल्या स्त्रियांनी. त्यांचे हे अनुभव व्यापक स्वरूपात समाजासमोर यायला हवेत. या जाणिवेतूनच आत्मकथन, कविता अशा अनेकविध साहित्यप्रकारातून स्वत:ला व्यक्त करायला सुरुवात केली. यामध्ये केवळ स्त्रीच्या समस्या मांडणं हा हेतू नाही. तर तिला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. तीचा 'स्व'सुद्धा महत्त्वाचा आहे. ही जाणीव बिंबवायची आहे.

स्त्रिया या स्वरूपाचं मुक्तचिंतन करायला लागल्या. मोकळेपणानं जगायला लागल्या. बाई शिकली की कुटुंब मांडतं ही जुनी विचारप्रणाली आता शिक्षणाने बदललेल्या मानसिकतेमुळे मागे पडली. पण स्त्रिया घरकाम करतात. हे गृहितच असल्याने त्यांच्या कष्टाला महत्त्व, मोल न देता कुटुंबासाठी त्याग करते असा तिचा भावनिक गौरव करून तिला कुटुंबात बांधून ठेवले आणि हे तत्त्व न स्वीकारणाऱ्यांना स्वैराचारी, स्त्रीमुक्तीवाल्या असं म्हणलं गेलं. मग कधी त्याला विरोध झाला, तर कधी उपरोधानं हेटाळणी झाली. या नकाराची.

आपल्या संस्कृतीनं पुरुषांना मुळातच स्वतंत्र विचारांचे आणि अधिकाराचे ठरवले. तर स्त्री भरणपोषणाशी संबंधित भावनांना प्राधान्य देणारी, नातेसंबंधांचा विचार करणारी साहजिकच स्वातंत्र्यापेक्षा परावलंबित्व मानणारी अशी प्रतिमा होती. लिंगभेदामुळे ती अवलंबून आहे ही भावना बळावत होती. त्यामुळे स्त्रियांचं स्वतंत्र अस्तित्व मान्य करणं गरजेचं होतं. कष्टाळू, सहनशीलता, कुशाग्र बुद्धिमत्ता, कामातला उरक अशी स्त्रियांची अनेक वैशिष्ट्य आहेत जी पुरुषांच्या वैशिष्ट्यांपेक्षा कुठेच कमी दर्जाची नाहीत. भावना आणि बुद्धी यांचा एकत्रित समन्वय साधण्याचं सामर्थ्य स्त्रियांकडे आहे. पारंपरिक, सांस्कृतिक मूल्यांमध्ये आपण तिला अडकवतो पण संस्कृती प्रगल्भ करणं म्हणजे विज्ञानाला, आधुनिकतेला, नवमूल्यांना टाळणं नसून या सगळ्यांना आत्मसात करणं असा आहे. कारण जगतानाचे या सर्वस्वाचे अनुभव. संस्कृतीला मजबूत करतात. त्यामुळे सभ्यता एकमेकांना केलेलं सहकार्य, नैतिकता, आत्मिक समाधान या सगळ्यांचा स्वीकार करणं. तिला या शिक्षणाच्या संधीमुळे शक्य झाले.

महात्मा फुले, सावित्रीबाई, ताराबाई शिंदे अशा अनेकांचे त्या काळाचे योगदान त्यासाठी फळीला आले. फुल्यांनी स्त्रियांच्या आधुनिक शिक्षणाला शाळा स्थापन करून सुधारणेच्या चौकटीत आणले. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यामुळेच स्त्रीभानाचे कृतिशील पाऊल उचलता आले. आधुनिक शिक्षणामुळे तिला अनेक संधी उपलब्ध झाल्या आणि उंबऱ्याबाहेरच्या खुणावणाऱ्या जगाला तिने प्रतिसाद दिली. सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाला मग बराच पाठिंबा मिळाला आणि मग शाळा, शैक्षणिक संस्था एक पाऊल पुढे टाकण्याचं माध्यम झाल्या.

पर्यायाने शिक्षणामुळे कुटुंब व्यवस्थेमधल्या स्त्रियांचा दर्जा सुधारला. ज्या प्रथा, परंपरेत ती अडकली होती त्याचा प्रभाव कमी झाला. स्त्रीचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि माणूस म्हणून तिच्याकडे बघण्याची कृती बळावली.

९०च्या दशकात सुशिक्षित नोकरदार स्त्रिया, सार्वजनिक जीवनात मोठ्या प्रमाणावर आल्या, शिक्षण, रोजगार, नोकरी, व्यवसाय यामध्ये या स्त्रिया आघाडीवर आहेत. स्त्रीसबलीकरण या नावाखाली अपेक्षित उद्दिष्टांसाठी प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी शिक्षणाची पातळी वाढवून, कधी सर्वच क्षेत्रांतला तिचा सहभाग वाढवून कधी वेगवेगळ्या समित्यांच्या वै. पदांवर तिची नियुक्ती करून हे साधण्याचा प्रयत्न झाला. स्त्रियांच्या प्रश्नांच्या अनुषंगाने किंवा त्या त्या क्षेत्रातील (विज्ञान, आरोग्य, शिक्षण वै.) अभ्यासू स्त्रियांच्या सहभागाने चर्चासत्र परिसंवाद घडू लागले आणि साहित्य, वैचारिक लेखन या माध्यमातून विचारमंथन व्हायला लागले. ही शिक्षणामुळे झालेल्या बदलाची फलश्रुती आहे.

स्त्री पुरुषांना संस्कृतीनं बहाल केलेल्या जुन्या, पारंपरिक भूमिका गेल्या पन्नास वर्षांत झपाट्यानं बदलल्या. बायका शिकल्या,

कमावत्या झाल्या म्हणून फार शेफारल्या आणि त्यामुळे. आज कुटुंब तुटते, घटस्फोट होतात ही भावना बहुतेकांची असते. पण ज्या कुटुंब व्यवस्थेचं आपण कौतुक करतो. जी कुटुंब व्यवस्था प्रत्येकाच्या जगण्याचा पाया आणि आधार आहे. ती केवळ बाईच्या त्यागावर तोललेली होती. हे शिकलेल्या या स्त्रीनं उदाहरणांसहित सिद्ध केलं. शिक्षणानं वैचारिक कक्षा रुंदावल्या स्त्रीनं.

आता त्यागाची एकतर्फी सक्ती अमान्य केली. एकटीनंच त्याग करायचा हे तिनं नाकारलं. घर, कुटुंब, मुलं, नातेवाईक हवेतच पण त्या फक्त केवळ सर्वांमध्येच वेळ, शक्ती आणि बुद्धी खर्च करणं तिनं नाकारलं. मदतीची, सहकार्याची तिला अपेक्षा आहे आणि कुटुंबीयांकडून नवरा, मुलाकडून ती मिळत नाही. त्यामुळे तिचं स्वयंपूर्ण जगणं, ध्येयानं झपाटून जाणं, करीयरसाठी भरारी घेणं यात अडथळे येतात आणि कुटुंब व्यवस्था डळमळते.

शिक्षणामुळे आलेल्या खंबीरपणामुळे पुरुषांच्या दुटप्पी वागण्याचा तिने कडाडून विरोध केला. म्हणजे हे पुरुष स्वत:च्या आई, बहिणींच्या सन्मानाबद्दल संवेदनशील असतात तेवढे त्रयस्थ महिलांबाबत असतात का? घरात आई-बहिणींचा आदर आणि बाहेर परिस्थितीबद्दल अनादर, बाहेर इतर स्त्रियांवर अन्याय होताना मागे हटणारा, मदतीला धावून न जाणारा पुरुष, घरामध्ये मात्र या बाबतीत सतर्क असतो.

म्हणूनच घरातल्या कामवाल्या बाईपासून सहकारी, मैत्रिणी, घरातील स्त्रिया यांचा माणूस म्हणून विचार केला तरच बदल घडेल हा विचार त्या आग्रहाने मांडायला लागल्या.

तलवारींऐवजी लेखणी-शिक्षण हे नवीन शस्त्र सावित्रीबाई फुल्यांमुळे मिळालं. महाराष्ट्रातल्या स्त्रीजीवनाची सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ बदलण्यासाठी हे पूरक वातावरण होतं.

बुद्धिमान असणं प्रत्येकाला आवडतं आणि शिक्षणाने बुद्धिमत्ता वाढते. हुशार व्यक्ती सगळ्यांना आवडते आणि ज्ञानी व्यक्तीबद्दल सर्वसामान्यांना आदर असतो. बऱ्याच स्त्रिया अनेक कलांमध्ये, छंदांमध्ये निपुण असतात. स्वयंपाकात हुशार असतात. काही बायका बोलण्यात, व्यवहारात हुशार असतात. ही हुशारी मोठ्या मनाने आणि अत्यंत आनंदाने आणि अभिमानाने कुटुंबीयांसह समाजाने स्वीकारायला हवी. अन्यथा नात्यात वेगळे सूर उमटायला लागतात.

खरंतर घरातलं काम, दोन्ही वेळचा स्वयंपाक करून नोकरी करणारी स्त्री. सर्वांनाच आवडते. पण तिनं ठरावीक वेळी परतावं हा अट्टहास असतो. झालाय वेळ तर तिला कारणं द्यावी लागतात. याउलट पुरुष जर कामानिमित्त जास्त वेळ बाहेर राहिला तर ते खूप बिझी असतात म्हणून त्यांचं कौतुक होतं. कितीही शिकली तरी स्त्रीला घरातून बाहेर पडताना का? कुठे? कशासाठी? या प्रश्नांची कारणमीमांसा द्यावी लागते. त्या घराबाहेर जातात तेव्हा त्यांच्या डोक्यावर एक अदृश्य घर सोबतीला असते. पण त्याचाही निषेध ही शिकलेली स्त्री करत नाही. कारण तिच्या प्रगल्भ विचारांनी हे स्वीकारलेलं असतं.

खरं तर नोकरी करणाऱ्या स्त्री यांच्या समस्यांना दृष्टिआड करू नये. डॉक्टर्स, बँका, वैमानिक, पोलीस, नर्स, शिक्षिका, संशोधनाचं क्षेत्र असो किंवा संगणकाचं. प्रत्येक ठिकाणचे ताणतणाव भिन्न असतात. स्त्रियांना योग्य तो सन्मान मिळावा ही अपेक्षा असली तरी तो मिळतोच असं नाही.

वर्ण, जात आणि पुरुषी वर्चस्वाला सामोरं जात, टक्कर देत स्त्रियांनी वेगवेगळ्या क्षेत्रांत केलेली कौतुकास्पद कामगिरी आणि घेतलेली झेप कौतुकास्पद आहे. आता लाखोंच्या संख्येनं स्त्रिया पदवीधर होतात. उच्च शिक्षणातही त्या अग्रेसर आहेत. महत्त्वाचे म्हणजे उच्च शिक्षणात स्त्री पुरुष विषमता कमी झालीय हे प्रकर्षानं जाणवतं.

शिक्षणाने प्रगल्भ झालेल्या स्त्रियांनी. पुरुषी वर्चस्वाची प्रतीकं आणि परंपरा यांचं बंधन नाकारलं. मग मंगळसूत्र घालायलाच हवं, नवऱ्याचं आडनाव सक्तीचं नाही. मुलांचा सांभाळ सर्वांनी मिळून करायचा, आर्थिक स्वातंत्र्य सक्तीचं. घरकामात मदत हवीच. अशा अनेक प्रश्नांमध्ये या स्त्रियांनी स्वत:ला आवडेल, पचेल अशी ठाम भूमिका घेतली.

नवऱ्याला एकेरी नावानं हाक मारत सहकारी / मैत्रीची भावना प्रबळ करणारा सूर तिला शिक्षणामुळे मिळाला. नवरा म्हणजे परमेश्वर ही भावना मागे पडली आणि माणूस म्हणून त्याला स्वीकारण्याचा कल वाढला.

एकूणच स्त्रिया सुजाण असतात. त्या बुद्धीबरोबरच मनानेही विचार करतात. बुद्धीला जे पटेल त्यानुसार निर्णय घेण्याची धमक शिक्षणामुळे मिळालीच पण आपल्या वर्तनाचे परखड स्पष्टीकरण देण्याची क्षमताही त्यांच्यात निर्माण झाली. शिक्षण, व्यवसाय, नोकरी इ. अनेक कारणांमुळे घराबाहेर पडणाऱ्या स्त्रिया आता रोमँटिक प्रवृत्तीपेक्षा जास्त प्रगल्भ झालेल्या जाणवू लागल्या.

स्वत:चं आयुष्य स्वत:ला आवडेल तसं आनंद घेत जगायचं. तडजोड करायची नाही. अशा स्वतंत्र जगण्याचा त्यांना अभिमान वाटायला लागला. स्वत:ला इतरांच्या संदर्भानुसार शोधण्यास नकार देणारी जाणीव या शिक्षणाने प्रगल्भ झाली.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत जगताना स्त्री विरुद्ध पुरुष किंवा फक्त पुरुष म्हणेल तसं. असं. व्यवस्थेचं स्वरूप न राहता स्त्री आणि पुरुष दोघांनी मिळून समानतेनं व्यवस्थेला सामोरं जाऊ या हे भान आलं कारण सुखी होणं हे परस्परावलंबी असतं. शिक्षणाने झालेल्या अशा ठाम मतामुळे ती आता आपल्या इच्छा-आकांक्षा न मारता त्यांना महत्त्व देऊन जगते. जे नको, मान्य नाही त्याला ठामपणाने नकार देण्याचं सामर्थ्य तिच्यात आलंय. ती स्वत:चा

शोध घ्यायला लागली. हे करताना कधी तिला खाचखळग्यांना, मनस्तापांना सामोरं जावं लागलं. तरी शिक्षणामुळे खचून न जाण्याची ताकद तिला मिळालीय. तिचं समाजभान विस्तारल्यामुळं आलेल्या धाडसातून ती तिचं चालणं, विचार करणं, तत्त्वांशी एकनिष्ठ राहणं स्वीकारते.

लिखित राज्यघटनेत आंबेडकरांनी मूलभूत हक्कांचा समावेश केलाय. कारण व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर इतर कोणत्याही संघटनांचे किंवा शासनाचे आक्रमण होऊ नये हा त्यामागचा उद्देश आहे. बुद्धीला भावनेचे परिमाण आणि सुंदर ध्यासाला ज्ञानात्मक बनवणं या शिकलेल्या स्त्रियांना चांगलं जमलं. त्यामुळे प्रसंगी मातृत्व नाकारणं, शरीरसौंदर्याचे निकष बदलणं हे निर्णय क्रांतिकारक वाटले. परिवर्तनासाठी अनेकविध उपलब्ध असणारे मार्ग स्वीकारणे आणि त्याच्या प्राप्तीसाठी अवकाश उपलब्ध करून देणं गरजेचं आहे आणि त्यासाठी स्त्रीयांकडे बघण्याची तुच्छ वृत्ती सोडावी लागेल आणि स्त्रियांप्रतिचा रागही. उपयोगी नाही. हे वास्तव समाजमनाला पटलं आहे.

आज कोणत्याही शैक्षणिक संस्थेत गेलो तर आपल्याला मुलींची संख्या ६०-७०% पर्यंत असलेली दिसते. गुणवत्ता यादीमध्ये ३०-४०% मुली असतात. इंजिनीअर, वैमानिक, महाविद्यालयाचं प्राचार्यपद, माध्यमांतल्या नोकऱ्या यामध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणावर आहेत हे सत्य आपण पाहतोच. स्त्रियांची काम करण्याची पद्धत वागण्या, बोलण्या-चालण्यात असलेला आत्मविश्वास वाढला आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक अशा सगळ्या क्षेत्रांत स्त्रियांचा वावर वाढलाय. कर्तृत्व सिद्ध करण्याची प्रवृत्ती वाढलीय.

सौंदर्याच्या क्षेत्रात पार्लर चालवणे असो किंवा आता इंटरनेटच्या जगात टेक्नोसॅव्ही असणं अनेक पटीनं वाढलंय. प्रत्येक स्त्रीकडे मोबाइल आहे. त्यामुळे जनसंपर्क वाढलाय आणि टी.व्ही. वै. माध्यमांमुळे समाजवास्तव तिच्यापर्यंत पोहोचलंय आपण समाजशील असल्यानं बदल अपरिहार्यपणे स्वीकारायला हवेत. फक्त हे बदल समजण्यासाठी जशी वैचारिक पक्वता हवी तसेच मोठं मनही हवं. नव्या पायवाटा शोधून त्या वाटेनं चालणं गरजेचं आहे. नव्या संकल्पना स्वीकारून त्या अंगीकारणं गरजेचं आहे. हे भान शिक्षणाने जागृत केले.

विज्ञान तंत्रज्ञानानं स्त्रियांचं जगणं सुकर केलं आहे आणि स्त्रियांना उद्योग, व्यवसायाच्या, ज्ञानप्राप्तीच्या संधीसुद्धा दिल्या आहेत. मिक्सर, फ्रिज, वॉशिंग मशीन, वाहनं, मायक्रोव्हेव, मोबाइल यामुळे तिचे कष्ट कमी झालेत. जगणं गतिमान झालंय. स्त्रीयांनी तिच्या अंगभूत गुणांनी आणि हुशारीने या सगळ्या नव्या क्षेत्रात पाय घट्ट रोवले आणि क्रांती केली. गुणवत्ता आणि मेहनतीच्या बळावर स्वीकारलेल्या प्रत्येक क्षेत्रातलं क्षितिज तिनं पादाक्रांत केलं. अगदी पापड उद्योगापासून, हॉटेलची शेफ, स्वयंपाकी, विणकाम, शिवणकाम, फॅशन डिझायनिंग, ब्युटीपार्लर, शेतीव्यवसाय यापासून बचतगटापर्यंत तिने विविध मार्ग स्वीकारले. आज ऑनलाइन शॉपिंग करण्यात, सोशल मीडियाचा वापर करण्यात महिलांचे प्रमाण जास्त आहे.

आजची गृहिणीसुद्धा उच्चविद्याविभूषित आहे. महत्त्वाकांक्षी आहे. त्यामुळे घर की करीअर? हा प्रश्नच तिच्यापुढे नाही. ती पहिल्यांदा करीअर करेल. नंतर घर संसार यांना प्राधान्य देईल. अशी दुहेरी क्षमता तिने सिद्ध केलीय. विज्ञानामुळे कुटुंबनियोजनाची साधनं उपलब्ध करून दिलीयत. तरी तिच्या सृजनशक्तीचा सन्मान करत. मातृत्वासाठी त्याअनुषंगाने आश्वासक वातावरण तयार करून बालसंगोपनाची जबाबदारी सर्वांनी स्वीकारली तर तिच्या करीयरमध्ये अडसर येत नाही.

शिक्षणाने बदललेले स्त्रियांचे जीवन तिच्या जगण्याच्या प्रत्येक टप्प्यावर जाणवते. पूर्वी घराणं बघून ठरवून लग्न व्हायची. आता घराण्याइतकेच व्यक्तीला समजून घेणं. व्यक्तिविचार महत्त्वाचा वाटतो.

पूर्वी पतीच्या निधनानंतर मुलांसाठी जगणारी सासर-माहेर यांना सांभाळत, माणसांचा आधार घेत जगणारी. स्त्री आता शिक्षणानंतर याबाबतीत अधिक समंजस आणि स्पष्ट भूमिका घेऊन वावरताना दिसते. ती आता वैधव्याकडे. जुन्या पारंपरिक दृष्टीने पाहात नाही. तर हे एक अपरिहार्य वळण आहे. या समंजसपणाने. पुन्हा नव्याने, जिद्दीने जगण्याला सामोरी जाते. घराबाहेर पडते, आवडीचे छंद जोपासते. राहून गेलेलं मनासारखं जीवन जगते.

इतकेच नाही तर स्त्रियांच्या शारीरिक प्रश्नासंबंधीचे जे अनुभव आहेत त्याची आता त्या मोकळेपणानं चर्चा करायला लागल्या किंबहुना त्याविषयीची स्वत:ची मतं धाडसानं मांडायला लागल्या. मासिक पाळीचा अनुभव, गर्भारपण, बाळंतपण, मेनॉपॉज, गर्भपात शरीरसंबंधांविषयीची उदासीनता हे अत्यंत खासगी प्रश्न स्पष्टपणाने मांडण्याचा परिपक्व आणि अत्यंत गरजेचा विचार शिक्षणामुळे विस्तारला. स्त्रीला आपल्या सामर्थ्याची जशी कल्पना आहे तशीच मर्यादांची जाणीव आहे. त्यामुळे स्वत:ला आवडलेल्या, पटलेल्या मार्गावरून ती ठामपणे आजही चालत राहिलीय. चांगल्या शिकलेल्या स्त्रिया उत्तम पत्नी होतात. सुशिक्षित माता होतात. ती घरसंसार, घरच्यांचं स्वास्थ्य उत्तम सांभाळते, मुलांचं संगोपन उत्तम करते आणि सुशिक्षित स्त्री नवऱ्याला उत्तम साथही देते.

सुशिक्षित समाज मात्र धूर्तपणाची भूमिका घेतो आणि तटस्थ राहतो. म्हणजे विचार मांडताना स्त्रियांचा कैवार घ्यायचा आणि वैयक्तिक आयुष्यात स्त्रियांना न्याय द्यायची वेळ येते तेव्हा मात्र सोईस्कर भूमिका मांडली जाते.

एकूणच स्त्रिया आधुनिक आणि प्रगल्भ संस्कृतीशी स्वत:ला

जोडू पाहायला लागल्या. त्यांचं अनुभवविश्व बदललं. तिच्या अनुभवांना अनेकविध क्षेत्रातल्या मार्गांचे दाखले मिळाले. त्यामुळे अर्थातच सामाजिक आव्हानांना स्वीकारण्याची तिची समज वाढली. दृष्टिकोन बदलला आणि तिच्यातला भाबडेपणा संपून ती अधिक प्रगल्भ झाली. धाडसानं बोलू लागली. इतकेच नाही तर स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, न्याय्य, हक्क या विषयांवर सार्वत्रिक चर्चा व्हायला लागल्या तशी सरकारी धोरणं, योजना, कार्यक्रम तयार व्हायला लागली. स्त्री-पुरुष माणूस म्हणून समान आहेत हे अधोरेखित झालं आणि तिचं व्यक्ती म्हणून असलेलं महत्त्व मानलं गेलं.

पण...! पण... आजही आपल्याकडे स्त्रीची माणूस म्हणून सुरक्षितता किती? हिंसेपासून मुक्ती किती? आर्थिक स्वातंत्र्य, सुरक्षितता किती? या प्रश्नांची उत्तरं साशंक मनानेच द्यावी लागतील. कारण शिक्षणासंदर्भात विचार करताना दलित स्त्री, आदिवासी स्त्री, ग्रामीण भागातली स्त्री किंवा अर्धशहरी किंवा शहरी स्त्री अशा अनेक आयामांना वेगवेगळे तपशील आहेत. त्यांच्यासाठी शिक्षणाची परिभाषा काय? याचा विचार करावा लागेल.

कारण कोणत्याही क्षेत्रातल्या स्त्रीचं बाईपण ओलांडून तिचं जबाबदार आत्मनिर्भर व्यक्तिमत्त्व घडवणं याकडे आपला कल असायला हवा. तिला प्रामुख्याने स्वत:शी संवाद साधता यायला हवा. २०व्या शतकात बौद्धिक वातावरणात बदल झाला. धार्मिक कर्मठपणा कमी झाला. महाराष्ट्रात सुधारणेचं वारं वाहू लागलं आणि स्त्रियांना मिळणाऱ्या विकासाच्या संधीमुळे स्वयंनिर्णय घेणं सोपं झालं.

आपल्या मनाची क्षितिजं रुंदावण्यासाठी आणि सामाजिक जाण वाढवण्यासाठी शिक्षणाचा उपयोग होतो. शिकणं म्हणजे अधिक जबाबदारी घेणं आणि चुकीच्या गोष्टींना नकार देणं किंवा त्या दूर करण्याचा प्रयत्न करणं होय. पुरुषसत्ताक पद्धतीत मिळालेलं दुय्यम स्थान आणि शिक्षणानं आलेलं आत्मभान यामुळे तिचं समाजभान विस्तारलं आणि फार आकांडतांडव न करता स्त्री पुरुष साहचर्य निर्माण करत तिने स्वत:चे आणि पर्यायाने कुटुंबाचे अनेक प्रश्न सोपे केले.

कारण खरं पाहिलं तर पुरुषच घरातल्या बहुतांश गोष्टींसाठी स्त्रियांवर अवलंबून असतात. घरातली स्वच्छता, आदरातिथ्य, देवधर्म, स्वयंपाकपाणी, मुलांना वाढवणं, आजारपणं काढणं, नातेवाईक सांभाळणं या गोष्टी बायकाच करतात. बायको सासरच्या घरात नवीन असते आणि नवऱ्यापेक्षा वयाने लहान असून सारे करते, पण वयाने मोठा असणारा, त्याच घरातला नवरा मात्र ते करू शकत नाही. व्यवस्थेच्या या चौकटी आहे तशा स्वीकारण्यापेक्षा त्या चौकटींमध्ये स्वत:साठी जागा निर्माण करायची किंवा प्रसंगी त्या चौकटीची बंधने झुगारून द्यायची. हे ठरवण्याचं स्वातंत्र्य तिनं स्वीकारलं.

शिक्षणामुळे समाजव्यवस्थेतल्या पुरुषप्रधान व्यवस्थेतली हिटलरवृत्ती नरम झाली. स्त्रीला स्वत:कडे, समाजाकडे, कुटुंबातल्या नात्यांकडे पाहण्याची नवी वृत्ती मिळाली आणि विषमतेला आव्हान देण्याची तिची जाणीव अधिक प्रगल्भ झाली. परंपरेत लादलेल्या भूमिकांना नकार देण्याची क्षमता शिक्षणाच्या व्यापक दृष्टिकोनाने मिळाली. समाजातल्या आणि कुटुंबातल्या निर्णयप्रक्रियेत आता तिचं मत मांडण्याची आणि समान सहभागाची वृत्ती स्वीकारार्थ मानली गेली.

'सातच्या आत घरात' अशी बंधने घालण्यापेक्षा तिला सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणं ही आपली जबाबदारी आहे ही वृत्ती तग धरू लागली. स्त्रियांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण मिळाले. पोलीस गस्त वाढवला गेला, हेल्पलाइन नंबर, महिलांच्या तक्रारीची दखल घेणं, महिलांच्या डब्यात सुरक्षारक्षक नेमणं. या आणि अशा किती तरी उपायांमुळे तिच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना झाल्या आणि त्यामुळे घटना घडल्यावर उपाय करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक उपायांची गरज लक्षात आली.

एकूणच स्त्रियांना येणारे अनुभव आणि शिक्षणाने रुंदावलेल्या विचारांच्या बौद्धिक कक्षा त्यांना कुटुंबाबाहेर नेतात आणि बाहेरच्या व्यापक जगातल्या समृद्ध विचारधारांनी स्त्री आता बाहेरचं जग कुटुंबात आणायला लागली. सुधारणा, नवविचार, एखाद्या प्रसंगाकडे पाहण्याची समंजस वृत्ती आणि नवी मूल्य, आधुनिक दृष्टिकोन यामुळे तिचे कुटुंबभान, समाजभान विस्तारले.

जुन्या काळातल्या चौकटीच्या जाचक नियमातून ती बाहेर पडली आणि नव्या स्वानंदाच्या स्वकर्तृत्वाच्या दिशांकडे पादाक्रांत झाली. विज्ञानवाद आणि बुद्धिनिष्ठता व्यापक झाल्यामुळे स्त्री-पुरुष विषमता म्हणजे लिंगभाव संपवणे हा सुरुवातीचा लढा आता 'स्व' शोधाकडे वळला आणि स्वत:ला सिद्ध करण्यासाठी तिने कुटुंब, समाज, शिक्षण, नोकरी, व्यवसाय या सगळ्या पातळ्यांवर चौफेर संचार करत तिची मूलत: धूर्त, चाणाक्ष आणि कष्टाळू वृत्ती, रसिकतेसह बुद्धीच्या पातळीवर सिद्ध केली. हीच शिक्षणाच्या विस्तारलेल्या कक्षा अवगत केल्यामुळे तिच्या जीवनाला अर्थपूर्णता येण्यासाठी मिळालेली फलश्रुती आहे. हे निश्चित.

❖❖❖

*(के. जे. सोमैय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मुंबई येथे मराठी विभागाच्या प्राध्यापक, वृत्तपत्र, मासिकांमधून लेखन, आकाशवाणी मालिका लेखन)*

(E-mail : meerackulkarni@gmail.com)

# ‘घरकाम स्त्रियांची उपजत जबाबदारी’ ही धारणा नष्ट करण्याची गरज!

■ प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार

गेल्या काही दशकांपासून स्त्रिया घराबाहेर पडून वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करताहेत. असं कोणतंही क्षेत्र नाही आहे की तिथं स्त्रिया आपलं योगदान देत नाही आहेत. अलीकडच्या काळात तर खास पुरुषांच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या प्रांतातसुद्धा स्त्रियांनी पदार्पण करून आपला ठसा उमटवायला सुरुवात केली आहे. केवळ पुरुषांच्या बरोबरीने नव्हे तर काकणभर सरस कामगिरी स्त्रिया या क्षेत्रात करताना दिसत आहेत. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक आरोग्य संघटना यांसारख्या वैश्विक महत्त्व लाभलेल्या संस्थांमध्येदेखील स्त्रिया आपल्या बुद्धीच्या नि कष्टाच्या बळावर छाप सोडताना दिसत आहेत. राजकीय क्षेत्रातदेखील स्त्रियांचं नेतृत्व (कमी संधी मिळत असली तरी) कर्तृत्वाने उजळत आहे. कोविड महामारीची परिस्थिती ज्या देशांत स्त्री राष्ट्रप्रमुख आहे तिथं अधिक सक्षमपणे हाताळली गेल्याचे चित्र समोर आलं आहे. वानगीदाखल जर्मनीचं उदाहरण सांगता येईल. आपल्या देशातही केरळच्या तत्कालीन आरोग्यमंत्री शैलेजा यांनी खूप उत्तम कामगिरी केल्याचे दिसून आलं आहे. याचा अर्थ असा की सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांनी आघाडीवर राहून नेतृत्व करायला लोकांची स्वीकृती आणि सहकार्य मिळत आहे.

ज्या वेगाने स्त्रिया घराबाहेर पडून काम करताना दिसत आहेत त्या तुलनेने घरकाम करणाऱ्या पुरुषांची संख्या वाढताना दिसत नाही आहे. त्यामुळे समाजात दिसत असलेलं हे परिवर्तन एकांगी आहे. एकतर्फी आहे. स्वयंपाक बनवणे, घराची साफ-सफाई करणे, भांडी घासणे, कपडे धुणे अशा कामांमध्ये पुरुषांचा सहभाग अत्यंत कमी आहे. हे वास्तव नजरेआड करून चालणारे नाही आहे. किंबहुना यात बदल होण्याची नितांत गरज आहे. इंग्लंडच्या प्रसिद्ध केंब्रिज विद्यापीठातले मानवी भूगोल या विषयाचे प्राध्यापक एलीस अवान्स यांनी या संदर्भात केलेलं अध्ययन महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या मते ही परिस्थिती संपूर्ण जगात थोड्याफार फरकाने एकसारखीच आहे. याचं नीट अवलोकन होण्यासाठी वेगेवगळ्या देशांमध्ये या बाबत सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पाशी त्यांनी स्वत:ला जोडून घेतलं. शिक्षणतज्ज्ञ जसा विचार करतात त्याच्या उलट विचार एलीस यांनी केला. सर्वसाधारणपणे एक तर गरीब देश किंवा मग श्रीमंत देशांत असा अभ्यास केला जात असतो. त्यांनी आपल्या अभ्यासासाठी झाम्बियामधल्या कीटवे या शहराची निवड केली. त्यांच्या अभ्यासातून आलेल्या काही निष्कर्षांचा उल्लेख पुढे केला आहे.

स्त्रियांनी बाहेर जाऊन नोकरी-व्यवसाय करायला लोकं पाठिंबा देतात. पण यामागे आर्थिक कारण जास्त प्रबळ असल्याचं त्यांना जाणवलं. औद्योगिक क्षेत्रातली मंदी, नियमांमधली शिथिलता यासारख्या कारणांमुळे विकसित देशांमधल्या पुरुषांच्या नोकऱ्या नष्ट/कमी झाल्या आहेत. जागतिक स्तरावर असं दिसून आलं आहे की इंग्लंडसारख्या देशात आरोग्य, शिक्षण, लोकप्रशासन आणि वित्तीय सेवा यासारख्या क्षेत्रांत स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे. या क्षेत्रांत स्त्रिया अधिक चांगल्या पद्धतीने काम करतात, अशी धारणा यामागे आहे. आपल्या शेजारच्या बांगलादेशात निर्यात केल्या जाणाऱ्या उत्पादन निर्मितीच्या क्षेत्रांत स्त्रियांना काम करण्याची मुभा अलीकडे देण्यात आली आहे. यामुळे तिथं गृहिणींना घराबाहेर पडून काम करण्याच्या विविध संधी उपलब्ध होऊ लागल्या. स्त्रिया शारीरिक श्रमाचे कामदेखील करू शकतात हे या निमित्ताने ठळकपणे समोर आले. परिणामी लिंगाधारित भेदभाव काहीसा कमी व्हायला सुरुवात झाली. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीच्या आहेत, त्यांच्या इतक्याच सक्षम आहेत असं मानणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. लोकांमध्ये आलेल्या या वैचारिक परिवर्तनामुळे पुरुषी वर्चस्व आणि एकाधिकारशाही असलेल्या क्षेत्रांतही स्त्रियांना काम करण्याच्या संधी प्राप्त होत आहेत.

एखाद्या बालकाने आपल्या घरातल्या पुरुषांना (पगारी मदतनीसांना नव्हे!) स्वयंपाक करताना, भांडी घासताना, कपडे धुताना, घराची साफ-सफाई करताना पाहिले तर साहजिकच मोठा झाल्यावर तोसुद्धा ही कामे करेल. यात त्याला कमीपणा वाटणार नाही. उलट या कामांमध्ये आपण माहीर आहोत याचा त्याला अभिमान वाटेल. पण वास्तव मात्र असं नाही आहे. ही कामं स्त्रियांनी करावयाची आहेत; पुरुषांनी नाही असा घट्ट समज लोकांमध्ये रुजलेला आहे. हा समज कोणत्या काळात दृढ झाला हे सांगणे कठीण आहे. लहान मुले घरात जे पाहतात तेच संस्कार त्यांच्यावर कळत-नकळत होत

असतात. आजची लहान बालके ही उद्याची प्रौढ नागरिक होत. मग लहानपणी जर त्यांना घरकाम ही फक्त स्त्रीची जबाबदारी आहे असा अनुभव नि शिकवण असेल तर मोठे झाल्यावर ते ही कामे कशी करतील? बऱ्याचदा असंही होताना दिसतं की काही पुरुषांना या कामात सहभाग घेण्याची इच्छा असते किंवा ते करायला त्यांचा नकार नसतो. पण लोकं काय म्हणतील, याची त्यांना भीती वाटते. काही घरांमध्ये बहिणीबरोबर भाऊसुद्धा घरकाम करतात. या मुली सामाजिक परिवर्तनासाठी अधिक आशावादी असतात. पुरुषांनीही यात हातभार लावावा, अशी मोठ्या झाल्यावर त्यांची साहजिकच अपेक्षा असते. त्याचप्रमाणे समाजाने त्यांच्या इच्छा व व्यवहाराचा आदर करावा असंही त्यांना वाटतं.

एखादा पुरुष घरी येणाऱ्या आपल्या नातेवाईकांसाठी (स्वत:च्या व जोडीदाराच्याही) स्वयंपाक बनवताना, त्यांचं हवं-नको पाहताना फार अभावानेच दिसतो. अशी उदाहरणे फारच कमी दिसतात. या कामांचा दर्जा कमी असल्याची अतिशय ठाम धारणा समाजात खोलवर रुजलेली आहे. ती नाहीशी कशी करता येईल हे एक मोठे आव्हान आहे. यासाठी समाजात स्त्रियांना अधिक व्यावसायिक स्वरूपांत तर पुरुषांना सार्वजनिक स्वरूपात पुढे आणण्याची गरज आहे, असा एक मतप्रवाह आहे. आपल्या देशातल्या काही आदिवासी समाजात पुरुष घरकाम करतात. परदेशातही काही समुदायांमध्ये हे दिसून येतं. पण एकूणच हे प्रमाण नगण्य म्हणता येईल असंच आहे, यात शंका नाही.

घरकाम ही केवळ स्त्रियांची जबाबदारी नसून कुटुंबात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची मग ती स्त्री असो वा पुरुष किंवा लिंगांतरित, याचे वस्तुपाठ मुलांना लहानपणीच दिले पाहिजेत. यासाठी सर्वात प्रथम घरांत याचं प्रात्यक्षिक मुलांना दिसायला हवं. यानंतर शालेय पाठ्यपुस्तकातदेखील याचेच प्रतिबिंब उमटलेले असायला हवे. गृहविज्ञान (home science) हा विषय सध्या प्रामुख्याने मुलींसाठीच उपलब्ध आहे. तो मुलग्यांसाठी देखील खुला करणे काळाची गरज आहे. जेणेकरून ज्या मुलग्यांना यात रस आहे ते याचं शिक्षण घेऊ शकतील. अलीकडेच केरळमध्ये एका महाविद्यालयाने फक्त मुलग्यांसाठी 'स्वयंपाकघर व्यवस्थापन' या विषयावर शिक्षणक्रम सुरू केला आहे.

घरकाम ही स्त्री आणि पुरुष दोघांची जबाबदारी आहे, याचा प्रसार, प्रचार आणि प्रबोधन करण्यात माध्यमे महत्त्वाचे कार्य करू शकतात. माध्यमांमधून (जाहिराती-मालिका-चित्रपट-नाटक-लघुपट-गाणी-रेडिओवरील कार्यक्रम) घरकाम करणाऱ्या पुरुषांच्या व्यक्तिरेखा ठसठशीतपणे पुढे आणायला हव्यात. शिवाय यात अनैसर्गिक (आणि मर्दानगी/ पुरुषत्वाच्या विरोधात) काहीच नाही, हेदेखील बिंबवायला हवं. तसेच याचा जात-पंथ-धर्म-संस्कृती-विचारसरणी-परंपरा-चालीरीती-रूढी-धारणा-प्रादेशिकता-भौगोलिकता-शिक्षण-व्यवसाय-नोकरी-वातावरण कशाशीही तसा संबंध नाही आहे, हेसुद्धा जोरकसपणे सांगण्याची गरज आहे. यामध्ये घरातल्या आई-आजी-बायको-बहीण यांची भूमिका खूप महत्त्वाची आहे. विशेषत: आईची. आजही अनेक आयांना आपले मुलगे म्हणजे कोणी तरी विशेष वाटतात. त्यांच्यावर असलेला पितृसत्तेचा पगडा हे त्या मागचे मुख्य कारण. आजही अनेक उच्चविद्याविभूषित आणि उच्च पदस्थ स्त्रियांमध्ये मुलगा हाच वंशाचा दिवा ही धारणा नष्ट झालेली नाही आहे. त्यामुळे अशा स्त्रिया मुलग्यांना घरकाम करायला देत नाहीत. यात काही अपवाद निश्चितच आहेत. पण त्यांचं प्रमाण अजून वाढण्याची गरज आहे. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांमध्ये हळूहळू बदल होताना दिसत आहेत. मात्र गृहिणी स्त्रियांना घरकामाची जबाबदारी पुरुषांकडे द्यायला संकोच वाटत असावा. एक कारण म्हणजे आपण घरीच असतो म्हणजे हे काम आपलंच आहे, अशी त्यांची धारणा बनलेली असते. दुसरे कारण म्हणजे भीती. आपण जर या कामात घरातल्या पुरुष मंडळींचा सहभाग घेतला तर लोक काय म्हणतील, याचं भय असतं. शिवाय प्रथा, रूढी, परंपरा यांचा प्रभाव असतोच.

आज पन्नाशीत असलेल्या अनेक पुरुषांना घरकाम ही फक्त स्त्रियांची जबाबदारी नाहीये, हे पटलेलं दिसतं. काही पुरुष ते करण्याचा प्रयत्नही करतात. पण इतक्या वर्षांच्या मनाला-शरीराला नसलेल्या सवयीमुळे हे काम सफाईदारपणे करता येत नाही. मग यात काही उणिवा राहिल्या, चुका झाल्यावर घरातल्या स्त्रियांनी जर नाराजी व्यक्त केली तर पुरुषांचा आत्मविश्वास कमी होतो. ते काम टाळण्याचा प्रयत्न करतात. अर्थात नीट, मन लावून प्रयत्न केलेत तर यात पुरुष तरबेज होऊ शकतात. मात्र यासाठी घरातल्या स्त्रिया आणि पुरुष यांच्यात संयम, समन्वय आणि सहकार्य असणे आवश्यक आहे. कोविड टाळेबंदीच्या काळात अनेक पुरुषांनी घरकामात सहभाग घेतला असल्याचे पुढे आलं होतं. पण हा सहभाग टाळेबंदीनंतरही टिकून राहिला की काय, याची माहिती समोर आलेली नाही आहे. याबाबतची वस्तुस्थिती समजली तर पुरुषांमध्ये कितपत परिवर्तन घडून आलं याचा अदमास येईल.

घर दोघांचं असतं तर घरकाम केवळ स्त्रीचं कसं काय हा मूलभूत प्रश्न जेव्हा सगळ्यांना पडेल तेव्हा घरकामात पुरुषांची भागीदारी समसमान प्रमाणात निर्माण होईल. नवी पिढी हे आचरणात आणेल, अशी आशा वाटते.

❖❖❖

*(प्राध्यापक, जेंडर स्टडी अभ्यासक)*

(E-mail : gprawin@hotmail.com)

# सावित्रीबाई फुले आणि जागतिक महिला दिनाची प्रासंगिकता

■ ॲड. कविता म्हेत्रे

''नेमेची येतो मग पावसाळा'' या उक्तीप्रमाणे याही वर्षी ८ मार्च जागतिक महिला दिन आला.

माणूस म्हणून बाईचे स्वतंत्र अस्तित्व असतं; त्या अनुषंगाने आम्ही बाया स्त्रीमुक्तीच्या संदर्भात, व्यवस्थेने आखलेल्या कोणत्या परिघात होतो आणि तो ओलांडून आम्हाला आता पुढे कुठे पोहोचायचं आहे. याचा लेखाजोखा मांडण्याचा व त्याचं भान आणि जाण ठेवण्याचा हा दिवस म्हणजे जागतिक महिला दिन. परंतु आजकाल जागतिक महिला दिन साजरा करताना त्याला इव्हेंटचे स्वरूप आल्याचे आपल्याला दिसून येतं. जागतिक पुरुष दिन साजरा केला जात नाही या अर्थानं जागतिक महिला दिन पृथ्वीतलावर ज्या दिवशी साजरा होणार नाही तो खऱ्या अर्थानं स्त्री स्वातंत्र्याचा किंबहुना स्त्रीमुक्तीचा दिवस असेल.

महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची परंपरा आहे. ही परंपरा स्त्री-पुरुष समानतेची आहे. स्त्रियांच्या सन्मानाची आहे. त्यांच्या कर्तृत्वाला आणि नेतृत्वाला प्रतिष्ठा देणारी आहे. याच परंपरेत काळाच्या कभिन्न कातळावर आपल्या कर्तृत्वाचा शिलालेख कोरणारे नाव म्हणजे संग्रामनायिका सावित्रीबाई फुले. १९ व्या शतकात इथल्या विषमतामूलक पितृसत्ताक जातव्यवस्थेला जबरदस्त खिंडार पाडण्याचं काम सावित्रीबाई फुलेंनी केले. सावित्रीबाईंनी जे पेरलं ते आज आम्ही खात आहोत. पण येणाऱ्या पिढ्यांसाठी आम्ही काय पेरणार आहोत? याचा विचार ही जागतिक महिला दिनानिमित्त होणे गरजेचे आहे.

''न स्त्री स्वातंत्र्यमहर्ती''

स्त्रीला स्वातंत्र्य नाहीच हे सांगणारी मनुस्मृती ही स्त्रीच्या स्वातंत्र्याची पहिली मारेकरी आहे. हजारो वर्षांपासून धर्म व्यवस्था, जात व्यवस्था आणि पुरुषसत्ताक व्यवस्था या तीन जोखडाखाली स्त्रियांना करकचून बांधून ठेवण्यात आले होते. बालविवाह, केशवपन, सतीची चाल, अंधश्रद्धा कर्मकांड इ. अनेक वाईट चालीरीतींमध्ये स्त्रियांना बंदिस्त केले होते. इथल्या धर्म व्यवस्थेने स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार केव्हाच नाकारला होता. स्त्रीचं जगणं चूल आणि मूल यापुरतेच मर्यादित केलं होतं. या स्त्रीदास्याच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगतात .

''शिक्षणानं येते मनुष्यत्व
पशुत्व हाटते पहा''

आणि ज्या धर्म व्यवस्थेने स्त्रियांच्या शिक्षणाचा हक्क नाकारला त्या धर्म व्यवस्थेच्या विरोधात बंड पुकारतात आणि स्त्री शिक्षणाची कवाडे उघडतात. बाईनं शिकणं म्हणजे मोठं पाप, हे धर्म मार्तंडाचे म्हणणं खोडून काढतात. महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांचे जीवनसाथी त्यांना शिकवतात. सावित्रीबाई शिकतात अशा समाजात शिकतात ज्या समाजात बायकांची मजल हळदीकुंकू समारंभ, व्रतवैकल्य या पलीकडे जात नाही. सावित्रीबाई फुले नुसत्या शिकत नाहीत तर शिकवायला उंबरठ्याच्या बाहेर पडतात आणि आपल्या नवऱ्याच्या समाजकार्यात बरोबरीच्या भागीदार होतात. मुलींच्या शाळेत शिकवायला जाताना दगड मारा, शेणमारा सहन करतात आणि स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवतात. त्यांचा उद्देश हाच होता की बाई शिकली पाहिजे, बाई शहाणी झाली पाहिजे, बाई जागी झाली पाहिजे. प्रश्न हा आहे की, स्त्रिया शिकल्या, शहाण्या झाल्या, स्वावलंबी झाल्या. डॉक्टर, इंजिनीयर, वकील, प्राध्यापक झाल्या. राजकारणात आल्या. उच्च पदावर गेल्या. पण त्या जाग्या झाल्या का? स्त्रिया शिकल्या पण त्यांची मजल हळदी कुंकू समारंभ, व्रतवैकल्य यांच्यापुढे गेलीच नाही. माझी साडी, माझी

गाडी, माझी माडी ह्यातच त्या अडकल्या. आपल्या पायापुरतंच बघायला लागल्या. पुण्यात गणेशोत्सवात दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरापुढे हजारो स्त्रिया अथर्वशीर्ष म्हणताना दिसतात. त्यांनी जिकडे पाठ केलेले असते तो भिडेंचा वाडा जिथं सावित्रीबाई फुलेंनी पहिल्या मुलींच्या शाळेत शिकवलं होतं हे त्यांच्या गावीही नसते. मुलींना शिक्षण मिळावं म्हणून सावित्रीबाई फुले यांनी अनंत यातना सहन केल्या आहेत याचं घेणं देणंही कुणाला नसणे ही शोकांतिका आहे. सावित्रीबाई फुले यांच्या नावाने असणाऱ्या पुणे विद्यापीठातील विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले माहीतच नसतात हे कटू वास्तव आहे. शिकून शहाणपण येते माणसाला, तो उघड्या डोळ्यांनी बघायला शिकतो आणि माणूस म्हणून जगायला शिकतो ही सोपी शिक्षणाची व्याख्या महात्मा फुले करतात. पण शिक्षणाने ना आम्हाला शहाणपण आलं ना आम्ही उघड्या डोळ्यांनी बघायला शिकलो.

सावित्रीबाई पहिल्या भारतीय स्त्री शिक्षिका होत्या. त्यांनी एक रुपयाही पगार न घेता अकरा वर्षे शिक्षिकेचे काम व्रत म्हणून केलं. फुले दाम्पत्याने चालवलेल्या शाळा आनंदाई होत्या. जीवनदायी होत्या. त्यांच्या शाळेत श्रमप्रधान शिक्षण होतं.

"Industrial department should be attached to the school in which children should learn useful trades and crafts to maintain themselves independent and comfortable"

आज आमच्या शाळांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह आहे. शाळा आहेत पण शिक्षण नाही. शाळा आहेत पण शिक्षक नाहीत. शाळा आहेत पण विद्यार्थ्यांना बसायला वर्ग नाहीत, प्यायला पाणी नाही, स्वच्छतागृह नाहीत. ही आमच्या शाळांची अवस्था आहे. महाराष्ट्रात तर सरकारी प्राथमिक शाळा बंद करण्याचा घाट घातला जात आहे. शाळांच्या समायोजनाखाली प्राथमिक शाळा बंद केल्या जात आहेत. सरकारी शाळांमध्ये धनदांडग्यांची मुलं शिकत नाहीत तर गरिबांची, कष्टकरी, कामकरी, शेतकरी मजुरांची मुलं शिकतात. प्राथमिक शाळा बंद झाल्या तर याचा सर्वात जास्त दुष्परिणाम मुलींच्या शिक्षणावर होणार आहे. हजारो मुली शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर ढकलल्या जाणार आहेत. त्यांचे शिक्षण थांबणार आहे. ज्या लेकीबाळींच्या शिक्षणासाठी सावित्रीबाईंनी दगड गोटे झेलले. ज्या लेकीबाळींच्या शिक्षणासाठी सावित्रीबाईंना स्वत:चे घरदार सोडावे लागले. त्याच लेकीबाळींचं शिक्षण थांबवलं जातंय. याचं भान आम्हाला असणं अत्यंत गरजेचे आहे. आजही आम्ही लेकीबाळींना कोंडूनच ठेवतो आहे. शिक्षणापासून वंचित ठेवत आहे. आजही समाज, सरकार, कुटुंब मुलींच्या शिक्षणासाठी उदासीन आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण ही आमची मागणी जागतिक महिला दिन साजरा करताना अग्रक्रमाने असायला पाहिजे.

"नवस साया पुत्र होती
तर का करावा लागे पती"

हा सवाल संत तुकाराम महाराजांनी साडेचारशे वर्षांपूर्वी विचारला होता तो सवाल सावित्रीबाई विचारतात,

"धोंडे मुले होती नवसा पावती
तर लग्न का करती नर नारी"

खाडकन डोळे उघडायला लावणारे सावित्रीबाईंचे विचार आहेत, पण आम्ही ते आत्मसात केलेच नाहीत. आजही मुलगा व्हावा म्हणून नवस करणारे, मुलाला वंशाचा दिवा मानणारे आणि मुलीचा जन्मच नाकारणारे बहुतांश लोक समाजात आहेत. जेव्हा स्त्रीच जन्माला येणाऱ्या मुलीचा जन्म नाकारते. तिला गर्भातच मारते. तेव्हा कसला जागतिक महिला दिन आम्ही साजरा करत असतो हा प्रश्न प्रामुख्याने समोर येतो. स्त्री घरात सुरक्षित नाही, दारात सुरक्षित नाही आणि आईच्या गर्भातही सुरक्षित नाही. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांचा आलेख दिवसेंदिवस वाढत आहे. स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बोलायला कोणालाच वेळ नाही. स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, मानसिक, बौद्धिक भावनिक इ. स्वातंत्र्यावर कुणीच बोलत नाही.

पुरुषांप्रमाणे स्त्रियाही त्याच हाडामांसाच्या, इच्छा-आकांक्षाच्या आणि वासनांच्या बनलेल्या असताना, जे नियम पुरुषांना तेच नियम स्त्रियांना असायला हवेत. म्हणूनच महात्मा फुले बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करताना दिसतात. त्याची जाहिरात सनातनी विचारांचा पगडा असणाऱ्या पुण्यात निर्भीडपणे करतात.

"विधवांनो, मी जोतीराव गोविंदराव फुले आपणास सांगू इच्छितो की, आपणास जर बाळंत व्हायचं असेल तर तुम्ही खुशाल आमच्या घरी येऊन बाळंत व्हा. आपले नाव गुप्त ठेवण्यात येईल. आपण आपले मूल घेऊन जाऊ शकता अथवा आम्ही त्याचा सांभाळ करू."

ही जाहिरात म्हणजे स्त्रीमुक्तीचा जाहीरनामा होता. सावित्रीबाईंनी मोठ्या पुढाकाराने बालहत्या प्रतिबंधकगृह चालविले. येणाऱ्या विधवांची बाळंतपण आईच्या मायेने केली. आज कुणी विधवा तिच्या तारुण्य सुलभ अवस्थेमुळे किंवा कुणी पुरुषाने फसवल्यामुळे गरोदर राहिली तर तिला आम्ही स्वीकारणार आहोत का? हा मानवतेचा पाझर आम्हाला फुटणार आहे का? याचाही विचार

जागतिक महिला दिनानिमित्त आम्ही करायला हवा. जीव द्यायला निघालेल्या काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेनं जन्माला घातलेल्या मुलाला सावित्रीबाई दत्त घेऊन त्याचं आईपण घेतात. त्याला चांगला माणूस म्हणून घडवतात. आज समाजात किती तरी जोडप्यांना मूल होत नाही पण कुणा अनाथ लेकराला दत्तक घ्यायचं धारिष्ट्य किती जण दाखवतात?

आज समाजात एकल महिलांचा प्रश्न गंभीर बनला आहे. आपल्या समाजात फक्त लग्न झालेल्या स्त्रीलाच प्रतिष्ठा असते. नवऱ्यानं टाकलेल्या, घटस्फोटित, विधवा स्त्रीला समाजात प्रतिष्ठा नसते. सावित्रीबाईंनी विधवा पुनर्विवाहाची चळवळ राबवली. अनेक विधवांचे पुनर्विवाह केले. अशी चळवळ पुन्हा महाराष्ट्रात उभी राहताना आपल्याला दिसत नाही. आज गावागावात लग्न न झालेल्या तरुणांची मोठी संख्या आहे. ही एक सामाजिक समस्या गंभीर रूप धारण करत आहे. या पार्श्वभूमीवर तरुणांनी विधवांशी विवाह करून सावित्रीबाईंची ही वैचारिक चळवळ पुढे न्यायला काय हरकत आहे.

परीसस्पर्शाने लोखंडाचं सोनं होतं असं म्हणतात. पण लोखंडातही सोनं होण्याची पात्रता असायला लागते. जोतीराव फुलेंनी सावित्रीबाईंना शिकवलं होतं. शिकवायला उंबरठ्याच्या बाहेर पाठवलं होतं. आणि जुलमी सनातनी व्यवस्थेविरुद्ध लढायचं बळही दिलं होतं. पण सावित्रीबाई ही तेवढ्याच ताकदीच्या होत्या. कर्तृत्वानं उजळून यायचं बळ त्यांच्याही ठायी होतं. एकमेकांना समजून घेत, एकमेकांना आधार देत, एकमेकांना फुलवत, एकमेकांना मोठं करणारं, एकमेकांना घडवणारं जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे सहजीवन आदर्श होतं म्हणूनच हंटर कमिशनच्या पुढे साक्ष देताना जोतीराव फुले, ''सावित्रीबाई माझा नेता आहे'' असं म्हणतात तर; सावित्रीबाई जोतिरावांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करताना आपल्या कवितेत म्हणतात,

''जयाचे मुळे मी कविता रचते
जयाचे कृपे ब्रह्म आनंद चित्ते
जयाने दिली बुद्धी ही सावित्रीला
प्रणाम करी मी यती जोतिबाला''

घटस्फोटाचं प्रमाण वाढलेल्या या समाजात फुले दाम्पत्याचं आदर्श सहजीवन नव्या पिढीच्या डोळ्यात झणझणीत अंजन आहे.

त्याकाळात विधवा स्त्रियांचं केशवपन केलं जात होतं. तिचं मुंडन करून तिला विद्रूप केलं जायचं. ही प्रथा ब्राह्मण जातीत होती. ह्या विधवांचं केशवपन करणाऱ्या नाभिक बंधूंचा सावित्रीबाईंनी संप घडवून आणला होता. ''आम्ही विधवा भगिनींचे मुंडन करणार नाही'' हा निर्धार करून नाभिक बंधूंनी आपली कमाई नाकारून आपल्याच पोटावर पाय दिला होता. या संपाची दखल लंडनच्या वृत्तपत्राने घेतली होती. स्त्रीला दुय्यम स्थान देऊन तिचं जगणंच विद्रूप बनवणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध सावित्रीबाईंचं हे बंड होतं. तो स्त्रीमुक्तीचा एल्गार होता.

सावित्रीबाईसारख्या शिकलेल्या, नवविचारांच्या बंडखोर स्त्रिया या परंपरागत समाजात निर्माण व्हायला पाहिजेत. जागतिक महिला दिनानिमित्ताने या विचारांची कास आम्ही धरायला पाहिजे. संस्कृतीच्या नावाखाली जात आणि धर्माच्या आंधळ्या चालीरीतींच्या वाहक बनण्यापेक्षा बुद्धी प्रामाण्याच्या कसोटीवर आम्ही आमच्या धडावर आमचं डोकं ठेवलं पाहिजे. आज जात धर्माच्या नावावर द्वेष पसरविला जात असताना सावित्रीबाईंनी लढलेला जातीअंताचा लढा आमचा लढा झाला पाहिजे. शेणागोळ्यांची फुलं करणारी सावित्रीबाई फुलेंची शौर्यगाथा आम्ही सावित्रीच्या लेकी म्हणून आमच्या रक्तबीजात रुजली पाहिजे. सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वातलं आत्मविश्वासाचं बळ येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी बळ बनून राहणार आहे. हेच बळ आम्हाला बाई म्हणून नव्हे तर माणूस म्हणून जगण्याचं बळ देणारं आहे आणि हीच जागतिक महिला दिनाची उपलब्धी असणं अत्यंत गरजेचे आहे.

❖❖❖

*(कायदे तज्ज्ञ, एकपात्री नाट्यकर्मी)*
(E-mail : kavitamehtre0099@gmail.com)

# पुरुषांच्या नजरेतून स्त्री-पुरुष समानता

■ ॲड. नीलेश खानविलकर

'स्त्री–पुरुष समानता' हा शब्द आपण वारंवार ऐकतो—सभा, भाषण, जाहिराती, शालेय पुस्तके आणि सरकारी योजनांमधून. मात्र खरा प्रश्न असा आहे की सामान्य पुरुषाला या संकल्पनेचा अर्थ काय वाटतो? कायद्याने दिलेली समानता म्हणजेच खऱ्या अर्थाने समानता आहे का, की ती आपल्या विचारांत, वागण्यात आणि दैनंदिन जगण्यात उतरली पाहिजे का?

मी एक सामान्य पुरुष आहे. माझ्यासारखेच लाखो पुरुष कामावर जातात, कुटुंब सांभाळतात, समाजात वावरतात. माझ्या नजरेतून पाहिलं तर स्त्री–पुरुष समानता ही केवळ स्त्रियांसाठीची चळवळ नाही; ती माणूस म्हणून अधिक संवेदनशील, जबाबदार आणि न्याय्य बनण्याची प्रक्रिया आहे. माझ्या मते स्त्री–पुरुष समानता म्हणजे दोघांनाही समान संधी, समान सन्मान आणि समान स्वातंत्र्य मिळणं. याचा अर्थ असा नाही की स्त्री आणि पुरुष पूर्णपणे सारखेच असावेत. जैविक, भावनिक आणि सामाजिक फरक आहेत, पण त्या फरकांच्या आधारावर कुणालाही कमी लेखलं जाऊ नये. समानता म्हणजे स्त्रीला 'कमजोर' समजणं थांबवणं आणि पुरुषाला 'नेहमी मजबूतच असला पाहिजे' या चौकटीत अडकवणं थांबवणं. निर्णय घेताना, संधी देताना आणि जबाबदाऱ्या वाटताना लिंगाचा आधार न घेणं—हेच समानतेचं मूळ आहे.

तरीही बहुतेक पुरुषांच्या मनात समानतेचा अर्थ खूप मर्यादित असतो. 'मी भाजी आणली', 'आज मुलाला पार्कमध्ये नेलं', 'महिन्यातून दोनदा झाडू मारतो'—अशा गोष्टी करून आपण समानतेच्या बाजूने आहोत, असं अनेकांना वाटतं. पण इथेच खरी समानता अडखळते. कारण आपण हे सगळं 'मदत' म्हणून करतो. मदत म्हणजे मुख्य जबाबदारी कुणाची तरी आहे आणि आपण फक्त हातभार लावतो—हा विचारच स्त्री–पुरुष समानतेला मारक ठरतो.

भूक स्त्री–पुरुष दोघांनाही लागते, मग जेवण बनवणं ही केवळ स्त्रीची जबाबदारी कशी? मूल दोघांच्या नात्यातून जन्माला येतं, मग त्याची काळजी घेणं फक्त आईचं काम कसं असू शकतं? घरात दोघं राहतात, मग घरकामाची जबाबदारी एकट्या महिलांवर का? खरी समानता तेव्हाच सुरू होते, जेव्हा पुरुष 'मी मदत करतो' या भावनेतून बाहेर येऊन 'ही माझीही जबाबदारी आहे' असा विचार स्वीकारतो. आर्थिक जबाबदारीबरोबरच भावनिक जबाबदारी वाटून घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे.

समाजात पुरुषाची भूमिका इथे संपत नाही. रस्त्यावर मुलीला त्रास होत असताना गप्प बसणं, मित्रमंडळीत स्त्रीविरोधी विनोदांवर हसणं, मुलगा उशिरा आला तर चालतं पण मुलगी आली तर प्रश्न हे सगळं आपण नकळत स्वीकारतो. आजही अनेक घरांमध्ये मुलाला शिक्षणासाठी बाहेर पाठवलं जातं आणि मुलीला घरकाम शिकवलं जातं. हे चित्र बदलायला पुरुषांनीच पुढाकार घ्यायला हवा. कारण शिक्षण, स्वप्नं आणि संधी या कोणाच्याही लिंगावर अवलंबून नसतात.

खरी समानता तेव्हाच येईल, जेव्हा पुरुष स्वत: पुढे येतील. प्रत्येक पुरुषाने स्वत:ला काही अस्वस्थ करणारे प्रश्न विचारायला हवेत मी घरात किती जबाबदारी घेतो? निर्णयप्रक्रियेत माझ्या पत्नी, आई, बहीण किंवा मुलीचं मत गांभीर्याने घेतो का? माझ्या मनात नकळत पूर्वग्रह आहेत का? मी माझ्या मुलांना समानतेची शिकवण देतो का? पुरुषाची भूमिका फक्त 'परवानगी देणारा' इतकी मर्यादित नसून सहभागी होणारी असली पाहिजे.

स्त्री–पुरुष समानतेची खरी सुरुवात घरातून होते. मुलगा जेव्हा वडिलांना स्वयंपाक करताना, भांडी घासताना किंवा मुलांची काळजी घेताना पाहतो, तेव्हा ते त्याच्यासाठी स्वाभाविक होतं.

मुलगी जर आईला नोकरी करताना आणि वडिलांना तिच्या करिअरला पाठिंबा देताना पाहते, तर तिला स्वतःच्या स्वप्नांवर विश्वास बसतो. घरात मुलाला जास्त स्वातंत्र्य आणि मुलीला जास्त बंधनं असतील, तर समाजात समानतेची अपेक्षा करणं व्यर्थ ठरतं.

समाजात आजही महिलांना सुरक्षिततेच्या प्रश्नांना सामोरं जावं लागतं. पुरुष म्हणून 'मी असं करत नाही' एवढ्यावर थांबून चालणार नाही. कुठे अन्याय दिसला तर आवाज उठवणं, चुकीच्या वागणुकीला विरोध करणं, स्त्रीविरोधी चर्चा थांबवणं ही आपली जबाबदारी आहे. प्रत्येक वेळी आपण गप्प बसतो, तेव्हा त्या अन्यायाला अप्रत्यक्ष पाठिंबा देतो.

राज्यपातळीवर कायदे आहेत, योजना आहेत; पण केवळ कायद्यांनी समानता येत नाही. महिलांच्या नेतृत्वाला स्वीकारणं, महिला प्रतिनिधींना 'कोट्यातून आलेल्या' म्हणून कमी लेखणं थांबवणं गरजेचं आहे. त्याचबरोबर पितृत्व रजा, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळविरोधी कठोर अंमलबजावणी आणि मुलींच्या शिक्षणासाठी प्रभावी धोरणांची मागणी पुरुषांनीही करायला हवी.

भावनिक समानताही तितकीच महत्त्वाची आहे. आपल्या समाजात पुरुषांना भावना व्यक्त करायला परवानगी नसते. दबलेल्या भावनाच अनेकदा राग आणि हिंसेचं रूप घेतात. खरी समानता म्हणजे स्त्री–पुरुष दोघांनाही माणूस म्हणून जगण्याचं स्वातंत्र्य.

स्त्री–पुरुष समानता हा एखादा प्रकल्प नाही; ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया आहे आत्मपरीक्षणाची, बदलाची आणि जबाबदारी स्वीकारण्याची. एक सामान्य पुरुष म्हणून मला उमजलं आहे की समानता म्हणजे 'हक्क देणं' नाही, तर 'भागीदारी स्वीकारणं' आहे. बदल माझ्यापासून सुरू झाला, तर कुटुंब बदलेल; कुटुंब बदललं की समाज बदलेल आणि समाज बदलला की राष्ट्र प्रगत होईल. स्त्री-पुरुष समानता ही स्त्रियांची लढाई नाही. ती आपली सामूहिक जबाबदारी आहे.

❖❖❖

*(ज्येष्ठ वकील, संस्थापक - प्रेमांकुर फाउण्डेशन)*


(E-mail : adv.khanvilkar@gmail.com)

## अन्नपूर्णा परिवारातर्फे

# आदरांजली!



**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि लोकनेते माननीय श्री. अजित दादा पवार**



**ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ पद्मभूषण श्री. माधवराव गाडगीळ**

# बायकांचे व्यवसाय!

■ स्वप्ना विजया अरुण

कायम छंद म्हणूनच बघितले गेलेले बायकांचे व्यवसाय. पापड, लोणची विकते म्हणून हिणवले गेलेले बायकांचे व्यवसाय. या जगातल्या प्रचंड मोठ्या भांडवलशाहीमध्ये कुठे कुठे कानाकोपऱ्यात केले जाणारे छोटे-मोठे बायकांचे व्यवसाय आणि असाच एक छोटा मोठा व्यवसाय करणारी मी पण एक बाई!

खरंतर मी कधी कुठला व्यवसाय करेन असं मला वाटलंच नव्हतं. मी शिक्षणाने इंजिनीयर. स्वभावाने अभ्यासू. बोलणं पुस्तकी. डोक्याने तापट. व्यावसायिक होणं माझ्या स्वभावाला शोभणारंही नव्हतं आणि जमणार तर त्याहून नव्हतं. त्यामुळे आपण जन्मभर व्यवस्थित नोकरी करणार असंच मला कायम वाटायचं आणि असं वाटत असतानाच टिपिकल बायकांसारखी सांसारिक कारणांमुळे मी अचानक नोकरी सोडली आणि नवऱ्याच्या मागे परदेशात निघून गेले. ज्या वेगाने नोकरी सुटली त्याच्या दुप्पट वेगाने पश्चात्तापसुद्धा झाला. घरात बसून नेमकं करायचं काय हे माहितीच नव्हतं. त्यात दुसऱ्या बाळाच्या येण्याची चाहूल लागल्यानंतर मला माझी परत नोकरी करण्याची आशा माझ्या डोळ्यासमोर मावळताना दिसली.

मला करायचं तर खूप काही होतं. बुद्धी स्वस्थ बसू देत नव्हती आणि दोन मुलांची जबाबदारी बाहेर पडू देत नव्हती. एव्हाना नवरा त्याच्या करीअरमध्ये इतका पुढे निघून गेला होता की आता घराची जबाबदारी माझ्यावरच. म्हणजे जे काही करायचं ते घरात राहून हे तर नक्की झालं. पण म्हणजे काय? हे शोधण्यात मात्र तब्बल चार वर्षे गेली!

आणि एक दिवस अचानक असं वाटलं की हा काही माझ्या एकटीचा प्रश्न असू शकत नाही. जगात अशा कित्येक बायका असतील की ज्यांना काही तरी करायचं तर आहे, पण घरात राहून. (हे 'एक दिवस अचानक' वगैरे मी नाट्यमयता आणण्यासाठी लिहिलंय. प्रत्यक्षात हे सगळं काम करता करता हळूहळू सुचत गेलं!)

इंडिइट्स, माझं छोटं बिझनेस नामक पिल्लू, नेमकं कसं सुरू झालं ही एक स्वतंत्र कथाच आहे. पण मुद्दा हाच होता की ज्यांना घरातून काम करायचा आहे अशा बायकांना प्लॅटफॉर्म मिळवून देणे. मला स्वत:ला विकण्याजोगा एकही पदार्थ येत नसला तरीही व्यवसाय चालवण्यासाठी बाकीचे जे आवश्यक डिपार्टमेंट असतात ते मी फार छान चालवू शकत होते. मार्केटिंग, टेक्निकल सपोर्ट, सप्लाय चेन, लॉजिस्टिकल सपोर्ट या गोष्टी जमायच्या. डोकं गणिती आणि जीभ खवय्या असल्यामुळे की काय पण खाद्यपदार्थांच्या नेटवर्कची वेबसाइट हा अतिशय सहजपणे माझा व्यवसाय झाला. जो मुख्य म्हणजे मी घरून करू शकत होते!

माझ्या आजूबाजूला अशा कित्येक जणी होत्या ज्यांच्या हाताला तर जबरदस्त चव होती. पण संसाराच्या जबाबदाऱ्या सांभाळून त्या पदार्थांची विक्री करणं मात्र त्यांच्यासाठी कठीण काम होतं. त्यांनाही त्यांच्या स्किल्स काही तरी करायचं होतं पण घरातून!

आणि ही गोष्ट माझ्याहून जास्त चांगली कोण समजू शकणार?

हळूहळू माझ्या संपर्कात अशा कित्येक जणी येत गेल्या. एक एक गृहउद्योग जोडला जाऊन इंडिइट्स हळूहळू मोठं होत गेलं. आज आमच्या वेबसाइटवर शेकडो पदार्थ आहेत. कित्येक गृह उद्योग एका वेबसाइटवरून हजारो ग्राहकांशी जोडले गेले आहेत. हे करत असताना किती तरी चांगल्या गोष्टी घडल्या. काही गोष्टी बिघडल्यासुद्धा. पण एकंदरीत आमच्या सगळ्यांचे मिळून (आपापल्या घरातून!) एकदम छान चाललंय.

सगळं नेहमीप्रमाणे छान चाललेलं असतं आणि एक दिवस माझ्या एका बेस्ट सेलरचा फोन येतो

'अगं, मी तुला आज ऑर्डर आणून देते म्हटलं होतं. पण कालचा सगळा दिवस पोलीस चौकीत गेला. त्यामुळे झाली नाही ऑर्डर तयार.'

मला या वाक्याचा नेमका अर्थ कळायलाही दोन मिनिटं गेली.

'पोलीस चौकी??'

'मी तुला बोलले नाही कधी. पण माझा नवरा अक्षरश: काहीच करत नाही. गेले अनेक वर्षे माझं सगळं घर मी एकटीच या व्यवसायातून चालवते. तो मला मदत तर करत नाहीच. उलट खूप पालथे धंदे करून ठेवलेत. मी निस्तरत बसते. पण आता मात्र डोक्यावरून पाणी गेलं. मी हे सहन नाही करू शकत गं अजून. माझं कामात लक्ष लागत नाही. चुका होतात. त्यापेक्षा माझी मी एकटी राहते.'

तिच्याकडे बघून तिच्या संसाराविषयी माझे जे आडाखे होते ते तिच्या प्रत्येक वाक्यागणिक धडाधड कोसळताना मला दिसत होते.

गेले दोन-तीन वर्षे मी हिच्यासोबत काम करतेय. हाताला उत्तम चव, मार्केटमध्ये काय चालेल याचा व्यवस्थित अंदाज, ग्राहकांच्या आवडीनिवडीच्या कलाने योग्य प्रकारचे पॅकिंग. ज्या गोष्टीला हात लावेल त्या गोष्टीला यश मिळेल अशी परिस्थिती. कितीही मोठी ऑर्डर असली तरी ती वेळेत पूर्ण करून देणार. प्रत्येक गोष्टीला कायम हो म्हणणार. प्रत्यक्षात तिच्या आयुष्यात एवढी उलथापालथ चालू असेल याची तीळमात्रही कल्पना मला नव्हती.

ती केवळ घरातून चार पदार्थ बनवत नव्हती, तर ती तिचा संसार गेले कित्येक वर्षे चालवत होती आणि तरीही ही अशी बाई जेव्हा चारचौघांत 'तुम्ही काय करता?' या प्रश्नाचे उत्तर 'बिझनेस' असं देते तेव्हा मला खात्री आहे की दहापैकी नऊ लोकं तिला त्याबद्दल 'कसला बिझनेस?' असाही प्रश्न विचारणार नाहीत. मुळात तुम्ही काय करता हा खास पुरुषांना विचारण्याचा प्रश्न कुणी बायकांना विचारतच नाही. कारण त्यांच्या दृष्टीने बायकांचे बिझनेस हे छंदासारखे असतात. घरातली काम केल्यानंतर उरलेल्या वेळामध्ये मन रमवण्यासाठी केलेल्या गोष्टी.

बायकांचे हे व्यवसाय खरंच इतके क्षुल्लक असतात का?

या प्रसंगानंतर माझ्यासोबत काम करणाऱ्या प्रत्येकीचा मी शांतपणे विचार केला. कुणी आपली मोठ्या कंपनीतली लाखोंची नोकरी सोडून हा व्यवसाय करतेय. तर कोणी या व्यवसायातून महिन्याच्या खर्चाचा मेळ घालण्याचा प्रयत्न करतेय. कोणासोबत संपूर्ण कुटुंब या व्यवसायात उतरलं आहे. तर कोणी अक्षरश: एकटीने उभी राहून रोज नवीन प्रसंगाला तोंड देतेय.

त्यांची व्यवसाय करण्याची कारणं, त्यांच्या गरजा, त्यांची परिस्थिती वेगवेगळी असेल. पण या सगळ्या जणींमध्ये एक गोष्ट सारखी आहे. या सगळ्या जणी आपल्या कामाला छंद समजत नाहीत.

एखाद्या नोकरदार माणसाला प्रमोशन मिळवण्याची, अधिकाधिक पगार मिळवण्याची जेवढी ईर्षा असते आणि त्यासाठी जेवढे हातपाय तो मारतो तेवढ्याच ईर्षेने ह्या साध्यासुध्या दिसणाऱ्या आणि कोणाच्या पटकन नजरेतही न येणाऱ्या बायका जीव तोडून प्रयत्न करत असतात.

त्या डिस्ट्रिब्युटर सोबत बोलतात. त्या एक्सपोर्टसाठी प्रयत्न करतात. मोठमोठ्या कंपन्यांमधून ऑर्डर्स कशा येतील यासाठी नेटवर्किंग करतात. त्या ब्रँडिंगचा विचार करतात. त्या स्केल वाढवण्यासाठी मशिनरीज धुंडाळत असतात. स्वत:सोबत त्या आणखीन चार जणींना जोडून त्यांनाही पुढे नेतात.

आणि हे सगळं करत असताना त्या रोजचा स्वयंपाक करतात, मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देतात, सणवार सांभाळतात, सासू सासरे बघतात, आई-वडिलांचीही चिंता वाहतात.

त्यांना कोणीही प्रमोशन देत नाही किंवा त्यांना कुठलेही अवॉर्ड्स मिळत नाहीत. घरचं सांभाळून जे काही करता येईल ते कर अशी परवानगी फार तर मिळू शकते आणि त्या घरचं सांभाळून प्रचंड मोठं काही तरी करून दाखवतात. फक्त त्याचं स्वरूप हे लाडू, चिवडा, चकली, केक असं साधं असल्यामुळे कोणाला वाटतही नाही की यातून कित्येक संसार चालत असतील.

विशेष म्हणजे हे सगळं त्या फार मायेने करत राहतात. जर एखाद्या ऑर्डरसाठी नेहमीची सेलर नसेल तर दुसरी पटकन तिची जागा घेऊन ऑर्डर पूर्ण करून देते. पण कधीही त्यातून दुसरीचा व्यवसाय बळकवण्याचा प्रयत्न करत नाही. 'असेल तिची काही तरी अडचण' म्हणून या एकमेकींना कधीही न भेटलेल्या बायकासुद्धा एकमेकींना सांभाळून घेत असतात.

'काल या सगळ्या प्रकारात खूप डिस्टर्ब झाले होते. खूप वेळ नुसतीच बसून राहिले आणि मग हिंमत करून पोलिसांमध्ये गेले. त्या गडबडीत ऑर्डर राहूनच गेली. पण मी आज तुला सगळं पूर्ण करून देईन. आता मी सामान घ्यायला बाहेर पडलेच आहे तर आपल्या शलाकाने किती तरी दिवसांपासून मला बाटल्यांचे सील मागितले होते. मग आता तिला तेही नेऊन देते.'

स्वत:च्या इतक्या अवघड प्रसंगातसुद्धा शलाकाने आपल्याला काही तरी मागितलं होतं आणि ते तिला नेऊन दिलं नाही तर तिची गैरसोय होईल याचा आमची मैत्रीण विचार करत होती.

'अगं मग शलाकाकडे जातेच आहेस तर तिच्याकडून माझ्या दोन ऑर्डर घेऊन येतेस का म्हणजे तिची चक्कर वाचेल.'

आणि हे सगळं ऐकल्यानंतर आपली मैत्रीण जरी दु:खात असली तरी दोन पाकिटांसाठी शलाकाची चक्कर वाचवता येईल याचा मी विचार करत होते.

अतिशय गुंतागुंतीच्या या अशा बायका...

आणि त्यांचे वरवर साधेसे, प्रसंगी क्षुल्लक वाटणारे पण अतिशय गुंतागुंतीचे व्यवसाय...

❖❖❖

*(महिला व्यावसायिक, लेखिका)*

(E-mail : swapnajoshi88@gmail.com)

# आत्मविश्वास

■ **अलका भुजबळ**

आज सत्कार स्वीकारताना मन उल्हासित झाले होते, सर्व माझ्याशी हस्तांदोलन करत होते. माझ्या प्रगतीची प्रशंसा करत होते खूप छान वाटत होतं. पण मन मात्र भूतकाळात डोकावत होते.

स्त्रीला अनेक भूमिकांमधून जावे लागते. लहान असताना मुलीने जास्त पुढे पुढे करू नये म्हणून तिला डावलले जाते. तर कॉलेजमध्ये उगाच तुझा कोणी गैरफायदा घेतील त्यामुळे तू हे करू नको, ते करू नको म्हणून सारखे टोकले जाते. मुलाला सगळे अधिकार. लग्न झाल्यावर स्त्रीने जरा अदबीने वागावे. नवऱ्याचे, सासरच्यांचे मन राखावे. उगाच स्वत:ची मते मांडू नये, अशी शिकवण दिली जाते. संसाराला काही वर्षे झाल्यावर नवरा म्हणतो मी आहे ना? मी बघतो तू नको उगाच लुडबुड करू. तर ५०शी जवळ येताच मुलगा म्हणतो, आई मी बघतो तू नको इथे लक्ष घालू. सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात स्त्रीचे हेच चित्र असते.

अशा परिस्थितीतून आलेली मी नोकरीतून निवृत्त झाल्यावर थोडी स्वतंत्र झाली. आता स्वत:साठी जगायचे मनाने ठरवले तर स्त्री स्वत:चे स्थान निर्माण करू शकते. तसं बघायला गेलं तर कॅन्सरसारख्या दुर्धर आजारातून उठल्यावर आता आपण वरती भोज्जा करून आलो आहोत. त्यामुळे आपण समाजासाठी काही तरी करावे हे ठरवले. पण नक्की काय करावे हे सुचत नव्हते. सर्व प्रथम आपल्या कॅन्सरच्या प्रवासाच्या अनुभवावर पुस्तक लिहिले जेणे करून इतरांना त्याद्वारे दिलासा मिळू शकेल. गरज पडेल तर त्यांच्याशी संवाद साधून त्यांचे मनोबल वाढवायचे काम हाती घेतले. अनेक जणांशी संवाद साधल्यावर, संवाद कार्यक्रमांद्वारे प्रेक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या मनातील कॅन्सरबद्दलचे संभ्रम दूर करणे. स्वत:चा अनुभव सांगून, कॅन्सर झाल्यावर घ्यावयाची काळजी आणि आजाराला समोर कसे जायचे. हे करत असताना अनेकांची ओळख होत होती, तर समाजाची नव्याने ओळख झाली.

आयुष्याचा प्रत्येक क्षण आनंदात जावा ह्या हेतूने सर्व मैत्रिणींना भेटणे. G2g करणे. त्यामुळे विचारांची देवणघेवाण होते. ५०शी नंतर आपले शेजारी, आपले मित्र-मैत्रिणीच आपले विस्तारित कुटुंब असते. आजकालच्या विभक्त कुटुंब पद्धतीमुळे जो तो आपल्या व्यापात, संसारात व्यस्त असतो त्यामुळे शेजारी आणि मित्रमैत्रिणी या वेळी आपल्या सोबतीला येतात त्यामुळे त्यांच्याशी सुसंवाद असणे गरजेचे असते हे या G2g द्वारे पटवून दिले. अर्थात घरच्या आपल्या माणसाची साथ ह्या सगळ्याला असतेच, कारण त्यांनाही अनुभवातून आपण जे करतोय ते योग्य आहे हे पटते.

आज स्त्री अंतराळात जाऊन आली. पंतप्रधानपदावर स्त्री होती. भारताची अर्थमंत्री स्त्री आहे. देशासमोर अर्थसंकल्प मांडताना तिचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा असतो, ऊर अभिमानाने भरून येतो. मोठमोठ्या पदांवर स्त्रिया आहेत, स्वतंत्र व्यवसाय यशस्वीपणे सांभाळत आहेतच, पण तरीही आज महिला असुरक्षित आहेत. काही प्रसंगी तिच्या हतबलतेचा गैरफायदा घेतला जातो

त्यावेळेस स्त्री तू किती दुर्बल आहेस ह्याची जाणीव करून देतात.

आजची पिढी पूर्ण आत्मविश्वासाने पुढे येत आहे. वेळ प्रसंगी दोन हातसुद्धा करायची तयारी तिची आहे. वेळप्रसंगी स्त्रीचा आत्मविश्वास वाखाणण्यासारखा असतो. नुकतेच एक उदाहरण झाले, माझ्या मैत्रिणीच्या पतीचे ब्रेन हॅमरेजमुळे ब्रेन डेड झाले, डॉक्टरांनी ऑपरेशननंतर पुढे काहीच शक्य नाही. त्यांचे अवयव दान केल्यास इतरांना त्याचा कसा फायदा होईल हे पटवून सांगितले आणि तिने लागलीच अवयवदानाची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितली आणि त्यांच्या अवयव रूपाने ते आपल्यामध्ये असणार आहेत हे मनाला समजावले. हे स्त्रीचे धारिष्ट्य, समाजाप्रति असलेली जाण.

असेच धारिष्ट्य ती संसार उभा करताना दाखवते. काही वेळेला मुलांवर रागावणे, वेळप्रसंगी इतरांच्या लाडाला न जुमानता मुलांना शिस्त लावणे. सासर माहेरची नाती सांभाळून, स्वत:च्या तब्येतीकडे दुर्लक्ष करत सर्वांचे करत असते पण तिच्या या कष्टाकडे कोणी लक्ष देत नाही, हे हिचे कामच आहे म्हणून हिणवले जाते, पण ती जर आजारी पडली तर तिच्या कामाची जाणीव होते. तरीसुद्धा स्त्री कधीच रिटायर्ड होत नाही. खरंतर समाज तिला रिटायर्ड होऊच देत नाही.

मला वाटतं स्त्रीने कितीही उंची गाठली तरी समाजाच्या नजरा जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत स्त्री ना रिटायर्ड होणार ना ती सुरक्षित होणार.

म्हणूनच माझा सन्मान होत असताना हे सगळं चित्र डोळ्यासमोर आले आणि मन विचलित (विशिन्न) झाले. मी नुकतेच कॅन्सरसारख्या आजारातून उठले होते. आता मला काही जमेल का? पण घरच्यांच्या साथीने मी उभारी धरली. स्वत:च्या अनुभवावर आधारित 'कॉमा' नावाचे पुस्तक लिहिले. म्हणजेच काहीही होवो, आजार असो वा कोणताही प्रसंग घडलेला असो त्यातच अडकून न पडता त्याला कॉमा (,) करायचे आणि पुढे जायचे. केमोथेरपीमुळे माझे एवढे लांब केस गळून गेले होते, भुवयाचे केस सुद्धा गेले होते त्यामुळे मी चेहरा आरशात बघत नव्हती. आत्मविश्वास कमी झालेला होता, रस्तासुद्धा क्रॉस करताना भीती वाटत होती. हातापायाच्या संवेदना कमी झाल्या होत्या. पण या सगळ्यातून स्वत:ला सावरले अर्थात घरच्यांच्या मदतीने आणि मैत्रिणींमुळे हे शक्य झाले. जर त्यावेळीस मी स्वत:ला सावरले नसते तर आजची ही प्रगती झाली नसती. स्त्रीकडे अशी एक अनामिक शक्ती असते की ती क्वचितच खचते पण आल्या प्रसंगाला ध्येयाने तोंड देते.

मी मनाला समजावले आपल्याला मनाने बरं व्हायचं आहे त्यामुळे स्वत:ला गुंतवून घ्यायला हवे.

माझ्या मुलीने डिजिटल वेबपोर्टल चालू करून दिले. जणू छोटा डिजिटल पेपर. लेख, बातम्या, पर्यटन, पुस्तक परिचय, अनुभव लेखन, तसेच कविता, नवनव्या रेसिपी, आरोग्य, वेगवेगळ्या दिनविषयावर लेख असे विविधतेने नटलेला डिजिटल वेबपोर्टलमुळे नवनवीन गोष्टी शिकायला मिळाल्या, वाचन समृद्ध झाले आणि मुख्य म्हणजे लेखक घडविले गेले. कारण लिहिणाऱ्याला लिहायचे असतेच, पण प्रसिद्धीचा आनंद मिळाल्यामुळे अजून लिहायची ऊर्मी येते. समाजापुढे विचार मांडता येतात. हे डिजिटल वेबपोर्टल असल्यामुळे जगात सगळीकडे पोहोचते. वर्तमानपत्राची व्याप्ती आणि डिजिटल वेबपोर्टलची व्याप्ती यात खूपच फरक पडतो. यामुळे मोबाइलचे नवनवीन फिचर्स शिकायला मिळाले आणि स्वत:ला परत नव्या उमेदीने समाजाची सेवा करण्याची संधी मिळाली. स्वत:ची क्रिएटिव्हिटी दाखवायची संधी मिळाली. हे वेबपोर्टल सुबकपणे लोकांसमोर आज गेली ६ वर्षे मांडत आहोत.

याचेच पुढचे पाऊल म्हणजे, पुस्तक छापून देणे सुरू केले. नवनवीन लेखक मिळाले त्यांना त्यांचे पुस्तक छापल्यावर त्यांचा आनंद बघून मन अजूनच सुखावले.

समाजाची बांधिलकी जपत काम करणाऱ्या व्यक्तींची मुलाखत म्हणजेच यूट्यूबद्वारा पॉडकास्ट सुरू केले आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्यांच्या मुलाखतीद्वारा त्यांचे कार्य लोकांसमोर मांडण्यासाठी यूट्यूबची फारच मदत होत आहे. ही सर्व प्रगती लोकांचा आमच्यावर असलेला विश्वास आणि आमच्या कामाचे स्वरूप बघून शासनाने उत्कृष्ट वेबपोर्टल म्हणून गौरवलं तर अनेक पुरस्कारदेखील मिळाले.

म्हणूनच मागे वळून पाहता समाजाने आपल्याला पुरस्कार, सन्मान देऊन आपल्यावरची जबाबदारी वाढवली आहेच.

आपण एवढे काही केले नाही फक्त चांगलं काम करायचे आणि ते समाजासमोर आणायचे, हे म्हणता म्हणता इथपर्यंत येऊन पोहोचलो. स्त्रीमुळेच जग घडलंय, घडतंय आणि स्त्रीला जर समजून घेतलं आणि योग्य तो मान दिला तर चांगला समाज घडविण्यात स्त्रीचा नक्कीच मोठा वाटा असेल, नाही आहेच.

महिला दिन, मार्च महिना म्हणजे महिलांचा महिना धरून जे काही कार्यक्रम होतात त्याहीपेक्षा प्रत्येक दिवस हा स्त्रीच्या सन्मानाचा असावा, असे मला वाटते.

❖❖❖

*(न्यूज स्टोरी टुडे ह्या डिजिटल वेब पोर्टलच्या निर्मात्या)*

(E-mail : alka.bhujbal1964@gmail.com)

# आजच्या युवा पिढीची लग्नाची समस्या

■ संकेत मुनोत

सध्याच्या युवापिढीसमोर अनेक आव्हाने आहेत त्यातील मुख्य ३ म्हणायची तर नोकरी, व्यवसाय आणि लग्न. यात पहिल्या २ म्हणजे नोकरी किंवा व्यवसाय हे प्रश्न हळूहळू का होईना सुटूनही जातात पण लग्न जमणे आणि त्यानंतर ते टिकणे हे आजच्या जमान्यात खूप मोठे चॅलेंज झाले आहे. अर्थात अवास्तव अपेक्षा हे त्यामागचे मोठे कारण आहे असे मला वाटते.

इतिहासाचा अभ्यासक म्हणून विचार केला तर महात्मा फुले, महात्मा गांधी किंवा इतर जे काही महामानव झाले त्यांच्यापुढे हे चॅलेंज नव्हते. विशेष म्हणजे जोडीदारामुळे अधिक चांगले काम करू शकलो हे दोघेही मान्य करतात आणि सावित्रीबाई आणि कस्तुरबाही त्यांच्यामुळे स्वत:ला अधिक चांगले घडवू शकल्या.

'आर्थिक नियोजन आणि आर्थिक वृद्धी कशी करावी?' याबद्दलची कार्यशाळा घेताना मी नेहमी सांगत असतो की आपण खर्च करत असताना इच्छा आणि गरज यामध्ये गरजेला महत्त्व द्यावे तेच तत्त्व मला लग्नाच्या बाबतही सामान वाटते की 'जोडीदार म्हणून मला गरजेचे काय आहे?' ते पाहायला हवे. इच्छा तर एखाद्याची करीना कपूरशी लग्न करायची असेल पण मग तोही सैफ अली खान आहे का? अवास्तव अपेक्षा ठेवू नयेत हे यानिमित्त समजते.

मुलगा किंवा मुलगी पाहताना बहुतेक लोक काय पाहतात? याबद्दल काही दिवसांपूर्वी मीम बनवले होते त्यात या गोष्टी मांडल्या होत्या.

मुलगा असेल तर बहुतेक जण त्याची जात, धर्म, वार्षिक उत्पन्न, संपत्ती, स्वत:चे घर, जमीन, नोकरी, व्यवसाय, शिक्षण वगैरे पाहतात तर तेच मुलगी असेल तर बहुतेक जण तिची जात, धर्म, रंग, उंची, सौंदर्य वगैरे पाहतात.

यात अशा अपेक्षातून जोडीदार मिळाला तरी तो संसार पुढे किती चांगला चालेल? किंवा लोकांना दाखवण्यासाठी नुसतं चाललंय म्हणून चाललंय असेही बऱ्याच ठिकाणी होते पण यात जर खरंच काही महत्त्वाच्या गोष्टी पाहिल्या तर बराच फरक पडू शकेल आणि निवड सोप्पी होईल.

**मुलगा पाहताना -** खूप मोठी संपत्ती आणि माझ्या दुप्पट-चौपट उत्पन्न मुलाचे असावे - पूर्वी मुलींना शिक्षणाचा अधिकार नव्हता, त्यामुळे उत्पन्नही नव्हते. त्यामुळे दुप्पट, तिप्पट उत्पन्न सहज शक्य होते कारण तिचे उत्पन्नच शून्य होते पण आज जेव्हा शिक्षणाचा समान अधिकार मिळाला आहे तर नोकरी मिळताना पण समान उत्पन्न मिळणार ना? नोकरी देताना मुलगा आहे म्हणून जास्त आणि मुलगी आहे म्हणून कमी देतात का? त्यामुळे जमाना बदललाय तसा मुलींनीही बदलायला हवे. दुप्पट उत्पन्नाच्या ऐवजी  कुटुंबाची जबाबदारी व्यवस्थित घेऊ शकेल, घर चालवू शकेल एवढे उत्पन्न मुलाचे आहे ना? हे पाहायला हवे असे मला वाटते. संपत्ती पाहतानासुद्धा अति संपत्तीऐवजी आर्थिक स्थैर्य आहे ना एवढे पाहायला हवे.

**मुलगी पाहताना -** मुलगी पाहताना तिचा रंग, उंची, सौंदर्य या गोष्टी अधिक पाहिल्या जातात. रंग कुठला असावा किंवा उंची किती असावी? हे आपल्या हातात नाही त्यामुळे ते न पाहता दोघेही एकमेकांना थोडे फार अनुरूप आहेत का हे पाहायला हवे असे मला वाटते.

यात स्थळ पाहताना जाती धर्माच्या चौकटीमुळेसुद्धा बऱ्याच अडचणी येतात. नुकतेच एका मुलीला भेटलो तिला सुशिक्षित, शाकाहारी आणि निर्व्यसनी मुलगा हवा आहे पण तिच्या जातीत असा मुलगा मिळणे अवघड जाते पण जातीबाहेर पाहायचीही तिच्या किंवा तिच्या घरातील लोकांची तयारी नाही आणि यात वय ४५ झाले. पूर्वी घटस्फोट झाला ते स्वत:च्या जातीधर्मातलेच होते पण तरीही चौकटीबाहेर जायचा विचार नव्हता आता थोडा फार झाला पण वय वाढले.

जात असो किंवा धर्म असो आपण माणसांनीच निर्माण केलेले आहेत त्यामुळे आयुष्याचा पुढचा प्रवास करताना त्याबाहेरही विचार करायला हवा असे मला वाटते. मुख्य गोष्ट ही पाहायला हवी की एकमेकांच्या वाइब्स जुळतात का? मग धर्म, जात कुठलीही असो छान नाते चालू शकते.

जवळचे उदाहरण द्यायचे तर माझा मित्र प्रशांत आणि विशाल या दोघांच्याही पत्नी रेश्मा आणि आरजू या मुस्लीम आहेत पण त्यांचा खूप छान संसार चालू आहे. तेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अन्वर राजन मुस्लीम तर त्यांच्या पत्नी हिंदू आहेत त्यांचाही संसार छान सुरू आहे. अर्थात हे हिंदू मुस्लीम द्वेषाचे चित्र सतत रंगवले जाते म्हणून याचे उदाहरण दिले. पण इतरही जाती धर्मात असे अनेक आंतरजातीय आंतरधर्मीय जोड्या पाहिल्या तर त्यांचे संसार छान सुरू आहेत. दोघेही एकमेकांचे सणवार छान साजरे करतात. पण असा जाती धर्माबाहेर खूप कमी लोक जोडीदाराचा विचार करतात आणि तसा एखादा चांगला मोठा

प्लॅटफॉर्मही उपलब्ध नाही जो अशा लोकांना मदत करेल तर तो निर्माण करण्यासंदर्भात चळवळीच्या मोठ्या लोकांनी विचार करायला हवा.

अर्थात तसाच जोडीदार असावा असे काही नाही आपण जन्मलेल्या जाती धर्मात किंवा बाहेर कुठेही लग्न करावे पण समजून उमजून करावे असे मला वाटते.

**मुलगा म्हणून लग्नाच्या बाजारात जोडीदार शोधताना येणारे अनुभव -** मुलींनाही चांगले-वाईट अनुभव येत असतील पण एक मुलगा म्हणून मी जेव्हा या बाजारात जातो तर विविध अनुभव यात येतात. सध्या विविध राज्यांत आणि इतर देशांत फिरताना असे वाटते की आपण आयुष्यात थोडे की होईना काही तरी साध्य केले आहे पण जेव्हा एखादी मुलगी किंवा मुलीचे वडील वरून खाली पाहतात तेव्हा असे वाटते की आपण तर कुठेच नाही. २ वर्षांपूर्वी एका मुलीच्या वडिलांचा फोन आला की तुमचे उत्पन्न किती, तेव्हा माझे ** लाख की काही तरी वार्षिक उत्पन्न होते तर ते विचारत होते अजून काही - अजून काही मी म्हटले नाही एवढेच आहे मग flat २ BHK च आहे ३ BHK कधी घेणार? मी म्हटलं पूर्वी १ BHKच होता आणि तो १ रूम जास्त घेण्यासाठीच म्हणजे २ BHK बनवण्यासाठी मला बिल्डरला जवळपास ४० लाख द्यावे लागलेत त्यामुळे लगेच विचार नाही तर तो म्हणाला 'चिंतन करता हु मै' मी मनात चिंता करा असं म्हटलं पण फक्त दिखाव्याला म्हणजे शो ऑफला महत्त्व आणि प्रामाणिक चरित्र, विचारांची प्रगल्भता, निर्व्यसनीपणा आणि संवेदनशीलता वगैरे गोष्टीला या लग्नाच्या बाजारात काहीच महत्त्व नाही असे कधी-कधी वाटते. अर्थात हे काही असले तर या गोष्टी चांगल्या आहेत आणि त्या आवश्यकच आहेत.

अजून एक अडचण येते विचार मांडण्याची. एकेकाळी मीही एखाद्या धर्मांध नेत्याला मानणारा, प्रोपोगंडा गोष्टींना खरा मानणारा, एखाद्या धर्माचा द्वेष करणारा किंवा त्यांच्याबद्दल आकस असणारा असा होतो पण जसजसा अभ्यास वाढला तशा दोन्ही बाजू समजल्या आणि जे सत्य समजले ते मांडू लागलो आणि त्याबद्दल काही जण व्याख्यान वगैरे द्यायलाही बोलावू लागले, वृत्तपत्रात लेख प्रकाशित होऊ लागले, टी.व्ही. चर्चामध्येही अभ्यासक म्हणून निमंत्रण मिळाले त्यामुळे तेथेही सत्य मांडू लागलो, हेतू हाच की सगळीकडे प्रेम आणि अहिंसा पसरावी पण मी ज्या जातिधर्माचा भाग आहे तिथे मात्र आजही बहुसंख्य मी ज्या पूर्वीच्या फेजमध्ये होतो त्यातच आहेत आणि त्यांना हे चुकीचे वाटते. शिवाय मी जेव्हा त्यांच्या प्रचारकी द्वेषपूर्ण विचारांशी सहमत होत नाही आणि एखाद्या नेत्याचे समर्थन करायला नकार देतो किंवा त्यांना तार्किक प्रश्न विचारतो तेव्हा मात्र ते चिडतात. नवीन काही वाचण्याची तयारी नसते आणि स्वत:च्या मनात असलेला प्रोपोगंडा सोडण्याचीही तयारी नसते. मी बहुतेक वेळेला या लग्नाच्या बाजारात तो विषय काढत नाही इतर आवडी निवडी, संसार, करीअर यावरच बोलतो पण कधी तरी समोरचा विषय काढतो आणि अडचण होते.

असो मी नाते तुटण्यातून (डिवोर्समधून) गेलो आहे त्यात ते नाते तुटू नये म्हणून मी खूप प्रयत्न केले पण समोरची व्यक्ती तयारच नव्हती. दोघांच्याही काही चुका असतील किंवा उणिवा असतील पण त्यावर मत करून स्वत:मध्ये सकारात्मक बदल करून पुढे जावे अशी इच्छा होती. पण ते शक्य झाले नाही कुठलेही नाते एकाच बाजूने टिकत नसते आणि आज त्या गोष्टीबद्दल बरेही वाटते की तुटले ते बरे झाले नाही तर आजही स्वत:ला सिद्ध करत बसावे लागले असते. पण हे होत असताना हे ठरवले होते की आपल्याला ज्या गोष्टीमुळे या गोष्टीमुळे एवढा त्रास होतोय त्याच्या मुळाशी जायचे आणि त्यावर शक्य असेल ते काम करायचे आणि त्यातून नाते टिकवू या या चळवळीची सुरुवात झाली. यात समुपदेशक, सामाजिक कार्यकर्ते आणि काही लोकांची टीम बनवली आणि समुपदेशन सुरू झाले ज्यात आम्ही या समस्येतून जाणाऱ्या लोकांचे कॉल घेतो आणि त्यांची नाती सुंदर करण्याचा, तन कमी करण्याचा प्रयत्न करतो.

ते करताना जोडीदार निवडीबाबत लेख लिहिला होता तो खालीलप्रमाणे

**जोडीदार निवडीचा कार्यक्रम साधा करण्याची गरज -** काही समाजामध्ये दाखवण्याचा कार्यक्रम खूप मोठा असतो. त्यात मुलीच्या घरातील काही लोक मुलाच्या घरी येतात तर त्यांचा खूप पाहुणचार करावा लागतो, त्यांना आग्रह करण्यासाठी नातेवाईकांना बोलवावे लागते. सुरुवातीला ५-१० प्रकारचे ड्राय फ्रुट्स आग्रह करून देणे त्यानंतर नाश्ता/जेवण, ज्यात अनेक पदार्थ, मिठाई ते झाले की अजून काही असा खूप पाहुणचार करावा लागतो. मुलगा आतमध्ये बसलेला असतो त्याला हे झाल्यानंतर बोलावले जाते आणि मुलाच्या घरच्यांची त्याबद्दलच खूप धावपळ उडते. अर्थात हे करणे सक्तीचे नसते पण नाही केले तर मागे बोलले जाते त्यामुळे बहुतेक जण हे करतातच.

**लग्न कुठल्या प्रकारचे -** लग्न हा क्षण एका नवीन आयुष्याची सुरुवात असल्याने तो आनंद आपल्या आप्तजणांना आणि मित्रांना बोलवून द्विगुणित करावा अशी प्रत्येकाची इच्छा असते त्यामुळे रजिस्टर लग्न बहुतेक जण करत नाहीत, पण जे आप्तजनांना बोलावून करायचे लग्न आहे तेही अगदी साध्या पद्धतीने करता येणे शक्य आहे, त्यातून एक सामजिक संदेशही जातो. माझ्या अनेक मित्रांनी या प्रकारचे लग्न केले आहे. जैन

लग्न, गांधीविवाह किंवा सत्यशोधक लग्न ही त्या प्रकारची आदर्श लग्न आहेत. हाच खर्च पालकांनी आपल्या पाल्यांना चांगले संस्कार, शिक्षण देण्यास त्यांना त्यांच्या पायावर उभे करून देण्यास खर्च करायला हवा. शिवाय अशा साध्या लग्नात नातेवाईकांचा मानपान, रुसवेफुगवे या गोष्टीही टाळल्या जातात ज्यामुळे लग्नाच्या वेळी याला हे केले, त्याला हे केले नाही यामुळे होणारे रुसवेफुगवे व त्यातून होणारा मानसिक त्रासही टाळला जातो जो ७०% लग्नात असतोच असतो. बहुतेक लग्नांमध्ये कोणी न कोणी नातेवाईक रुसून फुगून जातो, गोंधळ घालतो आणि ऐन आनंदाच्या क्षणी आनंदात विरजण पडते. उदाहरण द्यायचे तर माझा मित्र सचिन आशा सुभाष याने जवळपास हजार लोकांना बोलवून सत्यशोधक पद्धतीचे लग्न केले ज्यात या सर्वांचे जेवण, मंडप व इतर सर्व मिळून खर्च जवळपास लाख रु.च्या आत आला शिवाय लग्नात भेटवस्तू ऐवजी त्याने पुस्तके स्वीकारली ज्यातून त्या दोघांच्याही गावात त्यांनी एक चांगले वाचनालय सुरू केले, अशी अनेक उदाहरणे आहेत.

**लग्नाबद्दल मानसिक तयारी -** फक्त वय झालंय म्हणून टाकू या उरकून असं म्हणण्यापेक्षा खरंच आपण ती जबाबदारी पेलू शकतील अशी त्यांची क्षमता झाली आहे का? ते पाहावे.

कुठलेही लग्न म्हटले की तडजोड ही करावीच लागते पण 'मी कसलीही तडजोड करणार नाही आहे तसाच किंवा तशीच राहणार' म्हटले तर लग्न झाल्यानंतर सर्व गोष्टी अवघड होऊन बसतात. कारण दोन भिन्न वातावरणात वाढलेल्या व्यक्ती म्हटल्या की त्यांचे स्वतंत्र अस्तित्व असणारच अशा वेळी दोघांनाही एकमेकांसाठी काही सकारात्मक तडजोडी कराव्या लागतील त्याची तयारी असायला हवी. हुंड्याला स्पष्ट नकार द्यायला हवा. शिवाय नाते टिकवायचे म्हटले तर अहंकार कमी करायला हवा, मी आहे तसाच किंवा तशीच राहणार कधीच झुकणार नाही असे चालत नाही.

नाते सांभाळायचे म्हटले तर ते टिकवण्यासाठी त्यात थोडी झुकण्याची सोबतच त्याग, समर्पण, प्रेम या गोष्टींचीही गरज असते.

**जोडीदार निवडताना -** आपल्या इथे पत्रिका जुळवण्याकडे अधिक लक्ष दिले जाते त्याऐवजी विचार कुंडली जुळते का त्याकडे अधिक लक्ष द्यायला हवे. बाह्य सौंदर्य जसे की रंग, उंची, बांधा यापेक्षा आंतरिक गुण जसे की स्वभाव, वैचारिक बैठक यांच्याकडे अधिक लक्ष द्यावे. एकमेकांचे छंद, आवडी-निवडी, सवयी जाणून घ्यायला हव्यात आणि समोरच्याचा या गोष्टींचा आपल्याला त्रास तर होणार नाही ना हे पाहायला हवे. अवास्तव अपेक्षा टाळायला हव्यात. स्वप्ने, भविष्याबद्दलचे विचार यातही थोडे साम्य असायला हवे.

त्यामुळे ओळख झाल्यापासून ते लग्न यामध्ये किमान २ महिने ते वर्ष एवढे अंतर तरी असावे जो वेळ एकमेकांना समजून घेण्यासाठी देता येईल शिवाय जर नाहीच जुळले विचार तर तेव्हा तेथेच थांबताही येते, घटस्फोटापेक्षा ते कधीही चांगले.

१००% सगळ्या दृष्टीने परिपूर्ण असे कोणीच नसते त्यामुळे अपूर्णतेतही आपल्याला आवश्यक असलेले गुण आहेत का ते पाहता यायला हवे.

आर्थिक जबाबदारी इ. गोष्टी जोडीदार पाहताना स्पष्ट पाहायला हव्यात उगाच वय होत चाललंय म्हणून इच्छा नसताना एखाद्या आपल्या अपेक्षेपेक्षा कमी आर्थिक परिस्थिती असलेल्या व्यक्तीशी लग्न करणे आणि लग्नानंतर अधिक आर्थिक क्षमतेच कुणी दिसलं की आहे त्या नात्याला तोडणे असे प्रकारही घडतात तेच सौंदर्य, शिक्षण इ. गोष्टी पूर्वीच पाहायला हव्यात उगाच सुरुवातीला नाते जोडायचे आणि नाही पटले किंवा दुसरे कुणी अजून सुंदर दिसले की आहे ते तोडणे चुकीचे आहे.

**व्यसन -** आपल्या समाजातही व्यसनांचे प्रमाण हळूहळू वाढत चालले आहे त्यामुळे त्याबद्दल चौकशी करायला हवी आणि व्यसनी जोडीदाराला स्पष्ट नकार देता यायला हवा.

**वैचारिक पातळी आणि सामाजिक भान -** आपला जोडीदार सामाजिक, कला, राजकीय किंवा साहित्यिक क्षेत्रात असेल तर त्याच्या गोष्टींचा आपल्याला त्रास तर होत नाही ना, आपण त्या गोष्टीत साथ नाही देऊ शकलो तर किमान प्रोत्साहन तर देऊ शकू ना हे पाहायला हवे.

शिवाय त्याच्या किंवा तिच्या लेखनाचे, साहित्याचे, कलेचे अर्थ किंवा उद्देश आपल्याला समजत आहेत ना? जर ते समजत नसतील तर त्या गोष्टीतून वेगळे काही अर्थ निघून गैरसमज होण्याची शक्यता असते.

उदा. माझी एक मैत्रीण पुरोगामी, वैज्ञानिक आणि आधुनिक विचारांची तर तिच्या नवऱ्याचे आई-वडील प्रचंड धार्मिक, ज्योतिषशास्त्र वगैरे मानणारे त्यामुळे ही जे काही लेख त्या अंधश्रद्धावर किंवा कशावरही लिहिते तर ते आमच्यावरच आहेत असे त्यांना वाटते आणि त्यातून गैरसमज वाढत जातात खरतर ती बऱ्याच वर्षांपासून लिहीत होती हे त्यांना समजायला हवे होते, पण वैचारिक आणि बौद्धिक अंतर असल्यावर अर्थाचा अनर्थ होतो तो असा.

**जोडीदाराची संगत -** कुठल्याही व्यक्तीची ओळख त्याच्या संगतीवरून होते. त्याच्यासोबत असणारा मित्र परिवार कुठल्या दर्जाचा आहे त्यावरूनही त्याचा किंवा तिचा स्वभाव लक्षात येतो. कारण जशा व्यक्ती असतात तसे लोक त्यांच्याकडे आकर्षित होतात.

**लग्न झाल्यावर -** एकमेकांशी खुला संवाद, मेसेज किंवा

फोनवरून बोलण्यापेक्षा प्रत्यक्ष फेस टू फेस बोलणे कधीही चांगले, कारण प्रत्यक्ष बोलण्यात आवाजाला चढ-उतार असतो. चेहऱ्यावर हावभाव असतात ज्या गोष्टी मेसेज किंवा फोनवर शक्य होत नाहीत आणि गैरसमज वाढण्याची शक्यता असते

**एकमेकांची छेड काढणे -** लग्नानंतरचे नाते healthy ठेवायचे असेल तर थोडी विनोदबुद्धी असायला हवी आणि एकमेकांची छेड काढणे, चिडवणे यातून प्रेम वाढते.

**मतभेद झाल्यास दोघांत सोडवणे -** दोन भिन्न व्यक्ती म्हटल्यावर मतभेद हे होणारच पण ते झाले तरी मनभेद होता कामा नये ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी, झालेले भांडण तिसऱ्या कुणाला सांगितले जाते तेव्हा दुरावा वाढण्यातच अधिक मदत होते.

सामान्यत: मनुष्य एखाद्याशी झालेल्या वादाबद्दल सांगताना स्वत:च्या चुका नकळतपणे लपवत असतो किंवा कमी करून सांगत असतो. यामुळे ज्याच्यासोबत आपण ही गोष्ट शेअर करतोय ती व्यक्ती तेवढेच ऐकून त्या-त्या दृष्टीने आपले मत बनवते आणि समजा ती गोष्ट त्या व्यक्तीने अजून काहींना सांगितली तर ५ जणांचे ५ सल्ले यातून वाद विकोपाला जातो.

**समजूतदारपणा -** ही सर्वात महत्वाची बाब आहे, छोट्या-छोट्या गोष्टी पकडून न ठेवता एकमेकांना समजून घेऊन पुढे जायला हवे. समोरचा व्यक्ती माणूस आहे आणि तो चुकू शकतो आणि आपणही चुकू शकतो ही गोष्ट मान्य करायला हवी.

**कौतुक आणि टीका -** कौतुक चारचौघांत करायला हवे तर चुका या एकट्यात त्याही थोड्या वेगळ्या शब्दात सांगायला हव्यात, पण बऱ्याच ठिकाणी नेमके याच्या उलटे घडते.

**पालकांचा संसारात अतिहस्तक्षेप -** आपला मुलगा वा मुलगी किती वाजता उठतो, काय खातो, कुणाला किती पैसे देतो त्यापासून अनेक ठिकाणी पालकांचे लक्ष असते आणि अशी प्रत्येक गोष्ट पाल्याकडून फक्त जाणूनच घेतली जात नाही तर त्याच्यावर नाहक सल्लेही दिले जातात की हे असे-असे असायला हवे शिवाय त्या सगळ्याच बाबतीत संसारात लुडबुडही केली जाते.

नाते टिकवू या चळवळीत आत्ताच जॉइन झालेल्या व कौटुंबिक समुपदेशक आणि सल्लागार म्हणून दीर्घ अनुभव असलेल्या छाया सावरकर यांनी सांगितले की त्यांनी जेवढ्या केसेस हाताळल्या त्यात घटस्फोटासाठी सर्वाधिक आढळलेले कारण हे मुलीच्या आईचा त्यांच्या संसारात अतिहस्तक्षेप हे आहे. आपल्या मुलीला जर मारहाण होत असेल, हुंड्याची मागणी होत असेल, तिच्या जिवाला धोका असेल अशा वेळी हस्तक्षेप करून जाब विचारायलाच हवा पण इतर प्रत्येक गोष्टीत माहेरहून लक्ष घालणे चुकीचे आहे.

शिवाय मुलाच्या पालकांनीही सुनेकडून अवास्तव अपेक्षा, तिच्याकडून माहेरहून काही आणण्याची मागणी, मारहाण इ. गोष्टी टाळायला हव्यात. यात सध्या मम्माज बॉयसारखी मुलेही कारण ठरली आहेत. लग्न झाल्यावरही ती आईचा पदर सोडत नाहीत आणि माझी आई असे असे म्हणते तसेच तुला करावे लागेल यामुळेही काही नाती तुटल्याचे पाहण्यात आले.

**Mould for each other -** जगात made for each other असं कोणीच नसतं पण तुम्हाला थोडं mould for each other व्हावेच लागेल.

सकारात्मक बदल करण्याची तयारी- मी बिलकूल बदलणार नाही जे बदलायचं ते समोरच्यानेच हा दृष्टिकोनही घातकच.

**तुलना -** सतत दुसऱ्याशी तुलना करू नये. काही मुली आपले भाऊ, मामा, काका इ. कडे बघून आपल्या नवऱ्याची त्यांच्याशी तुलना करतात तर काही मुले आपली बहीण, आई, आत्या इ. बघून बायकोशी तुलना करतात व जोडीदाराने असे त्यांच्यासारखे व्हायला हवे अशी अपेक्षा ठेवतात ज्या चुकीच्या आहेत. सध्या सोशल मीडियामुळे तर या तुलनांचे प्रमाण खूपच वाढले आहे.

**स्वत:चे मत बनवण्याची क्षमता -** मुलगा असो वा मुलगी जर तो किंवा ती प्रत्येक गोष्ट दुसऱ्याच्या मतावरून ठरवत असेल तर वैचारिक परिपक्वतेअभावी गैरसमजच होण्याची अधिक शक्यता असते.

**काही गोष्टी सीक्रेट्स ठेवण्याची गरज -** नवरा-बायकोतील काही गोष्टी या सीक्रेटस म्हणजे गुप्तच असायला हव्यात पण जर एखादा जोडीदार दुसऱ्या कुणाला या गुप्त गोष्टी सांगत असतील तर ज्या व्यक्तीला ते सांगितले जाते त्यातून वाद वाढण्याची किंवा उलटा अर्थ निघण्याची अधिक शक्यता असते.

**धरसोड प्रवृत्ती नको -** धरसोड व्यक्तींना थोड्या दिवस एखादी व्यक्ती आवडते पण बाहेरहून कुणी फूस दिली की अरे किंवा अगं तुला यापेक्षा जास्त चांगला जोडीदार भेटला असता असे म्हटले आणि पालकांचाही जर याला दुजोरा मिळाला तर अशा व्यक्ती असणाऱ्या जोडीदारात सतत चुका शोधू लागतात, तू मला बोलायला पॉइंट देतोस/देतेस असे म्हणून समोरच्यात चुका शोधल्या जातात किंवा नसणाऱ्या चुका भासवल्या जातात ज्यामुळे दुसरा जोडीदार त्रस्त होतो, मग एक जण जोडायचा प्रयत्न करतो तर दुसरा तोडण्याचा प्रयत्न करतो, एक जण खोटेनाटे आरोप करत राहतो व दुसरा प्रत्येक गोष्ट सिद्ध करून दाखवू लागतो.

जोडणाऱ्याला जोडायचे असल्यामुळे तो किंवा ती कसेही करून नाते कसे चांगले होईल यासाठी प्रयत्न करतात. समोरच्याच्या

चुका दाखवण्याऐवजी स्वत:त सकारात्मक बदल करायची, सुधारण्याची ते तयारी दाखवतात आणि हवालदिल होतात तर तोडणाऱ्याला याची काही फिकीरच नसते त्यामुळे ते मिळेल तिथे खरे-खोटे आरोप करत आणि बदनामी करत जोडणाऱ्याचे मानसिक खच्चीकरण करत राहतात, तिसऱ्या व्यक्तीला सर्व बाजू माहीत नसतात त्यामुळे तोडणाऱ्याच्या आरोपांकडेच अधिक लक्ष जाते पण यात जोडण्याचा प्रयत्न करणारा माणूस खचून जातो त्यामुळे धरसोड प्रवृत्ती टाळायला हवी.

**एकमेकांना स्पेस देणे -** दोघांच्याही काही आवडी-निवडी असतीलच व त्या गोष्टी करण्यास एकमेकांना थोडी स्पेसही द्यायला हवी, उदा. एखादी मुलगी चांगली चित्रकार आहे पण लग्न झाले की तिला त्याबद्दल काहीच करू न देणे हे तिच्या कलागुणांना थांबवण्यासारखे आहे, तिच्या कलागुणांना वाव दिला तर ती आनंदी राहीलच शिवाय त्याचा फायदाही होईल. शिवाय अशा स्पेसचा गैरफायदाही घेता कामा नये म्हणजे आपली पहिली प्राथमिकता कुटुंब ही असायला हवी.

एकमेकांशी विचारांचे टोकाचे मतभेद असतानाही ते कायम ठेवून नात्यात मनभेद न ठेवता एकदम सुखी संसार केल्याची अनेक उदाहरणे मला माहीत आहेत, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. नरेंद्र दाभोलकर स्वत: अंधश्रद्धा मानत नसले तरी पत्नीच्या इच्छेखातर नऊ वर्षे रोज पत्नीच्या श्रद्धास्थळ असलेल्या मंदिरात ते त्यांना सोडत. महात्मा गांधींनी आश्रमात चहा-कॉफी वर्ज्य ठेवली होती ते स्वत: चहा कॉफी घेत नसत त्याला दारूसारखे पेय मानत पण जेव्हा एकदा कस्तुरबांना कॉफी पिण्याची खूप इच्छा झाली तर गांधीजींनी स्वत: त्यांना ती आणून दिली आणि आग्रहाने प्यायलाही लावली.

काही दिवसांपूर्वी अभिनेते श्रीराम लागू यांच्याशी जवळपास २ तास मनमोकळ्या गप्पा मारण्याची संधी मिळाली. ते पूर्णत: नास्तिक आणि बुद्धिवादी चळवळीला समर्पित आहेत, त्यांच्याशी गप्पा झाल्यावर त्यांच्या पत्नी दीपाताई यांच्याशी बोललो की तुम्ही पण याच विचारांच्या का वगैरे त्या हो म्हटल्या पण माझी थोडी श्रद्धा आहे मी गणपती बसवते तेव्हा तो त्याला विरोध करत नाही 'मला फक्त प्रसाद देत जा' असं श्रीराम जी म्हणत असल्याचे त्यांनी सांगितले.

आपली प्रेयसी हितार्थी पारख (गुजरात) हिला कॅन्सर असल्याचे कळूनही प्रवीण पाटील (सांगली) याने तिच्याशी लग्न केले आणि ५ वर्षे तिच्यासोबत पहाडासारखा उभा राहून तिला वाचवण्याचा प्रयत्न केला, अशीच कहाणी प्रथमेश आणि सोनालीची, दोघे चांगले मित्र होते. सोनालीच्या शिक्षणासाठी प्रथमेशने आपल्या आईचे दागिने विकले होते, पण दरम्यान काही वर्षांत प्रथमेशला कॅन्सर झाल्याचं तिला कळलं. त्याची अवस्था अतिशय बिकट झाली होती. अवघ्या २०व्या वर्षी कॅन्सर. प्रथमेश पूर्णपणे खचून गेला होता. तणावाखाली असलेल्या मित्राला प्रेमाची सावली द्यावी, या भावनेतून सोनालीने प्रथमेशशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. सोनाली म्हणते, '२५ जून २०१८ रोजी आम्ही विवाहबद्ध झालो. या दिवसापासून प्रथमेशला या सगळ्या अडचणीतून बाहेर काढण्याचा मी दृढनिश्चय केला होता. माझ्या आईवडिलांनी नेहमी मला दुसऱ्यांना मदत करण्याचे संस्कार दिल्याने मी हा निर्णय घेऊ शकले.'

आजही, प्रथमेशवर उपचार सुरू असून एका कार्यालयात तो अकाऊंट विभागात नोकरी करतो आहे. तर, सोनाली नगरपरिषदेत आरोग्यसेविका म्हणून काम करत आहे आणि त्याची तब्येत पहिल्यापेक्षा खूप सुधारल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

एकीकडे स्वार्थापायी काही नाती तुटताना ही उदाहरणे नाती कशी टिकवावी आणि फुलवावी याबद्दल प्रेरणादायी आहेत तर चला नाती अधिक सुंदर बनवू या.

त्यावरूनच अशा काही केसेस हाताळताना सहज सुचलेली कविता

मानलं तर लग्न आहे खूप सुंदर बात
जीवन जगायला मिळतो एक हक्काचा हात

ज्यांच्यासोबत शेअर करू शकू प्रत्येक बात
सुख-दु:खात मिळते एकमेकांची साथ

समजून घेऊ एकमेकांना थोडे
एकत्र मिळवून सोडू आयुष्याचे प्रत्येक कोडे

मान्य नसते कुणी made for each other
पण व्हा की थोडे Mould for each other

बघ मग कसा संसार होईल छान
एक बनेल जानू तर दुसरा बनेल जान

वेगवेगळ्या ठिकाणी वाढल्यावर भिन्न स्वभाव असणारच
वेगवेगळ्या प्रकृतीसारखे कुणी नसणारच

वेगळेपणातील अनुभवून सुख
चल करू या हास्यमय मुख...

❖❖❖

*(सामाजिक कार्यकर्ते, लेखक)*

(E-mail : changalevichar1@gmail.com)

# स्त्री चळवळीची पन्नास वर्षे

■ **वृषाली मगदूम**

१९७५ साल हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर झाले. या घटनेला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. सुरुवातीच्या वीस वर्षांमध्ये जगाच्या वेगवेगळ्या भागांत चार परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्त्रियांचे हक्क म्हणजेच मूलभूत मानवी हक्क म्हणत अर्धे आकाश आमचे ही घोषणा स्त्रियांनी दिली. स्त्रियांना भेदभावाची वागणूक मिळते हे जगभरात मान्य केले गेले. ८ मार्च १९१७ पासून स्त्री मुक्ती दिनही भारतात साजरा होऊ लागला. सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे ह्यांच्यासारख्या काही जणी स्त्रियांच्या स्थितीबद्दल परखड बोलत असत. स्त्री विकास हा मानव विकास आहे. स्त्री चळवळ ही स्त्रियांना स्वातंत्र्य, समानता, हिंसामुक्त जीवन जगता आलं पाहिजे यासाठी आहे असं स्त्री चळवळीने वारंवार सांगितलं. समाजामध्ये आत्मभान आलेल्या स्त्रियांचा व्यापक समूह यामध्ये होता. स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार करणारे पुरुषही या चळवळीत काही प्रमाणात सामील झाले. समाजामध्ये पुरुषप्रधान व वर्चस्ववादी व्यवस्था स्वीकारणारा शिक्षित मध्यमवर्गीय समूहही आजूबाजूला वाढताना दिसत होता व आहे. ही कुटुंब व्यवस्था योग्यच आहे ती बदलली तर फारच घोटाळे होतील असं मानणारा व तशी कुटुंब व्यवस्था बनवणारा स्त्री-पुरुषांचा समूहही समाजात लक्षणीय आहे. स्त्री चळवळीत डावे, समाजवादी, लोकशाही, पुरोगामी असे विविध विचारप्रवाह आहेत, उजवा विचार प्रवाह सोडला तर बाकी सर्व विचारधारा सारख्याच आहेत. ८ मार्च १८५७ ह्या दिवसाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. ह्या दिवशीच जगण्यासाठी भाकरी हवीच पण माणसासारखे जगण्यासाठी फुलेही हवीत असा संदेश अखिल मानव जातीला दिला. या घोषवाक्याची आजही तितकीच किंबहुना जास्तच गरज वाटते आहे. भारत सरकारने १९७४ मध्ये समतेकडे वाटचाल हा अहवाल सादर केला व भारतातील स्त्रिया सर्वच पातळ्यांवर अजूनही अप्रगत, अविकसित असल्याचे लक्षात आले. १९७५ साल हे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून जगभर साजरे केले गेले. त्यानंतर मात्र भारतातही संघटित, असंघटित क्षेत्र, शहरी, ग्रामीण परिसर या ठिकाणीही स्त्री प्रश्नांची समज वाढविण्यासाठी जाणीव जागृतीपर अनेक उपक्रमांचे आयोजन करायला सुरुवात केली गेली. १९७९ला स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समिती पुण्यात स्थापन झाली. तर स्त्री मुक्ती संघटनेची स्थापना मुंबईत झाली. पहिल्या दशकात व्यक्तिगत ते राजकीय, आमच्या शरीरावर आमचा अधिकार हे ठळकपणे सांगितले गेले. याच काळात 'आवाजे निस्वा' ही मुस्लीम महिलांची संघटना स्थापन झाली. दलित महिला संघटन मुंबईत सुरू झाले. स्त्री प्रश्नावर चर्चा करणारी अनेक नियतकालिके सुरू झाली. पुरुष उवाच, मावा यासारखे पुरुषांचे गटही संघटित झाले. अर्थात आजही, पारंपरिक भूमिकांना चिकटून राहिलेले पुरुष हक्क समितीसारखे गटही कार्यरत आहेत. गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा १९८८ साली महाराष्ट्रात प्रथम आला. मथुरा बलात्कार, शहाबानू, भंवरी देवी यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध भारतभर महिलांनी आवाज उठवला, तसेच त्याचा प्रतिकार केला. या सर्वांचा परिणाम म्हणून पोलीस स्टेशनमध्ये व सामाजिक संस्था अंतर्गत कौटुंबिक सल्ला केंद्र सुरू झाली. कुटुंब न्यायालय, महिला आयोग, महिला धोरण शासन पातळीवर स्थापित झाली. महाराष्ट्रभर बचत गटाचे सक्षम जाळे विणले गेले. बचत गटाच्या माध्यमातून महिला आर्थिकरित्या सक्षम झाल्या. कर्ज काढून मुलांचे शिक्षण करू लागल्या. छोटे-मोठे उद्योगही करू लागल्या. त्यामुळे दलित, ओबीसी काही प्रमाणात मुस्लीम, आदिवासी, कष्टकरी, शहरी व ग्रामीण महिलांचा वैचारिक स्तर उंचावला. आमची मुलं अडाणी राहिली नाही पाहिजेत ही भावना प्रखर झाली. राजकीय दिखाऊ बचत गटांचेही पेव फुटले. सरकारी फायदे पदरी पाडून घेण्यासाठी या गटांचा उपयोग केला जाऊ लागला. मेगा हळदीकुंकू आयोजित केले जाऊ लागले, महिला धोरण व ३३% आरक्षण यामुळे महाराष्ट्रात गाव पातळीवर व इतरत्र जवळजवळ एक लाख स्त्रिया राजकारणात सहभागी झाल्या. पण महिला राजकीयदृष्ट्या परिणामकारकरित्या सत्तेत आल्याचे दिसत नाही, पुरुषांच्या हिताचे राजकारण त्या करताना दिसतात, निर्भया केसनंतर सरकारच्या आदेशानुसार जे. एस. वर्मांनी फौजदारी कायद्यातील सुधारणा करायला सुरुवात केली. बलात्कार, घरगुती हिंसाचार, छेडछाड, ॲसिड हल्ला, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ यामध्ये सुधारणा करत ६३० पानी अहवाल २९ दिवसांत सरकारला सादर केला. मी निवृत्त न्यायाधीश असल्याने मला व्यक्ती नेमणे परवडणारे नाही असे म्हणत हा अहवाल स्वत: टाइप करून सादर केला, भारतभरातून वकील, चळवळीतले कार्यकर्ते, सामान्य लोक यांच्या या कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील सूचना व मते मागवली होती. जे. एस. वर्मांचा हा अहवाल ही महिला चळवळीतील सनद एक मौलिक ठेवाच आहे.

एवढ्या सर्व सकारात्मक घडामोडींनंतरही चळवळीतील आव्हानंही चळवळीला सतत मागे खेचणारी राहिली आहेत, खाउजा संस्कृतीचे आक्रमण उच्च मध्यमवर्गीय तरुणी व मुलींच्या

जगण्यावर झाले आहे. धर्म, रूढी, परंपरा यांचा पगडाही वाढत आहे. विविध धर्मांचे सण, नेत्यांच्या जयंत्या यांचा उत्सव केला जात आहे. वर्ग, विषमता दरी वाढत चालली आहे. स्त्रियांचा एक उच्च मध्यमवर्गीय समूह मेकअप, डिझायनर ड्रेस, पर्यटन यामध्ये मश्गुल आहे. तर जगण्यासाठी संघर्ष करावा लागणारा शेतमजूर, घरेलू कामगार, कचरावेचक, बांधकाम मजूर स्त्रिया रोजच्या भाकरीसाठी संघर्ष करत आहेत. आजही त्या समान वेतनापासून वंचित आहेत. विधवा, परित्यक्ता, दारुड्या नवऱ्याचा मार खाणाऱ्या या स्त्रिया आहेत. बाईचे दैवतीकरण करणाऱ्या व कुटुंब संस्थेचा उदो उदो करणाऱ्या आत्ममग्न मध्यमवर्गीय महिला व असंघटित शोषित महिलांचे जीवन पूर्णत: परस्पर विरोधी आहे. तसेच भगिनीभाव न जपणारे आहे. साध्वी ऋतुंभरासारख्या बेताल वक्तव्याला खतपाणी घालणाऱ्या स्त्रीला पद्मश्री दिली गेली. तर दुसरीकडे, हिंदू मुस्लीम स्त्रियांच्यात फूट पाडली जात आहे. हिंदू स्त्रिया जातधर्माच्या उत्सवात व हिंदू राष्ट्रबांधणीच्या कार्यक्रमात पुढाकार घेत आहेत. मोठ्या संख्येने मिरवणुकीत सामील होत आहेत. एका बाजूला मन विषण्ण करणारे चित्र दिसत असले तरी स्त्री चळवळीने संविधान व लोकशाही टिकवण्यासाठी संघर्ष केला आहे. धर्मांधताविरोधी महिला कृती समिती स्थापन झाली आहे हेही आव्हान पेलल्याचे आशादायक चित्र आहे. मुस्लीम समाज व मुस्लीम स्त्रिया या दशकात विकासाच्या मागच्या फळीवर फेकल्या गेल्या आहेत. असुरक्षित भयभीत वातावरणात जगत आहेत. सरकारने तोंडी तलाक अवैध ठरवला व त्याच वेळी असा तलाक देणाऱ्या पुरुषाला तीन वर्षे तुरुंगवासाची शिक्षा सांगितली. बिल्किस बानोच्या केसमधील आरोपींना सोडून दिले. त्यांचा सत्कार महिलांनी केला, बाबरी मशीद पाडण्यात स्त्रियांचा सहभाग होता. काश्मीर फाइल्स, केरळा स्टोरीज असे असत्यावर आधारित सिनेमे रिलीज करून सामान्य लोकांच्या मनात मुस्लीम द्वेष पसरवला. सर्वोच्च न्यायालयाने ८-१-२०२४ रोजी बिल्किस बानो केसमधील गुन्हेगारांची परत तुरुंगात रवानगी केली हे चित्र आशादायी आहे. मात्र स्त्री चळवळीत काम करताना एक ठोस भूमिका घेऊन काम करावे लागते. ५० वर्षे उलटून गेल्यानंतरही बलात्कार, हिंसाचार, बाल लैंगिक शोषण यात वाढ झाल्याचे दिसून येते. निर्भया केस, मुंबईतील शक्ती मिलमधील बलात्कार, हाथरसमधील बलात्कार व हत्या, बाललैंगिक शोषणाच्या असंख्य घटना सतत समाज माध्यमातून कानावर आदळतात. तेव्हा महिला चळवळ कायद्यातील बदल यांचा समाज मनावर काहीच परिणाम झाला नाही का? महिला चळवळ अजूनही आहे त्याच बिंदूवर आहे का? असेही निराशेकडे नेणारे प्रश्न भेडसावतात. शिक्षणाने मुलींना आत्मभान आलं. समतेचा व समानतेचा विचार त्यांच्यामध्ये रुजला, पण मुलग्यांना बदलण्याचे प्रयत्न घर, शाळा, महिला चळवळ यामधून झाल्याचे दिसत नाही. मुलगा आजही पुरुष या त्यांच्या पारंपरिक भूमिकेत जगत आहे. ही व्यवस्था बदलता येणार नाही अशीच त्यांची धारणा आहे, मर्दानगीच्या भ्रामक कल्पनेतून मुले बाहेर येत नाहीत, त्यामुळे आज मुलग्यांना जबाबदार लैंगिक वर्तन, प्रेम व मैत्रीतील फरक, मुलगी ही उपभोगाची वस्तू नाही हे सांगण्याचे व बदलण्याचे आव्हान पेलले तरच मुली निर्धोकपणे रस्त्यावर फिरू शकतील, सातच्या आत घरातची बंधने शिथिल होतील.

एनआरसी, नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीजन्स (राष्ट्रीय नागरिक नोंदणी) २०१९ मध्ये आसाममध्ये सुरू करण्यात आले. त्यानंतर १० जानेवारी २०२०ला भारतात अचानक एनआरसी लागू करण्यात आल्याची घोषणा झाली. सीएए अंतर्गत सिटीजनशिप अमेंडमेंट ॲक्ट (नागरिकत्व सुधारणा कायदा) मंजूर झाला. हिंदू, शिख, बौद्ध, जैन, पारसी, ख्रिश्चन यांना भारतात नागरिकत्व देण्याचा मार्ग खुला करत असल्याचे सांगण्यात आले. भारताच्या सामाजिक रचनेला यामुळे धोका निर्माण करणारे, विविधता व समावेशकता या सांविधानिक मूल्यांचे उल्लंघन करणारे, संविधानाला बाधा आणणारे हे कायदे असल्याने भारतभरातून याला विरोध झाला. मुस्लिमांना यातून वगळून धार्मिक भेदभावाची ठिणगी सरकारने टाकली. शाहीनबागमध्ये मुस्लीम महिलांनी आंदोलन केले. पण कोविड महामारीमुळे हे आंदोलन थांबले. शेतीत खासगीकरणाला वाव देणारे तीन कायदे मागे घ्यावे म्हणून दिल्लीत वर्षभर आंदोलन झाले. ५० हजार शेतमजूर स्त्रिया यात सहभागी झाल्या. सरकारला हे तीन कायदे मागे घ्यावे लागले. कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्याविरुद्ध सहा तरुण महिला खेळाडूंनी लैंगिक व मानसिक हिंसाचार केल्याची तक्रार केली, विनेश फोगट, साक्षी मलिक या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कुस्तीपटूंनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले, पण या आंदोलनाची कोणतीही दखल न घेता आरोपीवर कोणतीही कारवाई झाली नाही.

महिला चळवळीने अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध आंदोलन करणे, आवाज उठवणे, संघर्ष करणे, कायदा बदलाची मागणी करणे हे पन्नास वर्षांच्या वाटचालीत सातत्याने केले आहे. भवरी देवी, बिल्किस बानो, गौरी लंकेश, निर्भया, शक्ती मिल, हाथरस केस, प्रियांका भोतमांगेवरील अमानुष अत्याचार अशी अनेक उदाहरणे आहेत. या चळवळीचे यश हे परिणामावर नसून समाज ढवळून काढणे, या प्रश्नाविषयी सजग बनवणे, जाणीव जागृती करणे व समाजाचे एक पाऊल बदलाच्या दिशेने नेणं हे उद्दिष्ट आहे. भंवरी देवीला न्याय मिळाला नाही, पण कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार प्रतिबंधक पॉश कायदा आला. एक सजग चळवळ उभी राहिली. या सर्व लढ्यानंतरही महिला चळवळी पुढील आव्हानांचं पारडं जड राहिलं आहे, असं म्हणावं

लागेल. शिक्षणाने आत्मभान आलेल्या स्त्रिया बोलक्या झाल्या आहेत. अन्यायाला दाद मागू लागल्या. स्त्रियांचा आजचा लढा समतेसाठीचा आहे. अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेविरुद्धचा आहे. या लढ्यात माणुसकीचा विचार आहे. सर्वधर्मसमभाव आहे. संविधानाचा स्वीकार आहे. पुरुष वृत्तीचा व हुकूमशाहीच्या विरोधातला हा लढा आहे. लोकशाही प्रक्रियेसाठीचा संघर्ष आहे. पुरुष हा स्त्रियांचा शत्रू नाही, समग्र समतेचा विचार रुजवण्यासाठीचा हा लढा आहे. महिला चळवळीमुळे सूक्ष्म, स्थूल स्वरूपात दृश्य-अदृश्य बदल होत राहतील. कारण आजूबाजूची परिस्थिती, मूल्यं, विचार, पर्यावरणही बदलत आहे. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलही ठळकपणे समोर येत आहेत. त्यामुळे या बदलत्या परिस्थितीनुसार संघर्ष करणं, चळवळ उभी करणे, लोकांच्यात रुजवणं हे आव्हान महिला चळवळ सकारात्मक स्वीकारेल, आव्हानांचं स्वरूप बदलेल, पण आव्हान पेलण्याची प्रक्रिया निरंतर चालू राहील.

❖❖❖

*(लेखिका, स्त्री चळवळीतील कार्यकर्त्या, स्त्री मुक्ती संघटना, अन्नपूर्णा परिवार, अन्वय प्रतिष्ठान या संस्थांत विश्वस्त म्हणून कार्यरत.)*

(E-mail : vamagdum@gmail.com)

# अभिनंदन!



श्री. व्ही. सी. जोशी हे बँक ऑफ इंडियामध्ये जनरल मॅनेजर ह्या पदावर अनेक वर्ष कार्यरत होते. बँक ऑफ इंडिया व्यवस्थापनात श्री. व्ही. सी. जोशी ह्यांची ट्रेड युनियनला मदत करणारा, कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवणारा व्यवस्थापनातील उच्च अधिकारी अशी खास ओळख होती. अतिशय नि:स्पृह आणि कार्यप्रवीण तसेच निर्व्यसनी व्यक्तिमत्वाचे जोशी साहेब ही त्यांची आणखी एक ओळख. ए. आय. बी. इ. ए ह्या बँक कर्मचारी युनियनच्या असिस्टंट सेक्रेटरी असलेल्या आणि बँक ऑफ इंडिया मध्ये कार्यरत असणाऱ्या कॉ. दादा पुरव, तसेच कॉ. परांजपे, कॉ. केलावाला ह्या आणि अशा अनेक कामगार नेत्यांशी त्यांचा व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून घनिष्ठ संबंध आला. बँक ऑफ इंडियातून निवृत्त झाल्या नंतर सुद्धा डॉ. जोशी ए.आय. बी. ई. ए. ह्या बँक कर्मचारी संघटनेच्या कॉ. सुरेश धोपेश्वरकर, कॉ. देविदास तुळजापूरकर, कॉ. दीपक पाटील आदी अनेक नेत्यांच्या संपर्कात होते. आणि त्यांच्या माध्यमांतून जोशी साहेबांच्याकडे असणाऱ्या बँकिंग क्षेत्रातील समृद्ध ज्ञानाचा आणि संपन्न अनुभवाचा फायदा बँकिंग क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर होत आलेला आहे. डॉ. जोशी हे केम्ब्रिज विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे सहाध्यायी होते. आणि अगदी शेवट पर्यंत त्यांच्यातले हे स्नेहसंबंध टिकून राहिले. बँक ऑफ इंडियातर्फे नॅशनल इन्शुरन्स अकॅडमी ह्या संस्थेत त्यांची संस्थापक डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली आणि ती त्यांची कारकीर्द सुद्धा त्यांनी उत्तम रीतीने पूर्ण केली. डॉ. व्ही. सी. जोशी आणि अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक डॉ. मेधा ताई पुरव सामंत ह्यांचा त्यांच्याशी १९८१ पासूनचा अतिशय जिव्हाळ्याचा आणि प्रदीर्घ संबंध आहे. मेधा ताई मुंबईत बँक ऑफ इंडियाच्या ज्या मुख्य शाखेत काम करत असत तिथेच डॉ. जोशी हे मुख्य व्यवस्थापक म्हणून कार्यरत होते. त्याच सुमारास मेधा ताईंच्या वडिलांचे कॉ. दादा पुरव ह्यांचे दु:खद निधन झाल्याने ते मेधा ताईंच्या सातत्याने संपर्कात राहिले. कामगार नेत्या म्हणून मेधा ताई जेव्हा उदयाला येत होत्या त्याकाळात कॉ. केलावाला, कॉ. सुरेश धोपेश्वरकर आणि श्री. व्ही. सी. जोशी यांचा मेधा ताईंच्या जडणघडणीत मोलाचा वाटा होता. पुढे मेधा ताई पुण्यात आल्या तसेच डॉ. व्ही. सी. जोशीसुद्धा निवृत्ती नंतर पुण्यात स्थायिक झाले. मेधा ताईंनी अन्नपूर्णा परिवाराची स्थापना केली त्या अन्नपूर्णा परिवाराच्या वाढीत, वाटचालीत तसेच इंडियन ओव्हरसीज बँक ह्या बँकेच्या सोबत अन्नपूर्णा परिवाराचा टाईपअप होण्यात डॉ. व्ही. सी. जोशी ह्यांचे महत्वाचे योगदान आहे. निवृत्ती नंतरच्या काळात बँकिंग आणि अर्थशास्त्र ह्या विषयात त्यांनी वीस पुस्तकं लिहिली आहेत हे त्यांचे बँकिंग आणि अर्थशास्त्र ह्या क्षेत्रातील भरीव योगदान आहे. श्री. वसंत विनायक उर्फ व्ही. सी. जोशी हे ह्या वर्षी वसंत पंचमीला ९५ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यानिमिताने त्यांचे अन्नपूर्णा परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन करत आहोत. त्यांनी वयाची शंभरी गाठावी ह्या त्यांना अन्नपूर्णा परिवारातर्फे हार्दिक सदिच्छा....

# लेकीची आई होताना

**■ दिक्षा इंद्रसेन गोरे**

लेकीची चिमुकली सावली जेव्हा मोठी मोठी होऊ लागते तेव्हा आईला आपलं मन मोठं करावं लागतं. तिच्या हट्टासाठी तिच्या रुसव्या-फुगव्यांसाठी लहान होत लेकीचं बालपण आईनं जगावं लागतं.

मुलीचे फॅशनेबल जीवन जगताना आईलाही वारंवार अपडेट करून घ्यावं लागतं. स्वत:ला पळावे लागते तिच्या बरोबरीने, धावत्या जगात तिचा हात घट्ट पकडून नव्हे तिच्या प्रवासामधील सहप्रवासी होत, प्रत्येक वळणावर आईला मैलाचा दगड व्हावं लागतं. दिशा दाखवण्यासाठी, ती भरकटून जाऊ नये यासाठी.

कालांतराने आपल्या विचारांची उंची अन् व्यासही वाढवावा लागतो, लेकीला ध्येयापर्यंतचं अंतर गाठण्यासाठी आईला वापरावे लागतात अनेक मार्ग दोघींचे नाते अधिक देखणे, सुंदर होण्यासाठी. थोडक्यात काय तर मैत्रिणीपेक्षाही पुढे जावे लागते आपल्याच मुलींसोबत जगताना. मुलींच्या जास्त क्लोज होण्यासाठी दोघींतला संवाद वाढविणे गरजेचा असतो. वाढत्या वयाबरोबरच मुलींमध्ये होणारे बदल त्यांना कायम अस्वस्थ करत असतात. रोज घडलेले प्रसंग, मिळालेले अनुभव, पत्करलेले अपयश मग ते कशातही असो शाळा, कॉलेज, मैत्रीत, प्रेमात किंवा तिच्या व्यवसायामध्ये, तिने निवडलेल्या क्षेत्रात. तिच्यासोबत इतके मोकळे वागावे लागते की तिने आपल्या मनातील न्यूनगंड मनमोकळे मांडावेत आपल्या आईसमोर.

आपल्या आईवर स्वत: इतकाच उदंड विश्वास बसण्यासाठी, वाढवण्यासाठी आईला झटावे लागते. सतत मुलींच्या मूडनुसार तिला समजून घ्यावे. आईच जर मुलीशी मोकळेपणाने बोलत नसेल तर तिथे मुलींची शेअरिंग करण्याची इच्छा होत नाही, मुली शांत बसतात, मनातल्या मनात कुढतात, एकट्या गप्प बसतात. त्यांची घरात चिडचिड वाढते. मग अनायसे चोरून गुपचूप व्यक्त होण्याची ही गरज आपल्या मित्र-मैत्रिणींमध्ये भागवतात. मुली हळूहळू दूर होऊ लागतात, आईच्या पदरापासून. आयांनी प्रत्येक घरगुती प्रसंगात मुलींना सामील करावं. तिच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी कायम मदत करावी, तिच्याशी सतत विविध विषयांवर संवाद साधावा; तिचे मत जाणून घ्यावे, तिच्यासमोर मोकळेपणाने शरीरात होणारे नैसर्गिक बदल मांडावेत. स्त्रीला पूर्णत्व प्राप्त करून देणारा मासिक धर्म, पाळीबाबत असणारे समज-गैरसमज, नाती-गोती रीती-भाती त्याचबरोबर मुलींना गुड टच, बॅड टच यातला फरकही सांगावा. कोणाशी किती जवळीक साधावी, किती अंतर राखावे याचे मोजमाप ठरवून द्यावेत. प्रतिकूल परिस्थितीत, अत्याचाराला विरोध करायलाही शिकवावा. आईने लेकीला, घरात, समाजात वावरताना सर्व आलेख मांडून सतत आपल्या आतल्या स्ट्राँग विलपॉवरला जिवंत ठेवायला लावावे. नवीन फॅशनेबल जग अनुभवताना संस्कृतीशीही घट्ट मैत्री करायला लावावी असं म्हणतात. आईची सावली मुलीत दिसते. इतकं नितळ असावं दोघींतलं नाते. लेक आपलेपणा जपणारी, मायाळू, समजदार, स्वावलंबी, आपल्या पायावर उभी व्हावी यासाठी तिच्यासमोर कायम आदर्शवत विचारांना, व्यक्तींना मांडावे. तिच्या प्रत्येक निर्णयाला होकार न देता, चुकीच्या विचारांना समर्थन न देता योग्य मार्गदर्शन करत राहावे.

त्याचबरोबर आईला आपला मौल्यवान क्वालिटी टाइम लेकीला देणे गरजेचे असते आणि तिच्या जगण्याचे, तिच्या स्वप्नांचे पक्षी पंख पसरून आकाशात उंच उडावेत. थोडक्यात काय तर मुलींनी सक्षम व्हावे यासाठी कायम आईने तिच्यासोबत चालत राहावे, मैत्रीण होऊन दोघींतलं नातं अधिक गहिरं, गडद, घट्ट, गोड आणि समृद्ध व्हावं. त्यांच्यातील प्रेम झिरपत जावं, सतत फिल्टर होत राहावं अन् तळाशी निव्वळ गोडवा उतरावा. दोघींमध्ये एक पारदर्शी लेयर तयार व्हावा. आपल्या कोशातून बाहेर पडत लेकीच्या विश्वाला फुलवण्यासाठी आईने लेकीचे आभाळ व्हावे बस्स इतकेच...

कारण, ''आईसाठी मुलगी म्हणजे तिचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण होण्याची सुरुवात.''

❖❖❖

*(अन्नपूर्णा परिवार - ब्रांच १ एल एस ओ)*

# ती स्वयंसिद्धा

■ मोहिनी देशमुख

ती स्वयंसिद्धा, कोण बरं ती? स्वत:च्या गरजा स्वत: पूर्ण करणारी, कोणावरही निर्भर न राहणारी ती स्वयंसिद्धा...

स्वत:ची शक्ती व ज्ञान यावरती विश्‍वास ठेवून पुढे जाणारी. आयुष्याच्या वाटेवरील प्रत्येक आव्हानाला धाडसाने सामोरे जाऊन ध्येय साध्य करणारी. थोडक्यात विचार केला तर स्वयंसिद्धा म्हणजे अशी स्त्री जी स्वत:च्या कर्तृत्वाने समाजासाठी प्रेरणास्थान असते. असा विचार मनात येतो. हे अगदी खरंच आहे! परंतु समाजातील प्रत्येक स्त्री जिला स्वत:च्या अस्तित्वासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, कुटुंबाच्या उज्ज्वल भविष्यासाठी या पुरुषप्रधान समाजामध्ये प्रयत्नांची पराकाष्ठा करून यशाच्या मार्गावर ध्येय, चिकाटी आणि परिश्रम या मार्गाने जावे लागते. ती प्रत्येक स्त्री स्वयंसिद्धाच आहे.

तसा जर विचार केला तर स्त्री गरीब घरातील असो किंवा श्रीमंत घरातील, ती कमी शिकलेली असो वा न शिकलेली किंवा उच्चशिक्षित, प्रत्येक स्त्रीला या पुरुषप्रधान समाजामध्ये स्वत:ला सिद्ध करूनच यशाच्या मार्गाकडे जावे लागते.

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते हे वाक्य समाजाने सहज स्वीकारलं. पण कधी थांबून विचार केलाय का? मग स्त्रीच्या यशामागे कोण उभे राहते, स्त्रीला उभं राहण्यासाठी नेहमी आधाराची गरज नसते फक्त विश्‍वास पुरेसा असतो आणि तो विश्‍वास बहुतेक वेळा तिलाच स्वत:ला द्यावा लागतो. परंतु खूपदा तिच्या आयुष्यातील एखादी महत्त्वाची स्त्री तिला हा विश्‍वास देते. मग ती आई, मैत्रीण, बहीण किंवा स्वत:च स्वत:साठी उभी असते म्हणून स्त्रीच्या यशामागे बऱ्याचदा उभी असणारी ती स्त्री कोणालाही दिसत नाही. कारण ती टाळ्यांमध्ये नसते ती त्यागात, धिरात आणि शांतपणे लढण्यासाठी असते. म्हणून कदाचित स्त्रीचं यश थोडं उशिरा दिसतं, पण ते खोलवर बदल घडवतं.

हेच बदल स्त्रीला कणखर बनवतात. ती कणखर, जिद्दी, आत्मनिर्भर म्हणून जन्माला नाही आली. तिच्या आयुष्याच्या शाळेने तिला तसं बनवलं, कारण रोज काही तरी मोडलं तरी तिलाच ते सावरावं लागतं. कधी शब्दांनी दुखावलं, कधी अपेक्षांनी थकवलं, कधी शरीराने साथ दिली नाही तरी ती थांबत नाही. प्रयत्नांच्या पराकाष्ठा करताना डोळे पाणावतात, पण स्वत:च स्वत:चे अश्रू पुसून ती उठते व नव्या ताकदीने, नव्या जोमाने पुढे चालत राहते. कणखर असणे हा तिचा चॉइस नाही हे तिचं रोजचं जगणं आहे.

जी स्त्री फुलाप्रमाणे, कोमल सूर्याप्रमाणे तेजस्वी असते तीच स्त्री पुरुषांपेक्षा कायम कणखर वाटते. किती तरी वाईट प्रसंग पेलावून नेण्याची ताकद तिच्यात असते. दडपण आलं म्हणून स्त्री व्यसनांचा आधार घेत नाही हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. सर्व दु:ख पचवून कायम चेहरा हसरा ठेवण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे.

सरकारी व सामाजिक या दोन्ही माध्यमांतून स्त्रियांना स्वयंसिद्ध होण्यासाठी बरेच मार्ग उपलब्ध आहेत जसे की बचत गट त्यांच्यामार्फत स्त्रियांना वेगवेगळे उद्योग करता येतात व त्यासाठी वस्तू किंवा भांडवल पुरवले जाते. त्याचप्रमाणे विविध संस्थांमार्फत भरतकाम, ब्युटीपार्लर, शिवणकाम यांसारखे कोर्सेस मोफत आयोजित केले जातात. या संधीचा फायदा करून स्त्रिया आपल्या दैनंदिन आयुष्यातून दोन रुपये का होईना बचत करून आपल्या व कुटूंबाला आवश्यक गोष्टी खरेदी करू शकतात. या संधी उपलब्ध झाल्यामुळे स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम होतात. दैनंदिन आयुष्यात स्त्री तशी सक्षम झाली आहेच. असेच तिला सशस्त्र होण्याची पण गरज आहे, कारण शारीरिकदृष्ट्या स्त्रीला पुरुषांपेक्षा दुय्यम ठरवले जाते यासाठी लाठीकाठी तसेच कराटे, ज्योदो यांसारखे खेळ आयोजित करून प्रशिक्षण देऊन स्त्रियांना शारीरिकदृष्ट्या सक्षम केले जाते. स्त्रियांनी निर्भय बनायला हवं या उपक्रमांचा हेतू असतो.

खरंतर कोणत्याही क्षेत्रामध्ये स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी नाहीत. आपल्यासमोर तशी बरीच उदाहरणे आहेत. सर्व क्षेत्रांप्रमाणे भारतीय सैन्य दलातसुद्धा महिलांचे प्रतिनिधित्व कौतुकास्पद ठरले. या वर्षीच्या (२६/१/२६) प्रजासत्ताक दिनी भारतीय सैन्य दलातील परेडमध्ये पुरुषांच्या तुकडीचे प्रतिनिधित्व महिलांनी केले. त्यातील एक नाव म्हणजे सीआरपीएफ साहाय्यक कमांडर सिमरनवाला. स्त्रियांना सामाजिक दृष्टीने त्यांचा स्वाभिमान असावाच तसेच कुटुंबातही स्त्रीचे मानाचे स्थान असावे. तिच्या विचारांना व्यक्त करण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. स्त्रियांनी स्वयंसिद्ध होऊन स्वत:ला सिद्ध करणे जितके गरजेचे आहे. त्याहून पुढे जाऊन तिने आपल्या बरोबरच बाकी स्त्रियांनासुद्धा स्वयंसिद्ध करणे गरजेचे आहे.

❖❖❖

*(अन्नपूर्णा परिवार लोन व्हॅलिडेटर २)*

# कुटुंब घडले की समाज घडतो

■ **रेश्मा अभिजीत**

मैत्रिणींनो,

सामान्य जीवन जगत असताना जे मी अनुभवले, जे पाहिले, जे मनाला भिडले – त्या भावना, विचार आणि निरीक्षणे या लेखाद्वारे तुमच्यासमोर मांडण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे. कोणताही मोठेपणा किंवा विद्वत्तेचा दावा न करता, एका सामान्य स्त्रीच्या संवेदनशील मनातून उमटलेले हे विचार आहेत. आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, नाती, जबाबदाऱ्या आणि समाजातील वास्तव यांचा विचार करताना हा लेख आकार घेत गेला. कदाचित यात तुमच्याही आयुष्याचे काही प्रतिबिंब दिसेल, अशी मला खात्री आहे.

लहान मूल असताना ते आईच्या हाताने जेवते, आईचा हात धरून चालते. त्या वयात त्याला आई-वडिलांची गरज असतेच. पण जसजसे मूल मोठे होत जाते, तसतसे त्याचे स्वत:चे स्वतंत्र विचार तयार होऊ लागतात. घरातले वातावरण जसे असते, तसे संस्कार त्याच्यावर रुजत जातात; त्याचबरोबर बाहेरच्या जगाचाही प्रभाव त्याच्या मनावर पडत असतो.

अनेकदा मूल थोडे मोठे झाले की पालकांना असे वाटू लागते की आता त्याला आपल्या मार्गदर्शनाची फारशी गरज राहिलेली नाही. प्रत्यक्षात मात्र मूल ज्या टप्प्यावर खऱ्या अर्थाने मोठे होत असते, तोच काळ सर्वात जास्त लक्ष देण्याचा असतो. विचार, भावना आणि निर्णयक्षमता विकसित होत असताना योग्य दिशा मिळणे अत्यंत आवश्यक असते. योग्य विचार, योग्य कृती आणि योग्य संस्कार यांची बीजे याच काळात रोवली जातात. त्याचबरोबर त्याच्या करिअरविषयीचे मार्गदर्शन, जबाबदारीची जाणीव आणि आयुष्यातील योग्य-अयोग्य निवडी याबाबत पालकांची भूमिका फार महत्त्वाची ठरते.

आठवी-दहावीनंतर मूल तारुण्याच्या दिशेने वाटचाल करू लागते. या टप्प्यानंतर त्याचे योग्य घडवणे अत्यंत महत्त्वाचे असते. आई-वडिलांनी मुलगा असो किंवा मुलगी - कॉलेज जीवनात कसे वागावे, मुलांनी स्त्रीचा आदर कसा करावा, मुलींनी बाहेरच्या जगात स्वत:चा सन्मान जपत कसे वावरावे, तसेच पुढे लग्नानंतर कुटुंब कसे सांभाळावे – याबाबत योग्य मार्गदर्शन केले, तर उद्याची पिढी नक्कीच संस्कारी आणि सुसंस्कृत घडेल.

२१ व्या शतकात मुलांची विचारसरणी खूप बदलत चालली आहे. एकत्र कौटुंबिक पद्धती कमी होत चालली आहे, कारण आजकाल स्त्री-पुरुष दोघेही नोकरी करतात आणि त्यामुळे मुलांकडे लक्ष कमी दिले जात आहे. पण जर मुलांना आजी-आजोबांचे प्रेम आणि मार्गदर्शन मिळाले तर ते अधिक घडतात. पालकांनी आई-वडिलांचा आदर केल्यास मुलांवरही त्याचा प्रभाव होतो. अशी घडलेली मुले एकत्र कौटुंबिक मूल्ये जपतात आणि त्यातून समाजही घडतो. जशी आई मुलीला स्वयंपाक, घरकाम शिकवते आणि ''सासरी गेल्यावर हे करावं लागेल'' असे सांगते, त्याचबरोबर तिने मुलीला अडचणींवर मात कशी करायची, कुटुंबात आणि समाजात समतोल कसा साधायचा, तसेच प्रत्येक अडचणीतून योग्य मार्ग कसा काढायचा हेही शिकवणे तितकेच गरजेचे आहे. आयुष्य केवळ जबाबदाऱ्या पार पाडण्यात नसून, आलेल्या परिस्थितीला समजून घेऊन ठामपणे सामोरे जाण्यात असते.

त्याचप्रमाणे मुलालाही लहानपणापासून स्त्रीचा आदर कसा करावा, तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असावा, हे शिकवले पाहिजे. पुरुषप्रधान समाजात वावरताना स्त्रीकडे केवळ व्यक्ती म्हणून पाहण्याची, तिच्या भावना समजून घेण्याची आणि तिचा सन्मान राखण्याची शिकवण दिली गेली, तर असा पुरुष कधीही चुकीच्या किंवा हिंसक कृत्यांकडे वळणार नाही. अशा संस्कारांमुळे बलात्कार, छेडछाड यांसारख्या सामाजिक विकृतींपासून समाज दूर राहू शकेल. एक चांगले कुटुंब घडले, तर त्याचा थेट फायदा समाजाला होतो. प्रत्येकाने जर असा विचार केला, तर सामाजिक परिवर्तन घडायला फार वेळ लागणार नाही.

आज आपण २१व्या शतकात वावरतो. स्त्री आज अधिक मुक्त आहे आणि प्रत्येक क्षेत्रात ती पुढे जात आहे. तरीही आपण पाहतो की अनेक लग्ने टिकत नाहीत, अनेकदा मुलांवर

अन्याय होतो. यासाठी फक्त मुलगा किंवा मुलगी यापैकी एकालाच दोष देऊन चालणार नाही; दोघांनीही जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. तेव्हाच उद्याचे घर, गाव आणि समाज सुदृढ व संस्कारी घडेल.

कुटुंबामध्ये सासर असो किंवा माहेर – दोन्ही ठिकाणी समतोल आणि समजूतदारपणा आवश्यक असतो. मुलीने स्वातंत्र्य जपले, तरी काही मर्यादा पाळत सासू-सासरे आणि सासरच्या सर्व माणसांना आपलंसं करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे मुलानेही तितक्याच जबाबदारीने वागून, मुलीच्या भावना, तिचं माहेर आणि तिची पार्श्वभूमी समजून घेत तिला आधार दिला पाहिजे. दोघांनीही एकमेकांना समजून घेतले, तर दोन्ही घरे सुखी राहतात आणि पुढची पिढीही आनंदी घडते. या सर्व गोष्टींचा परिणाम प्रत्यक्षात मुलांवर आणि समाजावर होतो. जर मुलांना घरात स्त्रीचा आदर करण्याची, तिचे अस्तित्व जपण्याची शिकवण मिळाली, तर ते केवळ आई-वडिलांवर प्रेम करत नाहीत; ते समाजातही स्त्रियांचा सन्मान करतात. त्याचप्रमाणे, मुलगा-मुलगी यांच्यात जन्मानुसार किंवा लिंगानुसार भेदभाव न करता वागणे, समान संधी देणे आणि प्रत्येकाला न्याय मिळणं हे मूल्यदेखील घडते. अशा संस्कारांमुळे समाजात स्त्रीसमानतेचा आणि माणुसकीचा पाया घट्ट बसतो.

शेवटी एकच सांगायचं आहे, मैत्रिणींनो – लढा, जगा आणि जगून घ्या. एकट्या पडलात तरी कुठल्याही वाईट विचारांचा पगडा डोक्यावर येऊ देऊ नका. योग्य निर्णय घ्या, स्वत:चं अस्तित्व जपा, मुलांना घडवा आणि स्वाभिमानाने जगा.

❖❖❖

*(अन्नपूर्णा परिवार टूल्स एक्झिक्यूटिव्ह)*

# ।। कविता ।।

## नारी

नारी तू है सबसे महान
सँभाला है तुने हर एक कमान
कभी बन सावित्री ले आई अपने पिया के प्राण
तो कभी बन झांसी की रानी उतर पडी रणभूमी के मैदान

धरती हो या आकाश अंतरिक्ष का हो विशाल जाल
तुने बनाई हर जगह अपनी एक गहरी मिसाल
कभी कल्पना बन भरी अपने सपनो की उडान
तो कभी नीरजा बन बचाई लोगो की जान

नारी तू भगवान की है अद्‌भुत मुरत
बसती है जिसमें ममता की सूरत
तू ही शक्ती तू ही जीवन का आधार
बिन तेरे जगत की कल्पना है निराधार

बिना शिकवा शिकायत के करती है तू सबका सम्मान
निभाती है दिल से हर एक रिश्ता देती सबको अपना मान

फिर भी वंचित है तू अभी भी कही न कही
मिलता नही तुझे अपने हिस्से का सम्मान
पीनी पड रही है तुझ को घूँट-घूँट अपमान

नारी ना समझ ना तु खुद को अब अबला
पहचान खुद को क्योंकि है तेरा भी स्वाभिमान
क्योंकि है तेरा भी स्वाभिमान...

**– स्वाती पाटील**

## मी

मी, मी आहे मीच राहणार
मी राधा नाही होणार,
माझ्या प्रेमकथेत दुसऱ्या स्त्रीचा
पती नसणार

रुक्मिणीच्या डोळ्यात काटा होऊन
मी नाही सलणार,
मी राधा नाही होणार
मी, मी आहे, मीच राहणार

मी सीता नाही होणार
माझ्या पावित्र्याचं प्रमाणपत्र
मी नाही देणार, अग्निपरीक्षा नाही देणार

तो काय मला त्यागणार,
मीच त्याला सोडणार
मी, मी आहे, मीच राहणार

मी मीरा नाही होणार
कोणत्याही मूर्तीच्या मोहात पडून
घर संसार नाही सोडणार,
साधूंबरोबर मी नाही फिरणार

हातात एकतारा घेऊन
मी जबाबदाऱ्या नाही टाळणार
मी मीरा नाही होणार
मी, मी आहे, मीच राहणार

मी यशोधरा नाही होणार
जो सर्व सोडून निघून गेला
स्वत: जगासाठी देव झाला,

कितीही ज्ञान मिळू दे पण
मी पतीसाठी पतिव्रता नाही होणार
मी यशोधरा नाही होणार
मी, मी आहे, मीच राहणार

मी गांधारी नाही होणार
स्वत:च्या डोळ्यांना पट्टी बांधून
अंधकार स्वीकारून असा अर्थहीन
त्याग मी नाही करणार

याउलट अंधपतीचे डोळे होऊन त्याने माझ्या
डोळ्याने जग बघावे हाच प्रयत्न करणार
मी गांधारी नाही होणार,
मी, मी आहे, मीच राहणार

मी त्याच्यासह जगेन, मनाने त्याला वरेन
पण मी त्याचा अन्याय नाही सहन करणार,

मी कर्तव्याला नाही चुकणार
सारी कर्तव्य निभावणार
पण बलिदानाच्या नावाखाली
मी यातना नाही सहन करणार,
मी, मी आहे, मीच राहणार

**– संगीता गजबे**

---

## महिला दिन स्पेशल

मुलगी झाली लक्ष्मी आली,
बोलणं काही अवघड नसतं...
खरा आदर्श तोच असतो,
वागण्यातून ज्याच्या दिसतं...

सोडूनी द्या हा हट्ट तुमचा,
फक्त वंशाला दिवाच हवा...
दिव्याची ती वाटसुद्धा,
देई आयुष्याला आकार नवा...

झेप भिडे गगनी तिची,
'कल्पना' ही केली नाही...
झाली अनाथांची माय 'सिंधू',
कुष्टांची 'साधना' निराळीच काही...

रुपे तिची नऊ पाहुनी तुम्हा,
स्त्री शक्तीचा वाटेल अभिमान...
करुनी साजरा महिला दिन
देऊ तिला मानसन्मान...

**– प्रणाली अतुल पवार**

## बरं होतं तेच लहानपण!

लहानपणी होतं अंगण, ओटा, झाड, पक्षी, वाहणारं पाणी
सगळं समोरच
आता वन बीएचके असो नाही तर बंगला
त्या घरासारखं सौंदर्य दिसेनाच कोणाला
मातीच्या त्या घरातील ऊब येईल का फ्लॅटच्या घराला?

लहानपणी सण हवीहवीशी वाटायचे
सगळे सोबत असायचे खाऊ द्यायचे
ना कसलं काम ना कसलं ओझं
आणि आता सण आला तरी होतं कर्जाचं बोझं
ना कोणी आपले फक्त आम्ही चारच टकले
सगळं करा आपणच आपले...

लहानपणी ना कसली भीती ना कसली ओढ
ना प्रेमात अडकायची मोड
बिनधास्त फुलपाखरू!
पण आता मात्र कधीही उडून जाईल पाखरू
सगळ्यात जीव अडकलेला
नात्यात, प्रेमात, अडकून पडलेला...

खरंच किती गोड, निरागस, मनमोकळं होतं ना लहानपण
उगाच आले शहाणपण
बरं होतं तेच लहानपण! बरं होतं तेच लहानपण!...

**– भाग्यश्री**

---

## 'कुटुंब व्यवस्था'

ना मातृसत्ताक हवी
ना पितृसत्ताक हवी...
कुटुंब व्यवस्था ही दोन्ही कुटुंबांना सोबत
घेऊन चालणारी हवी ।।धृ।।
पुरुषांनी बांधलेल्या चौकटीत
बसण्याची सक्ती असेल तिला...
पण, आता हे चित्र कुठे तरी बदलणारी हवी.

मुलाच्या जन्माचे स्वागत
मुलगी परक्याचे धन
परंपरागत चालत आलेली प्रथा मोडीत काढणारी हवी...
संपत्तीचा वारसदार मुलगा
नाव चालवणारा वंशाचा दिवा मुलगा...
संपत्तीचा वारसदार कोणीही होऊ शकतो
पण नाव पुढे चालवणारा हा मुलगाच असतो
या एका परंपरेपायी स्त्री ही नेहमीच दुय्यमस्थानी
कुठे तरी ही अट बदलणारी हवी...
कुटुंब व्यवस्था ही दोन्ही कुटुंबांना सोबत घेऊन चालणारी

आजची नारी सावित्रीची लेक तू
पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून
नेटाने उभी आहेस थाटात तू पण,
या दिखाव्यामागे तुझे अस्तित्व जपणारी हवी
कुटुंब व्यवस्था ही दोन्ही कुटुंबांना सोबत घेऊन
चालणारी हवी

**– संगीता इंगळे**

---

## आज पुन्हा एकदा

आज पुन्हा एकदा,
मांडवीच्या त्या अंदाधुंद उसळणाऱ्या
लाटांबरोबर,
माझ्या मनातील तुझ्या आठवणींचा महासागर खवळला
आणि डोळ्याची कडा ओली करून,
अलगद पडणाऱ्या थेंबावर तुझा चेहरा दिसला
सावरलं स्वत:ला, पुसलं त्या थेंबाला,
मागे वळून पाहिलं, नव्हतीस तू...
आणि पुन्हा त्या आसवांचा बांध फुटला.
आज असं का व्हावं? कोणास ठाऊक?

पण आज पुन्हा एकदा,
माझा एकटेपणा माझ्या शेजारी येऊन बसला...

**– स्वप्नदिप पवार**

## ती

एका वेळी ती प्रेयसी पत्नी असते
इतर वेळी ती प्रेमळ माताच असते
ओलाचिंब तिच्या मायेचा पदर
जबाबदाऱ्या निभावण्यास ती नेहमी सादर

घरासाठी ती आभाळाएवढी असते
प्रत्येक बाजू हिरिरीने तेवढी जिंकते
सौभाग्याच्या श्वासाची ती चेतना
त्याच्या समग्र विश्वाची ती प्रेरणा

काळीज तिचे अनेक पापुद्र्यांचे
जोडते अनेकांशी नाते सहृदयाचे
नका टोचवू तिच्या काळजात बाण
उरोजात तिच्या अमृताची खाण

नवनिर्मितीची तिच्या ठायी शक्ती
परमेश्वरासमान तिची मक्ती
देहात देह दुसरा निपजते
सगळं घर ती कौतुकाने जोपासते

तिच्याशी जरा जपूनच वागा
भिडस्त स्वभावाला मागे टाका
लक्ष्मी, दुर्गा, सरस्वतीचे ती रूप
तुमच्या संसारासाठी तीच सुस्वरूप

**– सौ. रुपाली लटके**

---

साडी गेली ड्रेस आला
पॅण्ट आली टॉप आला
आणि छोटाच होत गेला

प्रश्न कपड्याचा नाहीच आहे
प्रश्न आहे तो फक्त
गायब झालेल्या पदराचा

कारण पदर हे पद नसून
जन्मभराची फक्त आणि फक्त
जबाबदारी आहे.
ती जाणीवपूर्वक व निस्वार्थपणे
पेलू शकते केवळ 'आई'

**– दिनकर पवार**

## वंशाची पणती

वंशाचा दिवा हवा म्हणून
का विझवता पणती वंशाची
का नाही देत तिला
एक संधी जगण्याची ॥

दिवस सरला रात्र सरली
सोडा जुने विचार
वंशाच्या तेजस्वी पणतीचा
करा ना स्वीकार ॥

ती कल्पना ती सुनीता
अवकाश कवटाळले त्यांनी
झाशीच्या या राणीची
तलवार तळपली रणी ॥

ज्योतीबा आणि सावित्रींनी
केला स्त्रीचा उद्धार
जिजामातेने दिधला आपणास
शिवबा सम रणवीर ॥

आजी, आई अन् बहीण
तीच आहे जीवन सखी
तीच सीता, तीच द्रौपदी
नाही कोण तिच्या सारखी ॥

म्हणूनच हवी वंशाची पणती
म्हणूनच हवी वंशाची पणती...

**– रुपाली यादव**

---

## स्त्री

ती एक कळी, सुंदर सांजवेळी उमलणारी,
वेडावणाऱ्या वाऱ्यासंगे वेडी होऊन डोलणारी,
ती एक गोड स्वप्न भल्या पहाटे दिसणारी,
स्वप्नात का असेना आपल्यामध्ये हरवणारी.

ती एक चित्रकार कुटुंबाचे प्रेमचित्र रेखाटणारी,
आठवणींचे रंग भरून आपले आयुष्य रंगवणारी,
ती एक प्रेमगीतच, अबोल यातून सर्वांशी बोलणारी,
तिच्या प्रेमभावनांना गोड शब्दांत मांडणारी.

ती एक परीच जणू आपल्या हृदयात राहणारी,
तीच आहे एक सुंदर स्त्री शब्दात न मांडता येणारी

**– दिनकर पवार**

# अन्नपूर्णा त्रैमासिक अहवाल

■ **अंजली पाटील**

नमस्कार...

अन्नपूर्णा परिवारातील माझ्या सहकारी मित्र-मैत्रिणींनो..

मार्च २०२६चा संवाद अंक हा खूप गोष्टींनी अभ्यासपूर्ण आणि वाचनीय असणार आहे. अनेकांचे महत्त्वपूर्ण लेख महिला दिनानिमित्त आपल्याकडे आलेले आहेत. महिला दिन म्हटले की फक्त स्त्रियांना घरकामातून मुक्ती, एक दिवस मजा, गाडीवर बसून फेटा घालून हिंडणे एवढेच वाटते. पण स्त्रीचे अधिकार, कामाचे ठरावीक तास, ठरावीक पगार, मतदानाचा हक्क यासाठी ज्यांनी आंदोलन केले, त्रास सहन करून जागतिक पातळीवर हे सर्व अधिकार मिळवून घेतले त्यांचे स्मरण करणे, आपणही ह्या धारेत सहभागी होणे ह्यासाठी ८ मार्च महत्त्वाचा.

आंतरराष्ट्रीय स्त्री मुक्ती चळवळीचे हे ५० वे वर्ष आहे. सहकार वर्ष म्हणूनही युनोने २०२५ हे वर्ष जाहीर केले आहे. भारत सरकारनेही त्याला मान्यता दिली आहे आणि अन्नपूर्णा परिवार महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, सहकारी तत्त्वावर आधारित कामकाज करणे यासाठीच आघाडीवर आहे. म्हणूनच वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूटसारखी सहकारी प्रतिष्ठित संस्था मेधाताईंना लेक्चर देण्यासाठी नेहमी आमंत्रित करीत असते.

ह्या वर्षात अन्नपूर्णा परिवारने महिला सक्षमीकरण आणि आर्थिक सक्षमीकरण ह्या अन्नपूर्णा परिवार मॉडेलवर मराठी पुस्तिका काढली. त्याचे इंग्रजी रूपांतरही लवकरच येते आहे. मेधाताईंच्या मायक्रो फायनान्स ह्या क्षेत्रातील कामावर आधारित 'स्प्रिंगर'सारख्या जगप्रसिद्ध प्रकाशनातर्फे इंग्रजीमधील अन्नपूर्णा परिवाराच्या कामकाजावर एक रिसर्च बुक मार्च २६ मध्येच प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे.

'आम्ही स्वयंपूर्णा' हे मेधाताईंचे कार्यचरित्र ऑगस्टमध्ये प्रकाशित झाले आहे. अन्नपूर्णा परिवाराने ह्या वर्षात डॉक्युमेंटेशन तयार करण्यावर ह्या निमित्ताने भर दिला आहे.

३० नोव्हेंबर रोजी नेहमीप्रमाणे आपली अभ्यासपूर्ण सहल देहू रोड येथील सांतोसा रिसॉर्ट इथे गेली होती. पुणे, वाशी येथील संपूर्ण स्टाफ हजर होता. सर्व विश्वस्त मंडळीही हजर होती. अर्धा दिवस कामाचा धांडोळा घेणे, काय केले, काय करणार, कामात बदल कसे केले पाहिजेत, मागील वर्षी काय बदल केले गेले, त्यामुळे कामकाज सुधारले का? अशा अनेक पैलूंवर सर्वच डिपार्टमेंटनी नाटुकली सादर करून, आकडेवारी दाखवून खूप छान, छान प्रेझेंटेशन्स दिली.

मायक्रोफायनान्स डिपार्टमेंटने सभासद वाढ कशी होईल, जुने सभासद परत कसे येतील, क्रेडिट ब्युरो बंद झाल्यामुळे चांगले सभासद टिकून कसे राहतील, सभासदांची प्रत्यक्ष भेट हवी, ५ ही जण एकत्रित यायला हवे ह्यासाठी सतत संपर्क हवा. सर्व सेवांची नीट माहिती दिली पाहिजे. वस्ती पातळीवर काम प्रामाणिक हवे. अशा आशयाचे नाटक सादर केले होते.

इन्शुरन्स डिपार्टमेंटने ते हाताळत असलेल्या सर्व प्रकल्पांची माहिती दिली. न्यूज चॅनलच्या माध्यमातून सुंदर माहिती दिली. आधारपूर्णा पेन्शन योजनेची सदस्य संख्या वाढली पाहिजे, सभासदांना सविस्तर माहिती दिली पाहिजे, जेणेकरून पेन्शन रक्कम चांगली मिळू शकेल, जी म्हातारपणी उपयोगी पडेल हे सभासदाला पटवून दिले पाहिजे हे आपल्या छोट्याशा नाटुकल्यातून प्रभावीपणे सादर केले.

फायनान्स डिपार्टमेंटचे प्रेझेंटेशन सारिकाताईंनी पहिल्यांदा केले आणि ते छान झाले. ॲडमिन आणि कम्युनिकेशन यांचे प्रेझेंटेशनही छान झाले. सर्वच डिपार्टमेंट्सनी मेहनत घेतली होती. हळूहळू सगळेच शिकत आहेत. प्रगती होते आहे हे दिसत होते.

दुपारच्या सत्रात सर्वांना हक्काच्या करमणुकीसाठी वॉटर गेम्स आणि इतर गेम्स उपलब्ध होते. यामध्ये सर्वांनी भाग घेऊन खूप मजा केली. एकूण ताईंनी प्रथा पाडलेली सिंहावलोकन ट्रिप छान झाली. ॲडमिन डिपार्टमेंटने सोयही चांगली केली होती.

ट्रिपचे बिगुल वाजून संपले नाही तोच मोठ्या मीटिंगचे बिगुल वाजले. तयारी सुरूच होती.

२४ जानेवारी रोजी पंडित फार्म इथे आणि ३१ जानेवारी रोजी वाशी इथे आपल्या वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाल्या. मेधाताईंनी सर्व सभासदांना एक शपथ घ्यायला लावली. सर्व अन्नपूर्णा सभासदांनी कर्ज अन्नपूर्णामधून घ्यायचं आणि आधारपूर्णा म्हणजे पेन्शनसुद्धा अन्नपूर्णामधूनच घ्यायची, म्हणजे रिटायर इथूनच व्हायचं अशी शपथ सर्व सभासदांनी घेतली.

एचएमएफ आणि हॉस्पिवेज याची थोडीशी वर्गणी या वर्षी वाढवली आहे. अर्थात मदतही वाढवत आहोत. मेधाताईंनी समजावून सांगितले की कोविडनंतर खर्च खूप वाढलेले आहेत. आरोग्याचे आणि एकंदरच सगळे खर्च वाढले आहेत. हॉस्पिटलचाही खर्च वाढला आहे. त्यामुळे थोडे कॉन्ट्रिब्युशन वाढते आहे. सर्व सभासदांनी त्याला मंजुरी दिली.

स्त्री मुक्ती संघटना आणि इतर सामाजिक संस्था ज्यात अन्नपूर्णा परिवारही आहेच, अशा सर्वांनी मिळून वर्षभर काही काही कार्यक्रम

सादर केले. मोठ्या मीटिंगसाठी आपण यावरची एक फिल्म तयार करवून घेतली. मेधाताईंच्या मार्गदर्शनाखाली ऋचाताईंनी ती फिल्म बनवली होती. सर्वांना ती खूप आवडली.

नेहमीप्रमाणे आर्थिक अहवाल वाचन, वस्ती प्रतिनिधी ठराव वाचन केले गेले. मेधाताईंनी उज्ज्वलाताई आणि आरतीताई यांची अन्नपूर्णाचे पुढील सीईओ आणि सीओओ अशी ओळख करून दिली. नेहमीप्रमाणे चांगले सभासद, चांगले कर्जदार, उत्कृष्ट गट, उत्कृष्ट माता पिता, उत्कृष्ट उद्योजक अशी बक्षिसे विश्वस्तांच्या हस्ते दिली गेली.

नेहमीप्रमाणे कार्यक्रम सुंदर झाला. पण उपस्थित सभासद अत्यंत कमी प्रमाणात होते ही खंत सर्वांनी व्यक्त केली. त्यासाठी फील्ड स्टाफने प्रत्यक्ष जाऊन निमंत्रण देणे आवश्यक होते ही चूक आपल्याकडून झाली हे मान्य करायला हवे.

या वर्षी कर्ज घेण्याचे प्रमाण थोडेसे घटले आहे त्यामुळे आपण ब्रांचेस मर्ज/एकत्र करत आहोत. मुंबईमध्ये आणि पुण्यामध्ये एकंदर सभासदांमध्ये खूप वाढ झाली नाही. जरी संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत आहे तरी या वर्षी थोडीशी कठोर आर्थिक पावलं उचलून काही ब्रांचेस विलीन केल्या आहेत. मुंबईमध्ये ३ ब्रँच आणि पुणे येथे एक ब्रँच एकत्रित केल्या आहेत. ब्रँचचा पोर्टफोलिओ किती असावा, सभासद किती असावेत या नियमाप्रमाणे हे विलीनीकरण झाले आहे.

पाळणाघराचा प्रकल्प आता संपूर्ण स्वयंपूर्ण झालेला आहे. स्वत:च्या पायावर उभा आहे. कुठलीही ग्रँट आता त्यांना लागत नाही.

या वर्षी त्या सर्व मुलांनी ख्रिसमस साजरा केला. २६ जानेवारी हा प्रजासत्ताक दिन, १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती असे सार्वजनिक उत्सव साजरे केले. मेधाताईंच्या संकल्पनेतून, अमृताताईंच्या आवाजात, ऋचाताईंच्या कल्पकतेमधून शिवाजी राजे जे रयतेचे राजे होते, कुळवाडी भूषण होते. त्याची गोष्ट सांगितली. रयतेशी त्यांची वागणूक एक पिता अशी होती. रयत सुखी कशी राहील, स्त्रियांना सन्मानाची, न्यायाची वागणूक दिली पाहिजे ह्यावर त्यांचे लक्ष होते. समाजात त्यांची जी गोब्राह्मण प्रतिपालक अशी चुकीची प्रतिमा निर्माण केली आहे त्यापेक्षा शिवाजी राजे रयतेचे राजे म्हणूनच त्यांची खरी प्रतिमा जनमानसात आहे आणि तीच गोष्ट मुलांना पाळणाघरात दाखवली गेली. त्यांनाही ती खूप आवडली.

अन्नपूर्णा महिला मंडळ मुंबई आणि दादा पुरव रिसर्च सेंटर ह्या आपल्या २ ट्रस्टच्या माध्यमातून आपण विद्यापूर्णा शिष्यवृत्ती देतो आहोत आणि ह्या दोन ट्रस्टमध्ये अनेक वर्षांच्या अथक परिश्रमानंतर मेधाताईंनी पुरेशी रक्कम जमा केली आहे, ज्यायोगे पुढे अनेक वर्षे आपण ३००० रु.ची मदत हजार मुलांना सातत्याने देऊ शकू.

तुम्हाला माहीत आहेच की पुण्यामध्ये 'सुवास्तू' ही १४ मजली वास्तू दिमाखाने उभी राहिली आहे. तशीच आपली मुंबईची अन्नपूर्णा महिला मंडळाची वाशी येथे जागा आहे. तिथेसुद्धा एक दिमाखदार टॉवर लवकरच उभा राहील. २,३ वर्षांत आपल्याला तो मिळेल. सध्या आपल्याला वाशी कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये अतिशय चांगल्या जागेत हावरे बिल्डर यांनी सुस्थापित केलेले आहे. त्यामुळे कामकाज सुरळीत चालू आहे.

अशा प्रकारे अन्नपूर्णा परिवार आर्थिक सुस्थितीत आहे तरीही आर्थिक कठोर पावलं उचलून पुढील सुस्थिती टिकावी यासाठी काही निर्णय घेण्यात आलेले आहेत. सभासद आणि कर्मचारी वर्ग त्यात पूर्ण सहकार्य देऊन सगळ्या नियमांचे पालन करेल आणि आपण असेच पुढे पुढे जाऊ अशी आशा आहे. बाहेरील सामाजिक परिस्थितीमध्ये टिकून राहायचं असेल तर या शिवाय पर्याय नाही. अनेक फायनान्स कंपन्या उभ्या राहतात पण टिकायला भक्कम पाया लागतो जो अन्नपूर्णाकडेच आहे. भक्कम पायासाठी भक्कम विचार लागतो, पुढील १० वर्षांत काय घडू शकेल ह्याची दृष्टी लागते, जी मेधाताईंकडे आहे.

डिसेंबर महिन्यामध्ये ३० तारखेला अन्नपूर्णा परिवारला एन.सी.डी.सी. कडून महाराष्ट्रातील 'उत्कृष्ट महिला सहकारी संस्था' असा पुरस्कार मिळाला. यशवंतराव चव्हाण ऑडिटोरियम पुणे, येथे मेधाताईंनी हा पुरस्कार स्वीकारला.

साधन या संस्थेच्या इलाबेन पुरस्काराबद्दल मी आधी सांगितले आहेच. सर्वोत्कृष्ट वूमन-फ्रेंडली इन्स्टिट्यूट, २०२५ हा पुरस्कार अन्नपूर्णा परिवारला जाहीर झाला होता. तो पुरस्कार सोहळा दिल्ली मध्ये १४ नोव्हेंबर रोजी झाला होता. रोहिणीताई, निशाताई, वस्तीप्रतिनिधी यांनी तो स्वीकारला होता.

ख्राईस्ट युनिव्हर्सिटी, लवासा पुणे इथे ६ फेब्रुवारी रोजी मेधाताईंना एम.बी.ए. विद्यार्थ्यांना लेक्चर देण्यासाठी बोलावले होते. अन्नपूर्णा परिवार मॉडेल, स्त्रियाही उत्तम व्यवसाय उभारू शकतात, सामाजिक काम उभारू शकतात ह्या विषयावर बोलायला मेधाताईंना निमंत्रित केले होते. मोठमोठ्या शैक्षणिक संस्था ताईंना भाषण द्यायला बोलवत असतात. आपल्यासाठी ही खूप छान गोष्ट आहे.

अन्नपूर्णा परिवार सहकार क्षेत्रात खूप चांगले काम करते. फायनान्स आणि इन्शुरन्समध्ये खूप आघाडीवर आहे. कर्ज प्रक्रियेपासून पेन्शनपर्यंतच्या सेवा आपण सभासदांना देतो. त्या चांगल्या प्रकारे देण्यात आपली सर्वांची एकत्रित जबाबदारी आहे. आपण आपले काम चांगल्या प्रकारे, प्रामाणिकपणे करून ह्या सामाजिक कामात खारीचा वाटा आपण सर्वांनी उचलू या.

❖❖❖

*विश्वस्त, अन्नपूर्णा परिवार*
(E-mail : diwan.anju@gmail.com)















CERTIFICATE OF EXCELLENCE
35,000

Chief Guest Address
Dr. Medha Purao Samant,
Founder, CMD Annapurna
Pariwar







